म. ग्रं. सं. ठाणें

विषय

संग्रहालय क्रमांक

लेखक महादेव शिवराम

ग्र/ ८६

पुस्तकाचें नांव शाळेचा अभिमान

आणि कुटुंबाचा अभिमान

सन

८४

# शाळेचा अभिमान आणि कुटुंबाचा अभिमान.

निबंध

सन १८९५
~~सं. वि. २१~~
वा. विभाग २४३

आयुष्यांतील कर्तव्यांविषयीं उपदेश.

# शाळेचा अभिमान

आणि

# कुटुंबाचा अभिमान.

हे

महादेव शिवराम गोळे, एम्. ए.,

प्रिन्सिपाल, फर्ग्युसन कालेज, पुणें.

यांनीं केले.

आवृत्ति दुसरी.

( ग्रंथकर्त्यानें सर्व हक्क राखून ठेविले आहेत. )

किंमत चार आणे.

मुंबई:
" सुबोधप्रकाश " छापखान्यांत छापिले.

# पहिल्या उपदेशाची प्रस्तावना.

आपल्या विद्यार्थ्यांस प्रतिमासीं एक वेळ तरी उपदेशाचे चार शब्द सांगावे असा विचार माझ्या मनांत फार दिवस घोळत होता; परंतु निरनिराळ्या कारणांनीं हा हेतु सिद्धीस नेण्याचें काम लांबणीवर पडत गेलें. अखेरीस, **प्रिन्सिपाल वामन शिवराम आपटे** यांच्या स्मरणार्थ **न्यू इंग्लिश स्कुलास** व **फर्ग्यूसन कालेजा**स त्यांच्या मृततिथीच्या दिवशीं (१८९४) जी सुट्टी देण्यांत येते, त्या सुट्टीचा प्रसंग आपण चिंतिलेल्या उपदेशमालेच्या आरंभास अत्यंत उचित, असें समजून त्या दिवशीं हा पहिला उपदेश केला.

हा उपदेश विशेषतः **न्यू इंग्लिश स्कूल**च्या व **फर्ग्यूसन कालेज**च्या विद्यार्थ्यांस अनुलक्षून आहे, तथापि तो सर्व ठिकाणच्या विद्यार्थिवर्गास ग्राह्य होईल अशी माझी उमेद आहे. शिवाय विद्यार्थ्यांच्या पालनकर्त्यांस व सामान्य वाचकांसही तो उपयुक्त व मनोरंजक वाटेल अशी आशा आहे.

**न्यू इंग्लिश स्कूल**च्या संस्थापकांच्या मुख्य उद्देशांचें व त्यांनीं आरंभिलेल्या कार्यविस्ताराचें या उपदेशांत जें विशेष विवरण केलेलें आहे, तें करण्याचीं कारणें दोन होतीं. एक हें कीं, उपदेशाचा विषय विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबण्यास हें विवरण फार उपयोगीं होतें, व दुसरें असें कीं, असें स्पष्ट विवरण कोठें तरी एकदा करणें इष्ट होतें.

हा उपदेश छापण्याचा मुख्य हेतु हा कीं, तो विद्यार्थ्यांस नेहमीं जवळ ठेवितां यावा व त्याचें त्यांस फावल्या वेळीं मनन करितां यावें. दुसरा असा एक विचार मनांत आला कीं आपल्या संस्थांमध्यें विद्यार्थ्यांच्या मनावर कोणते संस्कार घडविण्याचा आपला प्रयत्न आहे हें त्यांच्या पालनकर्त्यांस कळावें.

मराठी भाषेंत उपदेशपर ग्रंथांची हल्लीं फार मोठी उणीव आहे. हा पहिला उपदेश सुज्ञ वाचकांस सुसंमत होऊन उपयुक्त वाचनग्रंथांत त्याची गणना होते, असें दिसून आल्यास पुढील उपदेशही छापविण्याचा उद्देश आहे.

पुणें, न्यू इंग्लिश स्कूल
ता० १५ आगष्ट १८९४

म. शि. गोळे

Fair Prime of life! Arouse the deeper heart;
Confirm the Spirit glorying to pursue
Some path of steep ascent and lofty aim;
And, if there be a joy that slights the claim
Of grateful memory, bid that joy depart.

एते सत्पुरुषाः परार्थघटकाः स्वार्थान्परित्यज्य ये ।
सामान्यास्तु परार्थमुद्यमभृतः स्वार्थाविरोधेन ये ॥
तेऽमी मानवराक्षसाः परहितं स्वार्थाय निघ्नंति ये ।
ये तु घ्नंति निरर्थकं परहितं ते के न जानीमहे ॥

वॉ-११
९९

# उपदेश पहिला.

## शाळेचा अभिमान.

आजच्या या पहिल्या उपदेशाचा विषय आपल्या **संस्थांचा अभिमान** हा आहे. प्रत्येक मनुष्य जन्मतःच कांहीं संस्थांशीं बांधला जातो व पुढें उद्योग, धंदा, व्यासंग वगैरेमुळें त्याचा निरनिराळ्या कित्येक संस्थांशीं संबंध येतो. आपलें कुटुंब, आपली जात, आपला धर्म आणि आपला देश, या सर्वांशीं आपला जन्मतःच संबंध घडतो; आपली शाळा, आपले खेळण्याचे किंवा करमणुकीचे क्लब, आपल्या उद्योगधंद्यासंबंधानें ज्या सभांचे सभासद होणें आपणांस भाग पडतें त्या सभा, या सर्व संस्थांशीं आपला संबंध निरनिराळ्या कारणांनीं घडतो. कोणत्याही प्रकारें ज्या ज्या संस्थांशीं आपला संबंध जडेल, त्या त्या सर्व संस्थांचा योग्य अभिमान बाळगणें, हें आपलें कर्तव्यकर्म आहे, असें तुह्मांस दाखवावयाचें आहे. हें कर्तव्य बजावल्यापासून आपणांस समाधान व आनंद होतो, आपणांस प्रसंगीं साहाय्य मिळतें, व आपल्या आयुष्याचा ओघ सुखानें वाहतो असें विशेषकरून तुमच्या लक्षांत आणून द्यावयाचें आहे.

हा विषय प्रथम घेण्याचें कारण असें आहे कीं आपल्या संस्थांचा अभिमान बाळगणें या कर्तव्याचें तुह्मां मुलांस चांगलें ज्ञान आहे असें माझ्या तरी पाहण्यांत येत

नाहीं, व ह्मणून त्याची चांगली बजावणी तुह्मांपैकीं फ
थोड्यांच्या हातून होत असावी अशी माझी समजूत अ
या कर्तव्यासंबंधानें लहानांत व थोरांत फारसा भेद दि
नाहीं; लहानांच्या अज्ञानामुळें व थोरांच्या उदासी
मुळें, या कर्तव्याची बजावणी उत्तम प्रकारें करणारे
लोक विरळा सांपडतात. ही शोचनीय स्थिति दूर झ
पाहिजे.

आपल्या संस्थांचा अभिमान बाळगणें, त्यांच्या हि
साठीं व उत्कर्षासाठीं झटणें, त्यांवर दूषण येईल
कृत्य कदापि न करण्याविषयीं मनाचा निर्धार ठेवणें
गुण जन्मभर सदाचारास जेवढी मदत करितो तेवढी
सऱ्या कोणत्याही गुणानें होत नाहीं असें मला वाटे
ह्मणून या गुणाचा प्रथम सर्वांनीं स्वीकार करावा
माझा तुह्मांस पहिला उपदेश आहे.

आतां आजच्या प्रसंगीं उपदेशविषयाच्या सर्व
गांचें समग्र विवेचन होणें शक्य नाहीं, याकरितां "
ळेचा अभिमान" हा त्या विषयाचा एक भाग
त्याचें मात्र विवेचन करण्याचें मीं योजिलें आहे. तु
सांप्रतच्या विद्यार्थिपणच्या स्थितींत तुमचा शाळेशीं
तका निकट संबंध असतो, तितका इतर कोणत्याहि
सऱ्या संस्थांशीं नसतो असें ह्मटल्यास चालेल.
शाळेंत किंवा शाळेच्या संबंधाच्या उद्योगांत तुमचा
बहुतेक सर्व वेळ खर्च होतो, व शाळेच्या व अभ्यास
विचारांतच तुमचें मन बहुधा गर्क असतें. ज्याअर्थ
गोष्टी संवयीनें साध्य होतात, त्या अर्थी तुमच्या हह

यतींत शाळेच्या संबंधानें अभिमानगुणाची तुह्मीं संवय
वून घ्यावी हें इष्ट आहे, ह्मणून उपदेश विषयाचा हा
ग तुम्हांस आधीं समजावून देणें योग्य दिसतें.

न्यू इंग्लिश स्कूल ही संस्था जरी अद्यापि फारशी
नी झाली नाहीं, तरी तिच्या हल्लींच्या भरभराटीच्या
यतीवरून व नित्य चालू असलेल्या सुधारणांवरून तीस
तां चिरस्थायित्व आलें असें ह्मणण्यास हरकत नाहीं.
शाळेस हल्लीं जें बोर्डिंग जोडिलें आहे तेंही अशाच
भराटीस आणण्याचा आमचा निश्चय आहे. ज्या आई-
ांनीं आपलीं मुलें आह्मांवर भरंवसा ठेवून निर्धास्तपणें
ाच्या स्वाधीन केलीं आहेत, त्यांनीं मुलांच्या कोंवळ्या
वर येथें जे संस्कार होतील ते उत्तमच होतील, ते
ार मुलांस जन्मभर सदाचरणास प्रवृत्त करितील, अ-
आशा धरिली आहे, व आह्मांवर ही मोठी जबाबदा-
ोंपविली आहे. तुह्मांपैकीं कांहीं मुलें बोर्डिंगांत आ-
, बाकीचीं शाळेंत आहेत. बोर्डिंगांतील मुलांनीं बो-
ाचा अभिमान बाळगिला पाहिजे, व तुह्मीं सर्वांनींच
ळेचा अभिमान बाळगिला पाहिजे. या अभिमानामुळें
कर्तव्यें तुह्मांस बजावावीं लागतील, त्यांची तुह्मांस
ा होतांच, मग ज्या इतर संस्थांशीं तुमचा हल्लीं संबंध
किंवा पुढें होईल त्या संस्थांचा अभिमान तुह्मांमध्यें
ोआप उत्पन्न होईल, त्यासंबंधीं कर्तव्यें बजावणें हा
ा स्वभावच बनून जाईल, तीं बजावल्यावांचून तुह्मांस
ां चैनच पडणार नाहीं. अशी तुमच्या मनाची स्थिति
ली ह्मणजे तुमच्या पालनकर्त्यांनीं आह्मांवर सोंपविलेल्या
ाबदारीचा अर्धा भाग संपला असें आह्मांस वाटेल.

चांगल्या गोष्टीचा अभिमान व प्रीति बाळगणें, वाईट गोष्टीचा द्वेष व त्याग करणें हें सर्व नीतिशास्त्राचें रहस्य होय. ज्या स्थितींत चांगलें असें कांहींच नाहीं, सर्वच वाईट, सर्वच त्याज्य अशा स्थितींत ईश्वरानें कोणाही मनुष्यास ठेविलेलें नाहीं. या कारणानें प्रत्येक सुज्ञ मनुष्य आपल्या स्थितींत जें चांगलें असेल त्याचा विचार करून आपलें समाधान करून घेतो; त्या चांगल्याची वृद्धि होण्याकरितां झटतो, व जें वाईट तें टळावें, तें कमी व्हावें, तें अनिवार्य असेल तर त्याचा निदान विसर पडावा व त्यापासून मनास वारंवार उद्विग्नता येऊं नये, असा तो प्रयत्न करितो. जे अत्यंत दरिद्री, जे संसारभारानें अगदीं वांकलेले त्यांसच कदाचित् चांगल्यापेक्षां वाइटाचा अधिक अनुभव घ्यावा लागत असेल. मध्यम स्थितींतील मनुष्यास आपल्या स्थितीबद्दल असमाधान वाटण्याचें बहुधा कारण नसतें; व मध्यम स्थितींतील गृहस्थांच्या मुलांस तर तें मुळींच नसावें; कारण अशा मुलांच्यामागें उदरपोषणाच्या किंवा संसाराच्या यातना लागलेल्या नसतात. विद्यार्जन करणें, शरीरसामर्थ्य मिळविणे, सदाचारानें वागणें, आपल्या पुढील सुखाचा व उत्कर्षाचा मार्ग साधणें, एवढेंच त्यांचें कर्तव्य असतें. हें आपलें कर्तव्य मुलांनीं बजावावें म्हणून त्यांचे आईबाप, इष्टमित्र, सर्वच त्यांस उत्तेजन देत असतात. मुलांस होतां होईल तों चांगल्या गोष्टींचा मात्र उपभोग मिळावा, म्हणून पालनकर्ते सर्व चिंतांचा भार आपल्या माथीं घेतात. तुम्हां सर्वांची तूर्त अशी उत्तम स्थिति आहे, व या उत्तम स्थितीचा उत्तम उपयोग करणें तुमचें काम आहे. अशी स्थिति प्रत्येकास जन्मांत

एकच वेळ येते, व तिचा त्यानें जसा बरावाईट उपयोग केला असेल त्यावरून त्याची जन्माची परीक्षा होते. जर अगदीं भिकारी स्थितींतील मनुष्यासही आपल्या स्थितींत कांहीं थोडें तरी समाधान मानण्यासारखें सांपडतें, तर तुमच्या विद्यार्थीपणच्या स्थितींत तुम्हास कितीतरी चांगलें, म्हणजे अभिमान व प्रीति बाळगण्याजोगें सांपडलें पाहिजे?

अशा या तुमच्या स्पृहणीय स्थितींत तुह्मांस एवढेंच सांगणें आहे कीं तुह्मीं शाळेचा अभिमान बाळगावा. हें सांगणें एवढ्याचकरितां आहे कीं त्यायोगें तुमचें, तुमच्या कुटुंबांचें व पुढें ज्या ज्या संस्थांशीं तुमचा संबंध येईल त्यांचें,—सर्वांचेंच हित व्हावें. [ तुह्मीं शाळेचा अभिमान बाळगिल्यानें शाळेचें पुष्कळ हित होईल यांत नवल तें काय? परंतु त्यायोगें तुमचें स्वतःचें विशेष हित होणार आहे हें तुह्मी नीट समजून घेऊन नेहमीं लक्षांत धरिलें पाहिजे. कारण असें आहे कीं शाळेचा अभिमान बाळगणें हें केवळ शब्दोच्चाराचें काम नाहीं; त्या अभिमानाची यथार्थता होण्यास तुमचें वर्तन तदनुरूप असलें पाहिजे. [ शाळेवर दूषण येईल असें कृत्य तुमच्या हातून कधींही न घडलें पाहिजे; कोणी तसें कृत्य करीत असल्यास त्याचें तुह्मीं निवारण केलें पाहिजे. दुसऱ्या शाळांशीं चढाओढ सुरू असतां तुह्मीं आपल्या शाळेस जय मिळवून दिला पाहिजे: मग ही चढाओढ अभ्यासाच्या कामीं असो, परीक्षेंत वर नंबर ठेवण्याच्या कामीं असो, किंवा खेळांमध्यें शरीरसामर्थ्य व चतुराई दाखविण्याच्या कामीं असो.] आपल्या शाळेविषयीं कोणी वाईट बोललेलें तुह्मांस ऐकवलें न पाहिजे, तें तुह्मांस कदापि सहन झालें न पाहिजे. आ-

पल्या शाळेची सर्व कामांत सरशी राहील, तिची कीर्ति आणि उत्कर्ष सारखा वाढत जाईल, अशाविषयीं तुमचा निरंतर प्रयत्न असला पाहिजे. शाळेंतील मुलांशीं बंधुत्वानें वागणें, शिक्षकांशीं प्रेमानें परंतु विनयानें वागणें, शाळा हें आपलेंच थोरलें घर, आपलेंच थोरलें कुटुंब अशी तुमच्या मनाची समजूत होणें–याचेंच नांव शाळेविषयीं प्रीति बाळगणें होय. याप्रमाणें तुमचें वर्तन व तुमची समजूत झाली ह्मणजे त्यांत तुमचेंच हित नाहीं काय? शाळेंतील मुलें सन्मार्गानें चालतात, तीं हुषार आहेत, विनयशील आहेत, त्यांच्या अंगीं बंधुप्रीति आहे, अशा गुणांबद्दल जी मुलांची ख्याति तीच शाळेच्या कीर्तिचें व उत्कर्षाचें बीज नव्हे काय? तेव्हां शाळेचा अभिमान व तदनुरूप वर्तन, हें मुलांनीं स्वतःच्या खऱ्या हिताचें मुख्य साधन गणिलें पाहिजे.

जी एकादी गोष्ट आपण केवळ स्वार्थबुद्धीनें करितों तिजपासून मनास फारसें समाधान किंवा प्रौढी. वाटत नाहीं; परंतु तीच गोष्ट जेव्हां संस्थेच्या अभिमानानें आपण करितों तेव्हां मनास अधिक समाधान व थोरवी वाटते, व आपणांप्रमाणेंच दुसरेही तीच गोष्ट त्याच बुद्धीनें करीत आहेत हें पाहून आपणांस धैर्य व उत्तेजन येतें. कोणतीही एक गोष्ट शाळेच्या अभिमानानें करणें व तीच गोष्ट तशीच परंतु त्या अभिमानावांचून करणें, या दोहोंमध्यें असा हा मोठा भेद आहे. आपल्या आळसानें शाळेचा लौकिक कमी होणार, आपल्या परिश्रमानें शाळेचा लौकिक वाढणार, हा विचार शाळेचा अभिमान बाळगणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांस किती प्रोत्साहन करणारा

आहे या गोष्टीचा तुम्हीच विचार करा. आपले माजी गव्हर्नर **लार्ड हॅरिस** यांनीं पूर्वी एक भाषण केलें त्यांत त्यांनीं आपल्या अनुभवाची एक गोष्ट सांगितली ती तुम्ही ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. या भाषणाच्या दिवशींच इंग्लंडांत **ईटन** आणि **हारो** या दोन शाळांचा क्रिकेटमध्यें सामना व्हावयाचा होता. साहेबांनीं सांगितलें कीं "बऱ्याच वर्षांपूर्वी याच दिवशीं माझ्या मनांत एकच एक विचार घोळत होता. तो हा कीं आपल्या शाळेच्या तर्फे सामन्यास उभें राहण्याचा आपला हा पहिलाच प्रसंग आहे, यांत आपणांस जय आला पाहिजे, तो येतो कीं नाहीं? या विचाराची या प्रसंगीं मला आठवण होण्याचें कारण हें कीं, तुम्हीं ( मुलांनीं ) आपल्या शाळेचा अभिमान बाळगावा ( व त्या अभिमानाच्या ईर्षेनें जें काय करणें तें करावें ) असें मला तुम्हांस सुचवावयाचें आहे" **लॉर्ड हॉरिस**साहेबांनीं तुम्हां मुलांच्या सुधारणेच्या कामीं व तुम्हांस सदुपदेश करण्याच्या कामीं जे परिश्रम केले आहेत ते खरोखरीच वर्णनीय आहेत, व तुम्हांस त्यांची कृतज्ञतापूर्वक आठवण रहाणें स्वाभाविक आहे.

आपल्या आयुष्याच्या गतकालाचें आपणांस बहुधा विस्मरण होत नाहीं. त्या कालांतील सुखाचे व दुःखाचे प्रसंग आपल्या डोळयांपुढें वारंवार उभे राहतात; ते प्रसंग जों जों जुने होतात तों तों त्यांच्या स्मरणानें आपणांस सुख व समाधान वाटूं लागतें; व मुलाबाळांस व इष्टमित्रांस ते सांगण्यांत आपणांस कांहींसें कौतुक वाटतें. जोंवर तुह्मी लहान आहां, जोंवर तुह्मी केवळ विद्यार्थी आहां, तोंवर तुह्मांवर जे सुखदुःखाचे प्रसंग येतील त्यांचें

तुह्मांस पुढें जेव्हां स्मरण होईल तेव्हां आनंदच होईल. आपण शाळेंत असतां आपला जो आयुष्याचा भाग गेला तो सर्वांत फार सुखाचा गेला असें पुष्कळांनीं लिहून ठेविलें आहे. आपलें विद्यार्थीपण संपलें ह्मणून पुष्कळांस अतोनात वाईट वाटलें आहे. याचें कारण हेंच कीं विद्यार्थीपणांतील सुखाच्या व दुःखाच्या, सर्वच गोष्टींचें स्मरण आनंददायक असतें, व सर्व आयुष्यांत विद्यार्थीपणाची उत्तम स्थिति कायती एक वेळ मात्र येते. जर तुह्मीं या वेळेचें आपलें चरित्र रोजनिशींत लिहून ठेविलें, तर तुह्मांसही बहुधा असेंच पुढें वाटेल. कदाचित् ती रोजनिशी आपला एक मोठा सुखाचा ठेवाच आहे. असें तुह्मांस वाटेल.

तुमच्या आतांच्या वयांतील स्नेह निरंतर कायम राहतात, परंतु ते जडण्यास अगदीं क्षुल्लक कारणही पुरतें. कोणी परीक्षेंत पास झाला ह्मणून त्याचें तुह्मीं मोठें गौरव किंवा अभिनंदन कराल; कोणी परीक्षेंत नापास झाला हें पाहून त्याचें तुह्मी सांत्वन कराल; कोणी खेळांत सरशी मिळविली म्हणून त्यास शाबासकी द्याल; कोणाचा पाडाव झाला हें पाहून त्यास आश्वासनाच्या किंवा उत्तेजनाच्या दोन गोष्टी सांगाल; कोणास गरजेच्या वेळीं थोडी मदत कराल; कोणास दुसरे त्रास देत असतां त्याचा पक्ष घ्याल; कोणास येतां जातां नुसते खुशालीचे चार शब्द बोलाल;—असल्या अनेक लहान सहान गोष्टींमुळें पूर्ववयांतील स्नेह जडतात. परंतु त्यांचा जन्मभर विसर पडत नाहीं. फार तर काय, परंतु परस्परांमध्यें झालेलीं भांडणें, रागाचे शब्द, गर्वोक्ति, वगैरेचेंही कालांतरानें जेव्हां स्मरण होतें, व

भांडणाचीं, रागाचीं व गर्वाचीं कारणें किती क्षुद्र होतीं याविषयीं मनांत विचार येतो, तेव्हां आपल्या अविवेकाचें आपणांसच आश्चर्य वाटतें. मग परस्परांचीं अंतःकरणें एकमेकांकडे ओढ घेतात व नवा स्नेह जडतो. याप्रमाणें खऱ्या जिवलग मैत्रीचें बीजारोपण बाळपणीं व शाळेच्या वयांत होतें. ही मैत्री कायम ठेवणें व वाढविणें एवढेंच मोठेपणीं काम उरतें. निरनिराळ्या ठिकाणच्या, निरनिराळ्या स्थितींतल्या व निरनिराळ्या उद्योगधंद्यांच्या अनेक व्यक्तींशीं चांगला स्नेह जोडण्यास शाळेंत जशी संधी मिळते तशी दुसऱ्या कोठें मिळणार आहे? म्हणून ही संधी कोणी दवडूं नये. उत्तरवयांत हे स्नेह केव्हां, कोठें, किती उपयोगीं पडतील याचा काय नियम आहे?

**बोर्डिंगांतील** मुलांनीं ही गोष्ट विशेष ध्यानांत धरावी जेवणखाण, खेळ, अभ्यास, करमणुकी हीं सर्व ज्यांचीं एकत्र होतात, त्यांनीं एकमेकांस सुखसमाधानाचे शब्द बोलून, एकमेकांच्या कामीं पडून, एकमेकांबद्दल प्रीति व अभिमान बाळगून, एकमेकांची निरंतरची मैत्री कां न संपादन करावी? तुम्हांपैकीं प्रत्येकानें अशी उमेद बाळगावी कीं मी कोणी मोठा मनुष्य होईन, निदान मोठा मनुष्य होण्याची महत्वाकांक्षा कधीं सोडणार नाहीं, व जे आपले मित्र दुर्दैवानें मागें राहतील त्यांस प्रसंगीं साहाय्य करीन. जर तुम्हीं मुलांनीं याप्रमाणें परस्परांशीं दृढ स्नेह जोडला, जर "हा आपल्या **बोर्डिंगांतील** किंवा आपल्या **शाळेंतील** मुलगा आहे" एवढें कळतांच तुमचें प्रेम, तुमचा पक्षपात त्याकडे ओढवला, तर शाळेची केवढी एकजूट होईल? शाळा म्हणजे केवढी एक बलाढ्य संस्था हो-

ईल ? शाळेच्या अभिमानाचें हें केवढें मौल्यवान् फळ समजलें पाहिजे ? जर तुमचें वर्तन अशा प्रकारचें आहे असें आम्हीं पाहिलें, तर आज मित्तीस आम्हांस तुम्हांबद्दल जो अभिमान वाटत आहे त्यापेक्षां तो शतपट अधिक वाटेल, तुमच्या हिताची आज जितकी कळकळ आम्हांस वाटत आहे त्याहून शतपट अधिक कळकळ साहजिकच आमच्या हृदयांत उत्पन्न होईल. प्रीति व अभिमान यांची वृद्धि होण्यास परस्पर तयार असावे लागतात, म्हणून शाळेविषयीं तुम्हांमध्यें जेवढा अभिमान वाढेल तेवढाच तुम्हांविषयीं शाळेच्या संस्थापकांत अभिमान वाढेल यांत संशय नाहीं.

मुलांस शाळेचा अभिमान वाटण्यास ज्या एका विशेष गोष्टीची जरूर असते ती ही कीं सर्व शिक्षकांचें वर्तन या मनोवृत्तीस उत्तेजन देणारें असलें पाहिजे. आपल्या हिताची शिक्षकास खरी कळकळ आहे असें विद्यार्थ्यांस पदोपदीं दिसून आलें पाहिजे. मुलांस अपराधाबद्दल शिक्षा करितांनाही त्यांविषयीं तिरस्कार किंवा द्वेष शिक्षकाच्या मनांत आहे असें कदापि त्यांस भासलें न पाहिजे. जों जों विद्यार्थी अधिक मंद तों तों त्यास सुधारण्यास सौम्य उपायांचीं अधिक योजना केली पाहिजे. कारण आपण मूर्ख आहों, बुद्धिमंद आहों, नित्य शिक्षा भोगणें, नित्य उपहासाचे व तिरस्काराचे शब्द ऐकणें, हेंच आपल्या नशीबीं आहे,—असें एकाद्या मुलास एकदां वाटूं लागलें म्हणजे त्याच्या सुधारणेचा मार्गच खुंटला असें समजावें. त्यास शाळा नकोशी होते, शिक्षक त्रासदायक भासतात, व त्याची सर्व प्रकारें उमेद खचते. कोणाही मुलास अशी स्थिति येईल

॥ ता ॥ ११



असें शिक्षकाचें आचरण नसावें, असें माझें सर्व शिक्षकांस सांगणें आहे. प्रत्येक शिक्षकानें मुलांची भक्ति संपादन करण्यास झटलें पाहिजे व आपला विषय मुलांस थोडा तरी मनोरंजक होईल अशाविषयीं नित्य प्रयत्न केला पाहिजे.

परंतु जरी या केवळ सुविचाराच्या गोष्टी उभयपक्षींही सुसाध्य झाल्या, तरी देखील आणखी अनेक बाह्य साधनें जुळून यावीं लागतात. त्यांवांचून मुलांच्या कोंवळ्या मनांवर शाळेचा अभिमान चांगला बिंबत नाहीं. सुंदर वस्तु पाहून भूलून जाणें, कलाकौशल्याचीं कामें पाहून आश्चर्यभरित होणें, भव्य व जुनाट इमारती पाहून मनांत पूज्यबुद्धि उत्पन्न होणें, भोंवतालचा सृष्टीचा देखावा पाहून मनांत शांत व उदात्त विचार येणें—अशी मनुष्याच्या मनाची साहजिक प्रवृत्ति असते. लहानपणच्या अपुऱ्या शिक्षणानें, किंवा उद्योगधंद्याच्या दगदगीनें, किंवा एकाच गोष्टीच्या निरंतर व्यासंगानें ज्यांचीं मनें एककली झालीं आहेत, अशा मोठमोठ्या लोकांसहि केव्हां केव्हां **सुंदर, भव्य, व उल्हासकारी** वस्तूंचा शिक्षणाच्या कामीं केवढा उपयोग होतो याची कल्पना नसते, व ते त्याविषयीं उदासीनता दाखवितात. माझ्या मतें हें योग्य नाहीं. कोणत्याही संस्थेविषयीं चिरस्थायी अभिमान व प्रीति उत्पन्न करण्यास, व विशेषतः तो अभिमान व ती प्रीति लहान मुलांच्या कोमल अंतःकरणांत उत्पन्न करण्यास, सुंदर, भव्य व उल्हासकारी अशा वस्तूंच्या संग्रहाची फारच आवश्यकता असते. इंग्लंडांतील प्रसिद्ध शाळांचीं व कालेजांचीं वर्णनें तुम्हीं वाचल्यास व आपण तेथेंच आहों अशी कल्पना केल्यास तुम्हांस काय आढळून येईल? मोठ्या

उंच विशाल इमारती, दोन चारशें वर्षें सारखे वाढलेले प्रचंड वृक्ष, बाजूस मोठी नदी किंवा डोंगर, भोंवतालीं कित्येक मैलपर्यंत लांब पसरलेलीं खेळण्याचीं व व्यायामाचीं मैदानें, इत्यादि अनेक गोष्टी प्रथम दर्शनीं नजरेस येतील. नंतर मोठ्या भव्य सुशोभित मंडपांत सृष्ट पदार्थांचें, पुस्तकांचे व यंत्रांचे उत्तम संग्रह, प्रसिद्ध चित्रकारांचीं कामें, प्रसिद्ध पुरुषांचे स्मारक पुतळे व दुसरीं अनेक कलाकौशल्याचीं कामें इमारतींमध्यें शिरल्यावर पाहण्यांत येतील. शेवटीं, देवालयांचे मनोरे उंच उंच गेलेले आहेत, प्रार्थनेच्या गायनवादनाचा गंभीरध्वनि नित्य जिकडे तिकडे भरत आहे व विद्यार्थी आणि गुरु यांनीं नियमित प्रकारचे पोषाख केल्यामुळें ते इतरांपासून ओळखूं येत आहेत, अशी स्थिति तेथें दृष्टीस पडेल. व एकंदरीनें असें लक्षांत येईल कीं मनास आनंद, प्रसन्नता व थोरवी येण्यास ज्या ज्या गोष्टी सहायभूत होतात, त्या त्या सर्व गोष्टींचा शालागृहांत व त्या भोंवतालीं संग्रह करण्याचा सारखा प्रयत्न सुरू आहे.

याप्रमाणें जेथें अनेक बाह्यसाधनें आपआपला इष्ट परिणाम विद्यार्थ्यांच्या मनावर निरंतर करीत असतात, तेथें त्यांमुळेंच केवळ मुलांमध्यें आपल्या शाळेचा किंवा कालेजाचा अभिमान व प्रीति उत्पन्न झाल्यास तें साहजिकच नव्हे काय ? व अशा ठिकाणीं विद्यार्थीपणामध्यें मनावर झालेले उत्तम संस्कार जन्मभर कायम राहिले तर त्यांत नवल तें काय ? आतां लहान गोष्टींची मोठ्या गोष्टींशीं तुलना करूं नये हें खरें; कोठें धनाढ्य व स्वतंत्र इंग्लंड देश, व कोठें गरीब व दुबळा हिंदुस्थान ! इंग्लंडांतील शाळांत व पाठशाळांस केवढा लोकाश्रय व राजाश्र-

य आहे ? तेथील लोकांचें ज्ञान, कलाकौशल्य व संपत्ति हीं सर्व किती वाढलेलीं आहेत? व विद्येचें महत्व तेथील लोक किती चांगलें ओळखतात? या सर्व बाबतींत हिंदुस्थान फारच मागें आहे, तेव्हां एतद्देशीय शाळांची तिकडील शाळांशीं बराबरी कशी लागणार ?

परंतु या दोन देशांतील शाळांमध्यें हल्लीं जें महदंतर दिसत आहे, तेवढ्यावरूनच इकडील शाळा तिकडील शाळांची कधींच थोडी देखील बरावरी करणार नाहींत असें ह्मणतां येणार नाहीं. इंग्लंडांतील शाळांस हल्लीं जें स्वरूप आलें आहे, तें त्यांस या शतकापूर्वीं नव्हतें. मागील शतकांतील,-ह्मणजे जेव्हां त्या शाळांची स्थापना होऊन शें, दोनशें, तीनशें वर्षें होऊन गेलीं होतीं तेव्हांची-त्यांची स्थिति पाहिल्यास, ती आमच्या हल्लींच्या शाळांपेक्षां फारशी चांगली नव्हती. ज्याप्रमाणें राजाश्रय व लोकाश्रय मिळून तिकडील शाळा सारख्या सुधारत गेल्या, त्याप्रमाणेंच आमची ही शाळाहि सुधारत जाईल यांत शंका नाहीं. दुसरें असें कीं इंग्लंडांतील प्रमुख शाळांस जीं कित्येक बाह्य साधनें अनुकूल झालीं आहेत, तीं त्या शाळा शहराच्या भरवस्तीपासून दूर आहेत ह्मणून त्यांस प्राप्त झालेलीं आहेत. न्यू इंग्लिश स्कुलास शहरांत भरवस्तींतच राहिलें पाहिजे. कारण, मुलांस घरच्या घरीं ठेवून त्यांची फी देणें याहून अधिक सामर्थ्य पुष्कळ मातापितरांस नाहीं; व ही शाळा अशाच मध्यम स्थितींतल्या अल्पप्राप्तीच्या लोकांस आपल्या मुलांस सुलभपणें शिक्षण देतां यावें ह्मणून स्थापित केलेली आहे. तथापिही या शाळेस हल्लीं जितकीं बाह्यसाधनें अनुकूल आहेत तितकीं दुसऱ्या पुष्कळ शाळांस कोठें आहेत?

पुस्तकसंग्रहांत, यंत्रसंग्रहांत, वनस्पतींच्या संग्रहांत, नवीन चालू असलेल्या व लौकरच सुरू होणाऱ्या भव्य इमारतींच्या संबंधानें, व्यायामाच्या व खेळण्याच्या जागासंबंधानें आज या शाळेस बरेंच वर्चस्व प्राप्त झालेलें आहे, व त्यासंबंधानें तुह्मांस जसा शाळेचा अभिमान वाटण्याचें कारण आहे, तसें इतर पुष्कळ शाळांतील विद्यार्थ्यांस कोठें आहे? या शाळेची स्थापना होऊन पुरतीं पंधरा वर्षें झालीं नाहींत, तोंच तीस जी ही उत्कर्षस्थिति प्राप्त झाली आहे, तीवरून उत्तरोत्तर अधिक उत्कर्षाची आशा करणें स्वाभाविक आहे. या उत्कर्षासाठीं जेवढे श्रम पडतील तेवढे करायाचेच असा जसा आमचा निर्धार आहे, तसाच निर्धार तिचा अभिमान बाळगून, तुह्मीं विद्यार्थ्यांनींही मनांत धरिल्यास आपणा सर्वांच्या श्रमास पूर्णपणें यश येण्यास फारसा काळ लागेल असें मला वाटत नाहीं. इंग्लंडांत शहराच्या भरवस्तींत ज्या शाळा आहेत, त्यांमधील विद्यार्थी घरींच राहून शिक्षणापुरतें मात्र शाळेस जातात. अशा शाळांपैकीं ज्या कित्येक फार उत्तम गणिलेल्या आहेत, त्यांची तरी बऱ्याच अंशानें आपली ही शाळा कांहीं थोड्या वर्षांनीं बरोबरी करील अशी माझी पक्की उमेद आहे.

आतां **न्यू इंग्लिश स्कुलास** जरी पुणें सोडून बाहेर जातां येत नाहीं, तरी या शहरापासून दूर अशा एकाद्या रमणीय स्थलीं दुसरी शाळा स्थापन केल्यास, इंग्लंडांतील प्रमुख शाळा ह्मणजे **ईटन, हारो, रुग्बी** वगैरे **पब्लिक स्कूल्स**, यामध्यें ज्या प्रकारचें शिक्षण मिळतें, त्या प्रकारचें शिक्षण देणें सर्वथैव शक्य आहे. ज्या मातापितरांस व पालनकर्त्यांस आपल्या मुलांस **बोर्डिंगांत** ठेवण्यापुरती ऐपत

आहे त्यांस अशा शिक्षणाचा लाभ मुलांस करून देतां येऊं नये ही स्थिति इष्ट नाहीं. व ही गोष्ट लक्षांत आणूनच न्यू इंग्लिश स्कुलच्या जोडीस न्यू पब्लिक स्कूल ह्मणून दुसरी शाळा काढण्याचा आमचा विचार सुरू आहे. या शाळेंत होतां होईल तों शिक्षणाच्या कोणत्याहि अंतःसाधनांची किंवा बाह्यसाधनांची न्यूनता राहूं देऊं नये असा आमचा उद्देश आहे.

हल्लीं बोर्डिंगांतील विद्यार्थ्यांची संख्या फार थोडी आहे. परंतु ही संख्या लवकरच वाढेल असें सुचिन्ह दिसत आहे. ही संख्या दीडशेंपासून दोनशेंपर्यंत वाढून ती कायम राहते, असें दिसून येतांच बोर्डिंगांतील विद्यार्थ्यांची स्वतंत्र निराळी शाळा काढण्यास कांहींही हरकत राहणार नाहीं, व त्यांस पुण्याच्या भरवस्तींत ठेवण्याचेंही कारण उरणार नाहीं. बोर्डिंगास अशी सुस्थिति येण्यास फार दिवस लागणार नाहींत असें हल्लीं वाटत आहे, व या आशेनेंच पुण्याच्या पहिल्या पब्लिक स्कूलच्या स्थापनेचे विचार एव्हांच आमच्या मनांत घोळूं लागले आहेत. या नव्या शाळेस जी जागा पहायाची ती या शहरापासून फार लांब नसावी किंवा फार जवळ नसावी; तीस नदी, डोंगर, वगैरे सृष्ट देखाव्यांचें सांनिध्य असावें; भोंवतालीं विस्तृत मैदानें असावीं; असें तूर्त वाटत आहे. या ठिकाणीं ज्या इमारती बांधायाच्या, त्यांचा पुढचा भाग तरी मोठा भव्य असावा, व आंत कांहीं मोठे सुशोभित हॉल असावे असें योजिलें आहे. पुण्यापासून ही शाळा फार लांब न ठेवण्याचें कारण एवढेंच कीं न्यू इंग्लिश स्कूलच्या मुलांचा व नव्या शाळेच्या मुलांचा संबंध अगदींच तुटूं नये, एकमेकांचा सहवास

व संघट्टन होण्याचे वरचेवर प्रसंग यावे, व एकमेकांच्या मैत्रीनें व चढाओढीनें उभयतांचेंहि हित व्हावें. आतां कदाचित् दुर्दैवानें या नव्या शाळेच्या स्थापनेचा दिवस लांबणीवर पडेल, व हल्लीं जीं मुलें बोर्डिंगांत आहेत त्यांस त्या नव्या ठिकाणीं जातां येणार नाहीं. परंतु एवढ्यावरूनच तुह्मी सर्वांनीं शाळेचा किंवा बोर्डिंगाचा अभिमान कमी होऊं देऊं नये; या बोर्डिंगास पब्लिक स्कूलची उत्कर्षाची स्थिति येणार, व ती आपल्या सर्वांच्या प्रयत्नानें येणार, ही केवळ आशा देखील तुह्मांस अभिमान बाळगण्यास एक कारणच व्हावें.

इंग्लंडांत कित्येक कुटुंबें अशीं आहेत कीं त्यांचीं मुलें पिढ्यानपिढ्या एकाच शाळेंत शिकत आलीं आहेत. आपलीं मुलें दुसऱ्या शाळेंत पाठविण्याचा विचार त्यांच्या कधीं मनांतच येत नाहीं. ही त्यांच्या अभिमानाची गोष्ट लक्षांत धरून तुह्मींहि त्यांचें अनुकरण करावें. आईबाप मुलांस जी सर्वांत उत्कृष्ट देणगी देतात, ती विद्यादानाची होय. मुलांचें आयुष्य सुखी होण्याकरितां ते जो काय मोठा प्रयत्न करितात तो विद्यार्थीपणीं पालनपोषण करण्याचा होय. ज्या गोष्टी करणें तुमच्या आईबापांस शक्य नव्हतें. त्या आपल्या मुलांकरितां आपण करूं अशी उमेद व महत्वाकांक्षा तुह्मीं मनांत बाळगावी. ईटन वगैरे शाळांचे विद्यार्थी वर्षांतील एक नियमित दिवस 'शाळेचा सण' ह्मणून पाळतात. या सणाच्या संबंधानें विशेष ध्यानांत ठेवायाची गोष्ट ही कीं जो कोणी ईटनमध्यें विद्यार्थी होऊन बाहेर पडला तो बहुधा सर्व आयुष्यभर हा सण पाळतो, व आपण जगांत कोठेंहि असलों तरी आपल्या शाळेचा अभिमान विसरत नाहीं

असें दाखवितो. ईटनचे व तसेच दुसऱ्या प्रसिद्ध शाळांचे पूर्वीचे विद्यार्थी कोणत्याहि राजकारणी पक्षाचे असोत, त्यांस आपल्या विद्यार्थीपणाच्या मैत्रीचें विस्मरण होत नाहीं. कांहीं थोड्या वर्षांपूर्वी या देशाचे दोन गव्हर्नर व गव्हर्नरजनरल, तिघे मोठे अधिकारी एका ईटन शाळेचे माजी विद्यार्थी होते. ही गोष्ट त्यांस स्वतः जशी मोठ्या अभिमानाची वाटली, तशीच ती त्यांच्या शाळेस किती भूषणास्पद असली पाहिजे! बोर्डिंगांतील मुलांनीं या तिकडील शाळांसंबंधानें गोष्टी ध्यानांत धराव्या. "टाम् ब्राउन्स् स्कूल डेज्" वगैरे पुस्तकें त्यांनीं वाचल्यास अशा पुष्कळ गोष्टी त्यांस सांपडतील. शाळेंतील उत्तम मुलांचा व बोर्डिंगांतील मुलांचा, वयाच्या कांहीं एका इयत्तेपर्यंतचा इतिहास थोडक्यांत लिहून ठेवण्याचा आमचा हेतु आहे. तुमचे फोटोग्राफहि शाळेंत ठेवण्याचें योजिलें आहे. आणि या व अन्य उपायांनीं तुमचा शाळेशीं घडलेला संबंध दृढतर करण्याचा उद्देश आहे. याप्रमाणें आह्मी तुह्मांबद्दल जो विशेष अभिमान बाळगितों त्या अभिमानास तुह्मी पात्र आहां असें तुह्मीं आपल्या आचरणानें दाखविलें पाहिजे. तुमचे फोटोग्राफ पाहून व इतिहास वाचून शाळेंत व बोर्डिंगांत येणाऱ्या नवीन नवीन विद्यार्थ्यांस तुमच्या वर्तनाच्या अनुकरणाची ईर्षा व्हावी, असें तें वर्तन उत्तम असण्याविषयीं तुह्मी काळजी घेतली पाहिजे.

इंग्लंडांतील शाळा व कालेजें स्थापून कित्येक शतकें होउन गेलीं असल्याकारणानें त्यांस एक विशेष फायदा झालेला आहे; तो असा कीं, विद्यार्थी व शिक्षक यांच्या शेंकडों पिढ्या होऊन गेल्यामुळें, त्यांच्या अभिमानाचीं व सत्कृत्यांचीं फळें आजपर्यंत सांचत आलीं आहेत, व प्रत्येक

पिढींतील मोठमोठ्या कीर्तिमान् पुरुषांचा त्यांशीं जो संबंध झाला त्यामुळें त्यांस एक प्रकारचें विलक्षण महत्व व थोरवी आलेली आहे. नवीन विद्यार्थी शाळेंत किंवा कालेजांत जातांच तेथील नुसत्या देखाव्यानेंच त्याच्या मनांत उल्हासवृत्ति उत्पन्न होते, तशांत त्याचे नवीन मित्र जेव्हां त्यास प्रत्येक स्थळाचा इतिहास सांगूं लागतात, व जुन्या आख्यायिकांची पुनरावृत्ति करितात, तेव्हां या विद्यास्थानाचे कानेकोपरे देखील पूर्वींच्या प्रसिद्ध पुरुषांच्या वृत्तांतस्मरणानें पूज्य भासूं लागतात, व त्या कान्याकोपऱ्यांविषयीं देखील अभिमान व प्रीति उत्पन्न होते. अमुक प्रसिद्ध कवि आमक्या खोलींत रहात होता, अमुक प्रसिद्ध शास्त्रवेत्ता अमक्या दगडावर बसून विचारांत गढून जाऊन देहभान विसरे, अमुक उदार पुरुषानें विद्यार्थीपणाचे सुखाचे दिवस आठवून अमुक गोष्टीची शाळेस देणगी दिली, अमुक शिक्षकानें आपला फार दिवसांचा संबंध मनांत आणून अमुक नवीन संस्थेची स्वतःच्या खर्चानें उभारणी केली, मूळ संस्थापकानें अमुक नेमणूक करून दिली होती, राजाश्रयानें अमुक गोष्टी चालल्या आहे,—इत्यादि अनेक गोष्टी ऐकून नवीन विद्यार्थ्यांचें चित्त शाळेच्याच विचारांत गर्क होतें. अशा जुन्या संस्थांमध्यें विद्यार्थ्याचा समावेश होतांच त्याच्या मनास साहजिकपणें मोठी थोरवी वाटूं लागल्यास व ही आतां 'आपली' संस्था असें त्यास वाटून तिजविषयीं प्रेम, पूज्यबुद्धि व अभिमान उत्पन्न झाल्यास, त्यांत नवल तें काय? वर्ड्स्वर्थ कवि केंब्रिजमधील किंग्ज कालेजांत जेव्हां प्रथम गेला, तेव्हांच्या आपल्या मनोवृत्ति त्यानें एके ठि

काणीं वर्णिलेल्या आहेत. तेथें त्यानें असें ह्मटलें आहे. "*ज्या गवतावरून प्रसिद्ध पुरुषांच्या पिढ्यानपिढ्या चालत आल्या त्यांवरूनच मी चालत असतां माझें अंतःकरण सद्गदित झाल्यावांचून राहीना. ज्या दारांतून ते आंत शिरले त्यांतूनच आंत शिरतांना, ज्या ठिकाणीं ते निजले तेथेंच निजतांना.... माझ्या मनोवृत्ति स्तब्ध राहणें अशक्य होतें. या ठिकाणीं त्या असामान्य पुरुषांचा, फार तर काय, स्वतः न्यूटनचा देखील, मोठेपणा नाहींसा झाला असें वाटे. कारण त्यांच्या विद्यार्थीपणच्या गोष्टी ऐकून व तशींच त्यांचीं नित्याच्या पोषाखासहित काढलेलीं चित्रें पाहून, ते आपणांप्रमाणेंच मनुष्य होते, आपणांप्रमाणेंच विद्यार्थी होते, असें त्यांचें नम्र स्वरूप डोळ्यांपुढें उभें राहीं, व त्यांच्या काल्पनिक संगतीमुळें

---

* हें भाषांतर अगदीं तात्पर्यरूप आहे. मूळचा कविताभाग येणेंप्रमाणें आहे.

I could not print
Ground where the grass had yielded to the steps
Of generations of illustrious men,
Unmoved. I could not always lightly pass
Through the same gate-ways, sleep where they had slept,
Wake where they waked, range that inclosure old,
That garden of great intellects, undisturbed.
Place also by the side of this dark sense
Of noble feeling that those spriritual men,
Even the great Newton's ethereal self,
Seemed humbled in these precincts thence to be
The more endeared. Their several memories here
( Even like their persons in their portraits clothed
With the accustomed garb of daily life )
Put on a lowly and a touching grace
Of more distinct humanity, that left
All genuine admiration unimpaired.

WORDSWORTH: *Prelude.*

स्वतःच्या मोठेपणाचा मनास किंचित् भास होई! परंतु त्यामुळें त्यांविषयीं प्रेम किंवा पूज्यबुद्धि तिळमात्र देखील कमी होऊं नये."

ज्या संस्थांची स्थापना होऊन अद्यापि पुरतीं दहा पंधरा वर्षेंही झालीं नाहींत, त्यांस या प्रकारचें जुन्या संस्थांचें वैभव इतक्यांत कसें प्राप्त होईल? ही गोष्ट निरुपायाची आहे. तथापि आमच्या या तरुण संस्थांच्या भोंवतींही कालांतरानें थोर पुरुषांचीं व त्यांच्या चरित्रांचीं स्मारकें उत्पन्न होतील अशी प्रबळ आशा आहे. कोणी विद्यार्थी ह्मणून, कोणी शिक्षक ह्मणून, कोणी साहाय्यकर्ते ह्मणून, अनेक लोकांचा या संस्थांशीं संबंध जडत चालला आहे; व त्यांपैकीं ज्ञानानें, औदार्यानें, नीतीनें, पराक्रमानें किंवा देशसेवेनें जे हल्लीं प्रसिद्धीस आले आहेत किंवा पुढें येतील, त्यांचीं शक्त्यनुसार, अल्प स्वल्प का होईना, तशीं तरी स्मारकें करून ठेवावीं असा आमचा उद्योग सुरू आहे. या संस्थांच्या मूळ संस्थापकांपैकीं दोघांस तर अल्प वयांतच या जगाचा त्याग करून परलोकवासी व्हावें लागलें! आपल्या अलौकिक परिश्रमांचें सार्थक झालेलें पाहण्यास देखील ईश्वरानें त्यांस अवधि दिली नाहीं! **विष्णुशास्त्री चिपळूणकर** यांचें चरित्र सर्वांस माहित आहेच. त्यांच्या मरणसमयीं माझा या संस्थांशीं संबंध नव्हता. परंतु **वामनरावजी आपल्यांच्या** मरणकाळची हृदयद्रावक स्थिति अद्यापि माझ्या डोळ्यांपुढें उभी राहत आहे. त्या दुःखकारक प्रसंगास आजच दोन वर्षें झालीं. **वामनरावजींस** आपण चालविलेल्या संस्थांचा इतका अभिमान व इतकी कळकळ होती कीं ज्वरानें प्रकृति क्षीण झाली असतांही मरणापूर्वी कांहीं दिवस त्यांनीं

शाळेंत यावें व शाळेचें काम चांगलें चाललें आहे असें पाहून समाधान मानावें. अंथरुणांत एका कुशीचें दुसऱ्या कुशीस वळतां येत नव्हतें, तरी देखील कालेजाच्या सुस्थितीविषयींच विवंचना त्यांच्या मनांत घोळत होती. आपण बरे होऊं अशी आशा मनांत येऊन आपल्या राहिलेल्या कामाच्या पूर्णतेविषयीं त्यांनीं केव्हां गोष्ट काढावी, केव्हां आतां आपण जगत नाहीं असें मनांत येऊन त्यांचे डोळे अश्रूंनीं भरून यावे. अशी स्थिति शरीरास निश्चेष्टता येईपर्यंत चालू होती! परंतु याप्रमाणें जरी शरीराचे व्यापार बंद पडले, तरी मनाचे व्यापार पुढें कांहीं थोडा वेळ सुरू असतीलच, व त्या थोड्या वेळांत त्यांच्या मनांत कोणते विचार आले असतील हें कोण सांगेल! कदाचित् या आपल्या संस्थांचें पुढें काय होईल, आपणांप्रमाणें त्यांची कोण काळजी बाळगील, आपल्या मित्रांच्या प्रयत्नांस कितपत यश येईल, ईश्वरानें आपणांस आपल्या श्रमांची सार्थकता पाहण्या पुरतें थोडें अधिक कां आयुष्य दिलें नाहीं—इत्यादि दुःखमय विचारांच्या चिंतनांत त्यांचा अंत झाला असेल! कदाचित् आपले मित्र आपली उणीव भासूं देणार नाहींत, ते आपले परिश्रम द्विगुणित करतील, व जी कार्यसिद्धि आपण या लोकीं पहावी अशी ईश्वराची इच्छा नाहीं ती आपण परलोकाहून तरी पाहूं, अशी आशा मनांत येऊन त्यांचा अंत समाधानानें झाला असेल! होय. आह्मां सर्वांचा त्यावेळीं असाच निर्धार झाला होता. जर आपलें मनोगत त्यांस कळविण्याचा त्या वेळीं कांहीं उपाय असता तर हा आपला निर्धार त्यांस कळवून त्यांस आश्वासन देण्यास प्रत्येकजण तयार होता. जर देहपाशांतून मुक्त झालेल्या त्यां-

च्या आत्म्यास आमच्या हृद्यांत शिरून आमचा निर्धार जाणतां आला असेल, तर त्या आत्म्यास तत्क्षणींच समाधान वाटलें असेल. असो. **शास्त्रीबुवा** व **आपटे** या उभयतां मुख्य संस्थापकांचीं स्मारकें करण्याची खटपट हल्लीं सुरू आहेच, व त्या स्मारकांचा मुख्यत्वेंकरून या आमच्या संस्थांशीं संबंध राहील अशी माझी आशा आहे.

ज्या **कालेजाच्या** इमारतीचा नुसता पाया **वामनरावांनीं** पाहिला, ती भव्य इमारत पूर्ण होत आली आहे. **न्यू इंग्लिश स्कुला**करितां **नाना**च्या वाड्याच्या जागीं तशीच नवी मोठी इमारत बांधण्याचें काम लवकरच सुरू होईल; आणि हल्लींप्रमाणेंच पुढेंही लोकाश्रय मिळत राहिला, तर **नव्या पब्लिक स्कूल**च्या इमारतीचाही पाया लवकरच घातला जाईल. **वामनरावां**च्या मरणानंतर या ज्या कित्येक गोष्टी घडून आल्या आहेत, त्याच आमच्या आतां सांगितलेल्या निर्धाराची साक्ष देतील.

आतांपर्यंत सांगितलेल्या या सर्व गोष्टी ऐकून तुमच्या मनांत या संस्थांविषयींच्या अभिमानाची कांहीं थोडी तरी प्रेरणा झालीच असेल. तीच दृढतर करावी या हेतूनें, शाळेंतील व **बोर्डिंगां**तील मुलांशीं आपला कोणत्या प्रकारचा संबंध आहे असें मी व माझे मित्र मानितात व माझ्या व माझ्या मित्रांच्या मनांत तुह्मांविषयीं कोणत्या मनोवृत्ति वागत आहेत, हें तुह्मांस थोडक्यांत सांगतों. या मनोवृत्ति प्रसिद्धपणें सांगण्याचा आजपर्यंत प्रसंग आला नव्हता, परंतु आजच्या प्रसंगीं त्या व्यक्त करणें उचित दिसतें.

माझें सर्वस्वी हित चिंतणाऱ्या माझ्या एका जवळच्या

आप्तानें मला एक वेळ विचारलें कीं, " हें शाळेचें काम पतकरून थोड्या पगारावर जन्मभर श्रम करीत राहण्याची ही बुद्धि तुह्मांस कोठून सूचली? तुह्मीं दुसऱ्या कोठें नौकरी पतकारिली असती तर पगार अधिक मिळाला नसता काय? व तुमचें कुटुंब अधिक सुखी झालें नसतें काय?" या प्रश्नास मीं जें उत्तर दिलें तें असें:-" होय. द्रव्यप्राप्तीच्या मानानें मीं आपलें नुकसान करून घेतलें आहे खरें. परंतु मोठ्या प्राप्तीचे सर्वच लोक सारखे सुखी कोठें असतात? कोणी मोठें घर बांधतो, व त्यांतच त्याच्या प्राप्तीचा मोठा भाग खर्च होऊन जातो; कोणी मुलींचीं लग्नें करितां करितां जेरीस येतो; कोणाच्या मागें मुलांच्या विद्याभ्याससंबंधानें नानाप्रकारचे खर्च लागतात; कोणास पूर्वीचें मातापितरांनीं केलेलें कर्ज फेडायाचें असतें; कोणी दुर्व्यसनास लंपट होऊन आपली हानि करून घेतो; कोणाच्या मागें मूर्ख मुलांच्या व्यवस्थेचे पाश लागून, त्यांची काय तर्तूद करून ठेवावी असें त्यास होतें; व कोणास द्रव्यसंचयाचें एवढें वेड असतें कीं त्याची मोठी प्राप्ति असून नसल्यासारखीच होय. अशा अनेक कारणांनीं मोठ्या प्राप्तीच्या लोकांसंबंधानें पहातां त्यांस स्वतःच्या सुखास आपल्या प्राप्तीचा फारच थोडा अंश लावितां येतो, किंवा आपल्या अगदीं जवळच्या आप्तांना फारच थोडें सुखी करितां येतें. नेकीनें वागणाऱ्या पुष्कळ मामलेदार, मुनसफ वगैरे मोठ्या प्राप्तीच्या कामगारांस या गोष्टीचा अनुभव असेलच.

" आतां या स्थितीस पुष्कळ अपवाद आहेत यांत संशय नाहीं. तथापि माझ्या स्वतः संबंधानें तुह्मी अशीच कल्पना करा कीं, माझी प्राप्ति फार मोठी आहे; परंतु माझें

कुटुंब व माझा प्रपंच त्या प्राप्तीच्या मानानें पहातां अधिकच मोठा आहे. असें समजा कीं, आह्मीं शाळेचे व्यवस्थापक हे दहाजण बंधु असून सालीना पन्नास हजार रुपये उत्पन्नाची समाईक इस्टेट आमच्या स्वाधीन झाली आहे. या इस्टेटीची व्यवस्था लावण्यास सर्व दहाजणांनीं अहोरात्र श्रम करूनही भागत नाहीं; लहानमोठ्या पगाराचीं आणखीं पन्नास माणसें हाताखालीं मदतीस ठेवावीं लागतात. **शाळा व कालेज** हेंच आमचें मोठें कुटुंब. या कुटुंबांतील हजार पंधराशें माणसांची योग्य व्यवस्था राहिली पाहिजे, एवढाच आमचा हेतु आहे. सामान्य जन आपल्या मुलांबाळांकरितां जे श्रम करितात, ज्या अडचणी सोसतात, त्याच आह्मी सोशीत आहों. व आपलीं मुलेंबाळें सन्मार्गास लागलीं आहेत, तीं सुखरूप आहेत, तीं लौकिक संपादित आहेत व आपआपला प्रपंच उत्तम प्रकारें पहात आहेत, असें पाहून कोणाही मातापितरांस जसा आनंद होतो व ते जसे आपले सर्व कष्ट विसरून जातात, त्याच प्रकारचा आनंद आपल्या विद्यार्थ्यांनीं याच गोष्टी केलेल्या पाहून आह्मांस होतो, व आह्मीं केलेल्या कष्टाचें आह्मांस कांहींच वाटेनासें होतें.

"आपल्या मुलांनीं हवाशीर जाग्यांत रहावें, त्यांस रोगराई होऊं नये, ह्मणून आम्ही हजारों रुपये खर्चून इमारती बांधीत आहों; आपल्या मुलांची विद्येविषयीं व शास्त्राविषयीं अभिरुचि वाढावी व त्यांस त्यांची प्राप्ति सुलभपणें व्हावी, म्हणून आम्ही पुस्तकांचा, यंत्रांचा व सृष्ट पदार्थांचा संग्रह करीत आहों; मुलांच्या शरीरास शक्ति व आरोग्य यावें, त्यांचीं मनें प्रफुल्लित रहावीं, त्यांनीं आपल्या चिंता विसरा-

त्या, म्हणून आम्हीं व्यायामशाला बांधल्या आहेत, मोठीं पटांगणें ताब्यांत घेतलीं आहेत व मोठ्या बागा तयार करण्याच्या खटपटींत आहों. आमच्या मागचे खर्च एवढ्यानेंच संपले असें नाहीं. आपल्या मुलांस सुंदर कलांची आवड असावी व त्यांस त्या कलांचें ज्ञान सुलभपणें व्हावें म्हणून आमचा चित्रांचा संग्रह चाललाच आहे; गायनवादनाचें ज्ञान त्यांस कसें करून द्यावें याविषयीं विचार चालू आहेच; शिल्पकामांत त्यांची गति होऊन स्वतंत्र उद्योगाची व तशीच हस्तकौशल्याची त्यांस हौस उत्पन्न व्हावी म्हणून एक शिल्पशाळा काढण्याचें घाटत आहेच; याशिवाय विद्वत्ता, शौर्य, धार्मिकता वगैरे भिन्न गुणांची ज्याच्या त्याच्या मनाच्या निरनिराळ्या कलाप्रमाणें त्यास स्फूर्ति व्हावी म्हणून आपल्या देशांतील प्रसिद्ध विद्वद्रत्नांच्या, प्रसिद्ध राजकारणी पुरुषांच्या, प्रसिद्ध शूर शिपायांच्या, प्रसिद्ध साधुसंतांच्या तसबिरी मिळवून त्या मुलांच्या नित्य दृष्टीस पडतील अशी योजना केव्हां तरी करणें जरूर वाटत आहेच.

"असो, या प्रकारच्या ज्या अनेक आवश्यकता आज दिसत आहेत व ज्या भागल्या म्हणजे आपलें काम संपलें, मग आपणांस खुशाल विश्रांति घेतां येईल, असें जों मनांत आणावें तों वरचेवर नवीनच कांहीं आवश्यकता उत्पन्न होतात. या कारणानें या आमच्या प्रपंचाची ओढाताण कधीं संपेल ती संपो; सालीना पन्नास हजारांचें उत्पन्न असून त्याचा केव्हांच चुराडा उडून जातो. आमच्या अडचणी व आमचीं संकटें जाणून पुष्कळ सुज्ञ लोकांनीं आमच्या या थोरल्या कुटुंबाचा आप्तपणा स्वीकारिला आहे; आमच्या आप्तांची संख्या पाहिल्यास कोणाही एका व्यक्तीच्या आप्तांच्या संख्येहून फार

मोठी आहे; परंतु आमच्या मतें ती अद्यापि असावी तेवढी नाहीं. जे थोर मनाचे पुरुष आमचे आप्त, इष्टमित्र बनले आहेत त्यांजकडून शक्त्यनुसार आह्मांस मदत होत आहे, परंतु आमच्या तिजोरीची तूट अद्याप भरून येत नाहीं, व आमच्या मागची विवंचना सुटत नाहीं. आमच्या या थोरल्या प्रपंचाच्या भरीकरितां भीड व लज्जा सोडून याचनाही आह्मीं आरंभिली आहे, व जो कोणी परमार्थबुद्धीनें जे देईल तें घेण्यास आमचा हात पसरलेला आहेच. अशा प्रकारें या बड्या प्रपंचाचा जड गाडा आह्मी हाकीत आहों, आमची मदार आमच्या स्वतःच्या प्रयत्नांवर व लोकांच्या आश्रयावर आहे. परंतु जेव्हां आमची शाळेंतील मुलें स्वतः कर्तीं सवरतीं होतील, तेव्हां तीं आमच्या वृद्धपणीं आह्मांस मदत करतील व आमचा भार हलका करतील अशी आमची पूर्ण अशा आहे; व या आशेनेंच आज आमचें बळ दुणावत आहे.

" आतां या आमच्या मनाच्या स्थितीची तुह्मांस कदाचित् कल्पना येणार नाहीं. शाळेंतील विद्यार्थी हेच आपलें कुटुंब, शाळेच्या इमारती याच आपल्या विश्रांतीच्या जागा, शाळा शृंगारणें हाच काय तो नाद, व शाळेस भरभराटीस आणणें यांतच जन्मसाफल्य, असें कोणी मानील तरी कसें अशी मोठी शंका तुमच्या मनांत येईल. परंतु व्यक्ति तितक्या प्रकृति. तुह्मांस माहीत आहे कीं कोणी मनुष्य आपली मुलगी सुस्थळीं पडावी ह्मणून ऐपतीबाहेर कर्ज काढून आपलें कार्य करून घेतो; कोणी एवढ्याशा जमिनीच्या तुकड्याकरितां वर्षानुवर्ष वाद सांगून भिकेस लागतो, कोणी व्यापाराचे सट्टे करून त्यांत आपली संपत्ति गमा-

वितो, कोणी दुर्व्यसनलंपट होऊन अब्रूची चाड न धरितां किंवा शरीराच्या हानीची परवा न करितां धुळीस मिळतो. असे सर्व लोक आपआपल्या छंदांमुळें आपलें व आपल्या कुटुंबाचें हित विसरून जात नाहींत काय? मोठी प्राप्ति असूनही ती त्यांच्या कामीं येते काय? आमचीही कांहीं अंशी त्यांसारखीच स्थिति आहे असें समजा ह्मणजे झालें. आह्मीं आरंभिलेलें कार्य आह्मांस एखाद्या व्यसनाप्रमाणेंच जडलें आहे असें समजल्यास आमच्या अंतःकरणाची स्थिति तुमच्या लक्षांत येईल."

हें मीं आपल्या आप्तास जें उत्तर दिलें, त्यावरून तुह्मां विद्यार्थ्यांचा व आमचा कोणत्या प्रकारचा संबंध आहे असें मी मानितों, या गोष्टीचा तुह्मांस बोध होईल. तुमचें हित साधावें याहून दुसरा वरीष्ट हेतु आमच्या मनांत वागत नाहीं, या गोष्टीस आमचे निरंतर चालू असलेले प्रयत्नच प्रमाण होत. जर कोणास वर सांगितलेले उद्गार दांभिकपणाचे वाटतील तर त्यास आमचा काय उपाय? अंतःकरणांतील मनोवृत्ति ईश्वरावांचून दुसरा कोणी जाणत नाहीं, व या कामीं तोच आमची साक्ष देईल. तुमचा आमचा जो संबंध वर सांगितला त्याचा तुम्हांस प्रत्यय आल्यास तुम्हांकडून जें प्रेम, जो अभिमान व जें साहाय्य मिळावें अशी आम्ही आशा करितों तें तुम्ही कृतज्ञबुद्धीनें द्याल यांत शंका नाहीं.

आतां सांगितलेलें उत्तर ऐकून माझ्या आप्ताचें समाधान झालें नाहीं, कारण तें उत्तर केवळ व्यावहारिक मनुष्याच्या दृष्टीनें मीं दिलें, असें त्यास वाटलें. मीं आपला खरा आशय प्रगट केला नाहीं अशी त्याची साहजिक समजूत झाली. तुम्हांसही कदाचित् असेंच वाटलें असेल;

म्हणून त्याशीं उत्तरादाखल जें आणखी बोलणें झालें तेंही तुम्हांस सांगतों.

मी त्यास सांगितलें कीं जगांत तीन प्रकारचीं माणसें आढळतात, त्यांपैकीं एक प्रकार म्हटला म्हणजे केवळ स्वार्थावर नजर देणाऱ्या कोत्या समजुतीच्या लोकांचा, दुसरा प्रकार परोपकारी व दूरदृष्टीच्या लोकांचा, व तिसरा मध्यम प्रतीच्या लोकांचा, म्हणजे जे केवळ स्वार्थपरायण नाहींत परंतु फारसे परोपकारीही नाहींत, ज्यांची दृष्टि फार दूरवर पोहोंचत नाहीं परंतु ती अगदींच आकुंचितही नाहीं. पहिल्या वर्गांतील माणसांची संख्या बरीच मोठी आहे, परंतु ती मोठी असण्याचीं कारणें अज्ञान, अविचार, दारिद्र्य, दुःसंगति वगैरे अनेक आहेत. कोणीही मनुष्य स्वभावतःच निव्वळ आपल्पोट्या असेल असें मला वाटत नाहीं, परंतु हा दुर्गुण जडण्यास व त्याचा मनुष्यावर पगडा बसण्यास अल्प कारणही पुरतें. कोत्या समजुतीच्या मनुष्यास पैसा मिळवावा हें कळतें, परंतु त्याचा सत्कारणीं व्यय करावा हें समजत नाहीं. आपल्या दाराशीं कोणी अंधळा पांगळा दुबळा भिकारी येईल या भीतीनें तो आपलीं दारें कड्या लावून बंद ठेवील; ऐषआरामाच्या किंवा कलाकौशल्याच्या कामाचा त्यास अत्यंत तिटकारा असावयाचा. "हें घेऊन यानें काय पोट भरावयाचें आहे?" असें तो ह्मणेल. व्यवहारज्ञानाबद्दल या प्रकारच्या मनुष्यास जितकी घमेंड असते, तितकी थोड्याच दुसऱ्या लोकांस असेल. खर्चाच्या भीतीनें तो चांगल्या घरांत राहणार नाहीं; खर्चाच्या भीतीनें तो चांगलें अन्न खाणार नाहीं; खर्चाच्या भीतीनें धर्माचें किंवा परोपकाराचें काम त्याच्या हातून कदापि होणार नाहीं; परं-

तु जी गोष्ट आपण करीत नाहीं ती करण्यास उचितच नव्हे असें दाखविण्याचा त्याचा सदोदित प्रयत्न असेल, व चांगल्याही कामाचे त्यास दोष मात्र दिसतील. दोवा माणसांतील तंटा सोडविण्यास कोणी गेल्यास, “ या चोंबडेपणावांचून यास काय गरज होती? त्यांनीं एकमेकांचे गळे कापले असते तर याचें काय जात होतें?” कोणी देवालय बांधायास निघाला तर “कोण छांदिष्टपणा हा! आजपर्यंत देवालयें नव्हतीं ह्मणून का कोणाचें अडलें होतें?” कोणी मोठें सुंदर घर बांधूं लागल्यास, “ आजपर्यंत असलीं घरें नव्हतीं ह्मणून कोणी मेला होता काय?” याप्रमाणें प्रत्येक चांगल्या कामावर या व्यवहारज्ञांची टीका आहेच. कोणतीही नवीन गोष्ट कोणी करूं लागल्यास त्यांस जो राग व तिटकारा येतो व ज्या कुत्सित कल्पना त्यांच्या मनांत भरतात त्या सांगतां पुरवणार नाहींत. लोकांस ठकविणें, बुडविणें, भलत्या नादास लावणें, धर्महानि करणें इत्यादि अनेक दुष्ट हेतूंचा नवीन कृत्य आरंभणारावर ते आरोप करतील, व तेवढ्यानें त्यानें आपलें काम सोडून न दिल्यास, त्याचा पाडाव व फजिती करण्याकरितां ते खोट्याच वाईट गोष्टी रचून त्या प्रसिद्धीस आणतील. “पहारे बुवांनो! आज असें झालें, उद्यां अमुक होणार ह्मणून ऐकतों, कोणावर काय प्रसंग येईल याचा नेम नाहीं, सावध असा, नाहीं तर या माणसाच्या नादीं लागून नाहक बुडाल!” याप्रमाणें जे कोणी आपल्यासारखेच नाहींत त्या सर्वांवर वाईट टीका करण्याचें त्यांस एवढेंच कारण असतें कीं आपल्या व्यवहारज्ञानाबद्दल आपली प्रतिष्ठा व्हावी, आपण जी गोष्ट करीत नाहीं ती करणें योग्यच नव्हे असें लोकांस भासावें,

व विशेषतः आपल्या आळसावर व आपलपोटेपणावर पांघरूण पडावें. ज्यास स्वतः कोणतीही चांगली गोष्ट करावयास नको असते, त्यास जे दुसरे ती करीत असतील त्यांस विघ्न करण्यास पुष्कळ वेळ सांपडतो. अशा लोकांपासून शेजाऱ्यापाजाऱ्यांस, गांवच्या लोकांस, किंबहुना सर्व राष्ट्रास प्रसंगविशेषीं मोठी भीति असते. आपल्या कवडीच्या फायद्यासाठीं दुसऱ्याचें हजारों रुपयांचें नुकसान झालें तरी ते फिकीर करीत नसतात. आपलें कोणीं थोडें नुकसान केल्यास त्याचा सूड उगविण्याकारितां त्याचें ते कितीही नुकसान झालें तरी मागें पुढें पहायाचे नाहींत. व आपल्या स्वतःच्या प्राप्तीकरितां देश बुडाला तरी बेहेत्तर आहे असा त्यांचा निश्चय असतो. चहाडी करणें, शत्रूंस फितूर होणें, कोणावर अकस्मात् घाला घालणें, हीं नीच कृत्यें या प्रकारच्या लोकांकडून होतात. या लोकांच्या प्रती लावणें झाल्यास नीचपणा, विघ्नसंतोषीपणा, कवडीचुंबकपणा, निर्दयता, विश्वासघात इत्यादि दुर्गुणांचें कमी अधिक प्राबल्य पाहूनच लाविल्या पाहिजेत. मनुष्य आपलपोटेपणाच्या आधीन झाल्यावर कोणकोणत्या दुष्ट गोष्टी करण्यास तयार होईल हें सांगणें कठीण आहे !

या प्रकारचे लोक जगांत आरंभापासून आहेतच. परंतु जर सर्वच लोक पहिल्यापासून असे असते तर आज जगाची कशी स्थिति आपणांस दिसली असती या गोष्टीची कल्पना करा. आज पावेतों माणसें शुद्ध रानटी स्थितींत राहिलीं असतीं, झोपड्या बांधूनच त्यांनीं निर्वाह केला असता, त्यांमध्यें कलाकौशल्याचा व ज्ञानाचा पूर्ण अभाव राहिला असता, परस्परांमध्यें नित्य भांडणतंटे सुरू असते,

व क्रूरतेचीं आणि विश्वासघाताचीं कृत्यें प्रत्यहीं घडलीं असतीं, कोणाचाही उत्कर्ष दुसऱ्यांस सहन झाला नसता, व कोणाचेंही पुढें पाऊल पडलेलें इतरांस पाहवलें नसतें.

ही स्थिति जगास न येण्याचें कारण दुसऱ्या प्रकारचे लोक दर पिढीस थोडे थोडे उत्पन्न होत गेले हें होय. लोकांच्या हिताकरतां झटणें, कांहीं मोठी गोष्ट आपल्या हातून घडण्यासारखी असल्यास तिच्या सिद्धीकरितां आपलें पाहिजे तें नुकसान करून घेणें, मानसिक परिश्रमानें विशेष ज्ञान संपादन करणें, सत्कार्यास निरंतर मदत व उत्तेजन देणें, वृथा लोकापवादास न भिणें, हे व असेच दुसरे गुण या दुसऱ्या वर्गांतील माणसांमध्यें दिसतात. या वर्गांतील लोकांनीं जे संतत श्रम केले, त्यांनीं जो स्वार्थत्यागाचा कित्ता घालून दिला, इतरांच्या दुराग्रहामुळें त्यांस जीं संकटें भोगावीं लागलीं, जे हाल व जीं दुःखें सोसावीं लागलीं, त्या सर्वांमुळेंच केवळ हल्लींची सुस्थिति आपणांस प्राप्त झाली आहे.

ईश्वराच्या आराधनेसाठीं जीं सुंदर देवालयें जागोजाग बांधलेलीं दिसतात तीं कोणीं बांधिलीं? मोठमोठ्या नद्यांस जे ठिकठिकाणीं घाट बांधलेले आहेत, ते कोणीं बांधले? मोठ्या विशाळ वृक्षांचें बीजारोपण कोणीं केलें व त्यांच्या छायेखालीं थकल्या भागलेल्यास सुखानें बसतां यावें ह्मणून त्यांस पार कोणीं बांधिले? प्रवाशांच्या सोईकरितां धर्मशाळा कोणीं बांधिल्या? विहिरी व तलाव कोणी खणले, अन्नछत्रें कोणीं स्थापिलीं? ज्ञान व सदाचार यांच्या वृद्धीकरितां सर्वस्व त्याग कोणीं केला? धर्मस्थापना व स्व-

राज्यस्थापना यांसाठीं कोणीं भगीरथ प्रयत्न केले ? स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठीं कोणीं आपले देह बळी दिले ?

या सर्व गोष्टी आत्मनिरपेक्ष, दूरदर्शी व परोपकारी अशा पुरुषांनीं केल्या. अशा पुरुषांस अज्ञान, उन्मत्त, अविचारी, दुराग्रही, आपलपोटे अशा लोकांकडून किती अडथळा झाला, त्यांस किती संकटें व यातना सोसाव्या लागल्या, या गोष्टींची कल्पना एकट्या हिंदुस्थानांतील थोर पुरुषांचीं चरित्रें वाचूनही येण्यासारखी आहे. परंतु ही कल्पना पूर्णपणें मनावर बिंबण्यास युरोपांतील थोर पुरुषांचीं चरित्रें वाचलीं पाहिजेत्. कारण तेथें सत्पुरुष आणि दुष्ट पुरुष यांमधील युद्ध कित्येक शतकेंपावेतों मोठ्या कडाक्यानें सुरू होतें. दुष्ट पुरुषांस धर्मबळ, राजसत्ता व संपत्ति हीं सर्व अनुकूल होतीं. सत्पुरुषांस सत्यनिष्ठेचें, परोपकारबुद्धीचें व सुविचाराचें मात्र पाठबळ होतें, व त्यांचा सर्व हवाला केवळ ईश्वरावर होता. तेथें अशी स्थिति असतां अखेरीस सत्पुरुषांचाच जय होत गेला, सत्याचें व सुविचारांचेंच प्राबल्य होत गेलें व दुष्ट पुरुषांसही सौम्य स्वरूप धारण करून सत्पुरुषांचें बाह्यात्कारी तरी अनुकरण करणें भाग पडलें. ईश्वरी संकेताप्रमाणें मनुष्याच्या उन्नत स्थितीची व कर्तव्याची दिशा कोणती हें याप्रमाणें युरोपाच्या इतिहासावरून विशेष लक्षांत येतें.

आतां वर सांगितलेलीं परोपकारकृत्यें करणाऱ्या सत्पुरुषांच्या हेतूंची पहिल्या वर्गांतील व्यवहारज्ञांच्या रीतीनें परीक्षा करूं लागल्यास ते सर्व थोर पुरुष मूर्ख व छांदिष्ट ठरतील ! कारण हीं कृत्यें करतांना त्यांनीं आपणा स्वतःस काय फायदा होणार याचा मुळींच विचार केला नाहीं. परंतु

ज्याचे विचार अद्यापि इतके कोते व कुत्सित झाले नाहींत त्यास त्या महात्म्यांच्या औदार्याविषयीं निदान आश्चर्य तरी वाटेल, व त्यांविषयीं थोडी तरी कृतज्ञता त्याच्या हृदयांत उत्पन्न होईल. पहा कीं ज्यांनीं स्वदेशाच्या स्वातंत्र्यासाठीं आपले जीव अर्पण केले, त्यांना स्वतःला त्या देशापासून किंवा स्वातंत्र्यापासून कांहीं तरी उपयोग होणार होता काय? ज्यांनीं पराकाष्ठेचे श्रम करून गहन विषयांचें ज्ञान संपादन केलें त्यांस तें लिहून ठेवण्यांत स्वतःचा कांहीं फायदा वाटला असेल काय? ज्यांनीं अन्नछत्रें घातलीं, ते पुरुष उपाशी मरत होते काय? ज्यांनीं विहिरी, तलाव व घांट बांधले, ते निरंतर तहानेनें व्याकुळ झाले होते काय? ज्यांनीं देवालयें बांधलीं त्यांच्या हातून निरंतर नरकवास होईल अशीं कांहीं भयंकर पातकें घडलीं होतीं काय? छेः छेः असा प्रकार असण्याचा बिलकुल संभव नाहीं. अशीं कृत्यें करणारांचें त्यांपासून स्वतःचें फारच थोडें हित होणार होतें; त्यांचा उपयोग दुसऱ्यांसच व्हावयाचा, व ह्मणूनच अशा कृत्यांस परोपकाराचीं कृत्यें असें आपण ह्मणतों.

परंतु अन्नछत्रांत फुकाचें जेवून, विहिरीचें स्वच्छ शीतळ पाणी पिऊन, धर्ममंदिराच्या थंड सभामंडपांत सुखानें बसून, किंवा सायंकाळीं घाटावर चैनीनें हवा खात पडून, जेव्हां कोत्या बुद्धीचे लोक व्यवहारज्ञानाच्या गोष्टी सांगतात, व आपल्या काळच्या परोपकारी पुरुषांस मूर्ख, दांभिक किंवा पापाचारी ठरवितात, किंवा दुसरीं अनेक दूषणें देतात, तेव्हां खरें व्यवहारज्ञान कोणास आहे ह्मणून समजावें? ज्यानें तें देवालय किंवा तो घाट बांधिला त्यास, किंवा त्यावर बसून यथेष्ट गप्पा मारणारास? खाणें, पिणें शरीरवा-

सना पुरविणें, व द्रव्यसंचय करणें, आपल्यापुरता विचार करून तटस्थ राहणें किंवा दुसऱ्यास उपद्व्याप करणें, हेंच शहाणपणाचें सर्वस्व असाच जर सर्वांनीं, विचार केला, तर हें जग आतां आहे तसें सुंदर राहणार नाहीं, सामान्य मनुष्यास त्यापासून आतां इतका सुखाचा लाभ होणार नाहीं व मोठ्या उदार अंतःकरणाच्या पुरुषांस तें राहण्यासही योग्य नव्हे असें वाटूं लागेल.

याप्रमाणें मनुष्यांचे मुख्य जे दोन प्रकार त्यांमधील भेद सांगितला. बाकी राहिलेल्या तिसऱ्या प्रकारचे लोक उभतांचेही गुणावगुण कमी अधिक प्रमाणानें घेऊन आपला चरितार्थ चालवितात, तेव्हां त्यांविषयीं कांहीं विशेष सांगायास नको. या तीन प्रकारांपैकीं कोणता उत्कृष्ट, कोणता अनुकरणीय, असें विचारिल्यास तो परोपकारी पुरुषांचा असें हल्लींच्या काळांत कोणीहि सांगेल. परंतु तो तुह्मीं स्वीकारिला आहे काय? त्यांत आपली गणना व्हावी असें तुह्मीं कांहीं थोडें तरी केलें आहे काय? असें विचारिल्यास मग मात्र पुष्कळांस काय उत्तर द्यावें याचा संदेह पडेल. ज्या मंडळींनीं ही शाळा स्थापिली व जे ती हल्लीं चालवीत आहेत त्यांचा तरी असा निश्चय आहे कीं आपली परोपकारी पुरुषांत गणना व्हावी. परोपकारित्वाच्या पुष्कळ प्रती आहेत; त्यांपैकीं शेवटच्या प्रतींत तरी आपला समावेश व्हावा अशाकरितां आपल्या शक्त्यनुसार व व्यवसायानुसार जेवढें ह्मणून लोककल्याण आमच्या हातून होण्यासारखें आहे तेवढें करण्यास आह्मी झटत आहों. प्रत्येकानें आपल्या स्वार्थाचा विचार थोडाबहुत तरी बाजूस ठेविला आहे व आपलें थोडें बहुत तरी

नुकसान करून घेतलें आहे. आपण आरंभिलेल्या विद्यादानाच्या कामास दिवसानुदिवस अधिक पूर्णावस्था यावी, आपल्या संस्थेच्या द्वारें लोकांत विद्येची अभिरुचि वाढून ती त्यांस सुलभपणें मिळावी, लहान वयांत मुलांस सदाचाराची संवय लागावी व त्यांची परोपकाराकडे प्रवृत्ति व्हावी, या करितां जेवढे ह्मणून प्रयत्न करावे लागतील तेवढे निरालसपणें करण्याचा, जेवढीं संकटें भोगावीं लागतील तेवढीं निमुटपणें भोगण्याचा आमचा निर्धार आहे. या आरंभिलेल्या कार्यांत जर आह्मांपैकीं कोणाकडूनही यत्किंचित् कसूर झालेली दिसली तर तो आपल्या परम कर्तव्यापासून ढळला असें आह्मांस ह्मणावें लागेल.

आतां जर कोणी असें ह्मणेल कीं आह्मीं अंगिकारलेलें हें काम परोपकाराचें नव्हे, हा केवळ एक धंदा किंवा व्यापार आहे, तर त्यास आमचें उत्तर एवढेंच कीं कोणत्याही कामाची परोपकार कृत्यांत गणना करायाची किंवा व्यापारांत गणना करायाची हें त्या कामांत होणाऱ्या फायद्याचा मोठा भाग कोणीकडे खर्च होतो हें पाहिलें ह्मणजे तेव्हांच कळून येतें. धंद्याच्या रीतीनें शाळा चालविणारे कांहीं आहेत, परंतु त्यांच्या संस्थांत व आमच्या संस्थांत महदंतर दिसेल. हें अंतर कोणा वरकरणी पहाणाराच्याही सहज लक्षांत येण्यासारखें आहे, तेव्हां त्याचा विशेष उल्लेख कशास करावा? शाळा चालविणाराची स्वकर्तव्याविषयीं जशी समजूत तशीच ती विद्यार्थ्यांचीही होण्याचा संभव असतो, ह्मणून केवळ व्यापारी रीतीनें चालविलेल्या शाळेंत मुलांच्या मनावर जे संस्कार होतील तेच मुलांस दिलेल्या विद्येचें सार्थक्य, असें कोणीही सुविचारी व दूरदृष्टी पालन-

कर्ता समजणार नाहीं. शाळेसारखी संस्था चालविणारांचे हेतु थोर आहेत व त्यांची स्वकर्तव्याविषयीं कल्पना उन्नत आहे, अशी त्याची खात्री होणें अवश्य आहे.

अज्ञान, अविचार, दारिद्र्य आणि दुःसंगति इत्यादिकांच्या योगें मनुष्य आपली नैसर्गिक थोरवी विसरतो, व स्वार्थपरायण होऊन नीच कृत्यें करण्यास प्रवृत्त होतो असें मीं पूर्वीं सांगितलें. अशा स्थितीस मनुष्यास न जाऊं देण्याविषयीं यत्न केला पाहिजे. ही शाळा स्थापन करणारांनीं व जे ती हल्लीं चालवीत आहेत त्यांनीं द्रव्य किंवा कीर्ति यांच्या प्राप्तीची मनांत आशा धरिलेली नाहीं. त्यांनीं आपल्या कर्तव्याचें साफल्य ज्या महत्वाच्या गोष्टीच्या साधनांत मानिलेलें आहे ती निराळी आहे. अज्ञान, अविचार, दारिद्र्य आदिकरून ज्या दुष्ट दुर्गुणांनीं मनुष्य नीचतम अवस्थेस जाऊन पोहोंचतो, त्या दुर्गुणांचा अंकुर कोंवळ्या वयांतच खुडून टाकावा हा शाळा स्थापन करण्याचा मुख्य उद्देश आहे. ज्या अनाथ मुलांस विद्येची हौस असून ती मिळविण्याचें साधन नाहीं, त्यांस ती सुलभपणें मिळावी व त्यांची व त्यांच्या संततीची पुढें विपत्तींतून सुटका होऊन कुमार्गास लागण्याचें त्यांस कारण उरूं नये, अशाकरितां आमचे प्रयास आहेत; ज्यांस आपल्या मुलांच्या विद्याभ्यासाकरितां कांहीं थोडा खर्च करण्याची ऐपत आहे, त्यांस अल्पव्ययानेंच विद्येचा पूर्ण लाभ व्हावा, त्यांच्या मुलांनीं आपल्या कुटुंबास व आपल्या ज्ञातीस ऊर्जित दशा आणावी, परोपकाराच्या कामास त्यांनीं शक्त्यनुसार मदत करावी, सदाचारानें वागण्याविषयीं त्यांनीं नित्य दक्ष रहावें, अ-

शाकरितां आमचा उद्योग आहे; व ज्या पालनकर्त्यांस मुलांच्या विद्याभ्यासाकरितां बराच खर्च करण्याचें सामर्थ्य आहे त्यांच्या मुलांचें शारीरिक व मानसिक शिक्षण पूर्णपणें निर्दोष व्हावें, त्या मुलांनीं नेकीनें व सदाचरणानें वागून इतरांस चांगला कित्ता घालून द्यावा, इतकेंच नव्हे, तर त्यांनीं मोठी योग्यता संपादण्याची महत्वाकांक्षा मनांत बाळगावी, परोपकाराच्या व देशसेवेच्या कृत्यांस नुसतें सहाय्य करूनच राहूं नये, तर तीं कृत्यें स्वतः आरंभावीं, व समाजाचे अग्रणी होण्यास आपण योग्य आहों असें त्यांनीं दाखवावें, ह्मणून आमचा प्रयत्न आहे. ज्याप्रमाणें शंभर धोंडे टाकले असतां एक नेमक्या जागीं पडतो, त्याप्रमाणेंच अशा मोठ्या योग्यतेचा शंभरांत एकजण जरी निघाला तरी त्यांत आह्मांस आनंद आहे.

ज्याप्रमाणें कोणीं उदार पुरुषानें बांधलेल्या देवालयांत, त्याच्या आप्तइष्टमित्रांस मात्र परमेश्वराचें पूजार्चन करण्यास परवानगी असते असें नाहीं, तर ज्या ज्या मनुष्याच्या अंतःकरणांत ईश्वरोपासनेची सद्बुद्धि उत्पन्न होईल, तो मनुष्य कोणीहि असो, व कुठलाहि असो, तो त्या उदार पुरुषाचा निंदक असो, किंबहुना त्याचा हाडवैरी असो, त्यासहि त्या देवालयांत येऊन ईश्वराची प्रार्थना करण्यास व आपल्या पापांचें क्षालन करण्यास मोकळीक असते, व याप्रमाणें पिढ्यानपिढ्या गेल्यावर जेव्हां पुढें त्या महात्म्याचें सर्वांस विस्मरण होतें, त्याच्या नांवाचाहि मागमूस राहत नाहीं, तेव्हां देखील त्याच्या सत्कृत्यामुळें अनेक लोक पावन होत असतात—त्याप्रमाणेंच या आमच्या शाळेंत व काले-

जांत, आमच्या आप्तइष्टमित्रांचीं मुलें मात्र विद्याग्रहण करून सन्मार्गास लागावीं असा निर्बंध नाहीं. हल्लींच्या काळांत विद्येवांचून कोणाचाहि चरितार्थ चालायाचा नाहीं, व ह्मणून ज्या ज्या मातापितरांस व पालनकर्त्यांस आपल्या मुलांस विद्येची प्राप्ति करून द्यावयाची असेल, ते कोणीहि असोत, कोठलेही असोत, व त्यांचीं मतें आह्मांस अनुकूल असोत वा अत्यंत प्रतिकूल असोत,—त्यांच्या मुलांस उत्कृष्ट शिक्षण देऊन व त्या मुलांच्या अंतःकरणांत श्रेष्ठ मनोवृत्तींची प्रेरणा करून त्यांस सन्मार्गास लावण्याचा आमचा कृतसंकल्प आहे. या आमच्या संस्था चिरायुषी व्हाव्या व त्यांचे अल्पायुषी संस्थापक व चालक कालगतीनें एका मागून एक मृत्युपंथास गेल्यावर जेव्हां पुढें त्यांच्या हेतूंचें किंवा नांवांचें देखील कोणास फारसें स्मरण राहणार नाहीं, तेव्हां देखील या संस्थांचा उत्कर्ष कमी होऊं नये, व त्यांकडून होत असलेल्या लोकसेवेच्या कामास यत्किंचित् खळ पडूं नये, उलट तें काम उत्तरोत्तर अधिक पूर्णत्वानें व्हावें, अशी ईश्वरापाशीं आमची रात्रंदिवस प्रार्थना आहे.

या इतक्या गोष्टी इतक्या स्पष्टपणें आजपर्यंत तुह्मांस आह्मांपैकीं कोणींही सांगितल्या नव्हत्या. परंतु ही गोष्ट बरी झाली नाहीं असें मला वाटतें. ज्या फार दिवस चालत आलेल्या मोठ्या संस्था असतात, त्यांचे उद्देश एका पिढीपासून दुसऱ्या पिढीस परंपरेनें आपोआप समजून येत असतात. परंतु आमच्या या संस्था स्थापित होऊन अद्यापि फारदिवस झाले नाहींत, व त्यांचे उद्देश कायमचे ठरविण्यासच कांहीं वर्षें लागलीं. आतां त्या

उद्देशांचें तुह्मांस पूर्ण ज्ञान असणें अत्यंत आवश्यक आहे कारण, आह्मीं आरंभिलेल्या कार्याची सिद्धि तुमच्या वर्तनावर सर्वस्वी अवलंबून आहे, व तुह्मांस आपल्या कर्त्यांची चांगली ओळख होण्यास व तुह्मांमध्यें शाळेविषयीं योग्य अभिमान उत्पन्न होण्यास तुह्मांस आमचे उद्देश कळले पाहिजेत, व ते उद्देश चांगले आहेत अशी तुमची खात्री झाली पाहिजे. विद्यार्थी आणि शिक्षक यांमध्यें जितका मनाचा मोकळेपणा असेल तितका तो उभयतांसहि हितावह होतो; त्यामुळें परस्परांमधील प्रेमबंधन दृढ होतें. विद्यार्थी व शिक्षक यांचा एकमेकांवर भरंवसा बसल्यावर अल्पायासानें जें कार्य होतें तें तसें दुसऱ्या कोणत्याही उपायानें होत नाहीं. ज्याप्रमाणें एका हातानें टाळी वाजत नाहीं त्याप्रमाणेंच एकट्या शिक्षकाच्या उत्साहानें, परिश्रमानें व प्रयत्नानें कार्यसिद्धि होत नाहीं. तुह्मां मुलांसहि तसाच उत्साह वाटला पाहिजे व तुह्मांकडे सोंपविलेला कार्यभाग तुह्मींही उचलला पाहिजे. आह्मीं आरंभिलेलें विद्यादानाचें काम चांगलें व परोपकाराचें आहे व ज्याचा ज्याचा त्याशीं संबंध येईल त्यास त्यास त्या कामाचा अभिमान वाटला पाहिजे, अशी या उपदेशावरून तुमची खात्री झाली असेल अशी माझी आशा आहे. आपल्या या शाळेचा अभिमान कां बाळगावा व तिच्या उत्कर्षाकरितां कां झटावें, याविषयीं आतां तुमच्या मनांत शंका राहूं नये असें मला वाटतें. विद्यार्थ्यांच्या स्थितींत तुह्मीं असतां शाळेच्या अभिमानानें ज्या गोष्टी तुह्मीं कराव्या असें आह्मी ह्मणतों, त्या तुमच्या स्वतःच्याच विशेष कल्याणाच्या आहेत

असें पूर्वी सांगितलेंच. परंतु या विद्यार्थ्यांच्या स्थितींतून निघून जेव्हां तुह्मी आपआपल्या आयुष्याच्या स्वतंत्र उद्योगास लागाल, तेव्हां या आपल्या शाळेस विसरूं नका. शाळेचा अभिमान तुह्मांमध्यें जन्मभर वागला पाहिजे. कारण शाळेसारखी संस्था पूर्णत्वास येण्यास फार मोठा काळ पाहिजे, व तिच्या सर्व आवश्यकता भागण्यास किती वर्षें लागतील हें सांगतांच येत नाहीं. त्याअर्थीं तुह्मांपैकीं प्रत्येकास शाळेच्या उपकारांची फेड करण्यास पुष्कळ अवधि आहे, व विद्यार्थ्यांच्या पिढ्यानपिढ्या झाल्या तथापि शाळेच्या उपकारांची फेड करण्याची संधि गेली असें कोणास कधींहि वाटण्याचें कारण नाहीं. याकरितां तुह्मी सर्वांनीं मोठेपणीं आपआपल्या अनुकूलतेप्रमाणें शाळेस मदत केली पाहिजे; ही मदत द्रव्यद्वारा असो, अंगमेहनतीची असो, बुद्धिवादाची असो, केवळ अभिमानपर शब्दांची असो, किंवा दुसऱ्या कोणत्याहि प्रकारची असो, ती शाळेस फार महत्वाची होईल. शाळेची श्रेष्ठता कायम राखण्याकरितां जसा आमचा तसाच तुमचाही यत्न सुरू असला पाहिजे; व आपलीं मुलें व आपल्या मुलांचीं मुलें याच शाळेंत शिकावीं असा तुमचा निश्चय असला पाहिजे.

या प्रकारचा अभिमान तुम्हांमध्यें निरंतर राहील असें मला अभिवचन द्या. दुसरें असें अभिवचन द्या कीं पूर्वी सांगितलेल्या तीन मनुष्यवर्गांपैकीं अधम वर्गांत तुम्ही कोणीही आपली कदापि गणना करून घेणार नाहीं. स्वार्थलंपट होऊन नीच कर्मास प्रवृत्त होणें, यासारखी जगांत दुसरी लाजिरवाणी गोष्ट नाहीं. अशा गोष्टीनें

जरी एखादे वेळीं फार मोठा फायदा होतो असें दिसलें, तथापि तिच्या योगानें मनाची थोरवी नाहींशी होते; व नुकसानाशीं तुलितां तो फायदा क्षुद्रच गणिला पाहिजे. आपला जगांत दुर्लौकिक होणें व त्यामुळें आपल्या कुळास बट्टा लागून सर्वत्र मानहानि होणें यासारखी दुसरी कोणतीच विपत्ति नाहीं, असें प्रत्येक समंजस माणसास वाटलें पाहिजे. जर तुम्हांपैकीं कोणास मोठें लोककल्याणाचें कार्य करितां आलें नाहीं, तर तुम्ही मध्यम स्थितींत राहूनच समाधान मानावें, परंतु अधम वर्गापासून पूर्णपणें अलिप्त रहावें. परोपकाराचें कार्य वारंवार नुसत्या शब्दानेंहि होतें, व तेवढें तरी करणें कोणास अवघड वाटण्याचें कारण नाहीं. शिवाय सत्यभाषण, गुणग्रहण, ज्ञानप्रीति, भूतदया व चांगल्या गोष्टींचा अभिमान, हे गुण प्रत्यक्षपणें किंवा अप्रत्यक्षपणें परोपकारमूलक आहेत, व मनुष्य कोणत्याही स्थितींत असो, त्यानें या गुणांचा स्वीकार करण्याचें मनांत आणिल्यास, ते अत्यंत सुखसाध्य आहेत.

याप्रमाणें तुम्हांकडून हीं दोन अभिवचनें मिळालीं म्हणजे आजच्या श्रमाचें पूर्ण सार्थक्य झालें असें मी मानीन. "आपल्या संस्थांचा अभिमान" या विषयाचा हा पहिला भाग येथें संपवितों; याच विषयाचे आणखी जे भाग राहिले ते पुढील उपदेशाच्या प्रसंगास राखून ठेविले आहेत.

---

**पुरवणी**—या आजच्या उपदेच्या प्रसंगीं शाळेंतील सर्व मुलांस कां बोलाविलें नाहीं, याविषयीं पुष्कळ शिक्षकांस शंका आली असेल व कित्येक मुलांचा व शिक्षकांचा या गोष्टीसंबंधानें गैरसमज होण्याचाहि संभव आहे. ह्मणून खुलाशाकरितां चार शब्द सांगणें जरूर आहे. माझें असें मत आहे कीं केवळ व्याख्यानानें बहुसमाजाच्या मनावार सदुपदेश बिंबत नाहीं; तो बिंबण्यास नित्यशः त्या उपदेशाचें मनन व पुनरावृत्ति पाहिजे. जीं मुर्ख मुलें असतात त्यांच्या मनावर इतकें करूनहि इष्ट परिणाम झाल्यास भाग्यच समजलें पाहिजे. उदाहरणार्थ, पुष्कळ पालनकर्ते आपल्या मुलांस नीतीनें चालण्याविषयीं, विद्येकडे लक्ष देण्याविषयीं, व सत्संगति जोडण्याविषयीं उपदेश करीत असतात. मुलांच्या हिताची त्यांस कळकळ असते, मुलांविषयीं त्यांच्या मनांत अखंड प्रेम वागत असतें, या गोष्टींविषयीं संदेहच नसतो. असें असतां त्यांचा उपदेश पुष्कळ वेळां फुकट जातो व मुलें दुर्गणी व दुराचारी निघतात. जेथें प्रत्यक्ष मातापितरांचे श्रम अशा कामीं व्यर्थ होतात, तेथें शिक्षकांचें काम किती अवघड आहे याविषयीं कोणासहि सहज कल्पना येईल. केवळ वक्तृत्वानें मोठ्या समाजाच्या प्रवृत्तींस समार्गी लावायाचा ह्मटल्यास तें अशक्यच ह्मटलें पाहिजे. तें घडण्यास समाज आधींचाच अगदीं तयार तरी असला पाहिजे, किंवा उपदेशकाच्या अंगीं अलौकिक वक्तृत्व असलें पाहिजे, किंबहुना त्यांस ईश्वरी प्रेरणेचेंच साहाय्य असलें पाहिजे. ज्याप्रमाणें पावसाळ्यांत पर्वतापासून निघून मोठ्या प्रबळ वेगानें वाहणाऱ्या ओढ्याच्या जोरानें

मोठमोठे दगड ढासळून कांहीं थोड्या अंतरावर गडगडत जातात, परंतु त्यांच्या अणकुच्या मोडून त्यांच्या पृष्ठास गुळगुळीत गोलाकार येण्यास नदीचा मंद प्रवाह त्यांव-रून वर्षानुवर्ष वाहावा लागतो, त्याप्रमाणेंच अलौकिक वक्तृत्वाचा प्रथम थोडा वेळ मात्र श्रोत्यांच्या मनावर कांहीं विलक्षण परिणाम झालेला दिसतो, परंतु तो त्यां-च्या अंगीं पुरता भिनण्यास आप्तांच्या, मित्रांच्या व शिक्षकांच्या सौम्य वचनांची नित्य नित्य पुनरावृत्ति ला-गते. जर आजचें व्याख्यान केवळ करमणुकीकरितां असतें तर सर्व मुलांस बोलावणें इष्ट झालें असतें, परंतु उपदेशपर व्याख्यानांत पात्रापात्रता पाहणें अवश्य आहे. जीं मुलें बुद्धिमान्, सदाचारी व परिश्रमी असल्याविषयीं शिक्षकांनीं शिफारस केली त्यांस या उपदेशास पात्र ग-णिलें आहे; व तीं या उपदेशाचें सत्वर ग्रहण करतील अशी आशा बाळगण्यास हरकत नाहीं. शिक्षकांनीं ज्या मुलांविषयीं असा भरंवसा दाखविला तीं मुलें अतां यापुढें शिक्षकांस मदतनीस होतील यांत शंका नाहीं. ज्यांस आजच्या प्रसंगीं उपदेशास बोलाविलें त्यांनीं हा त्यांच्या सद्वृत्तास आह्मीं मान दिला, हा त्यांस एक नवा हक्क आह्मीं दिला असें समजावें. आतां शिलक राहिलेल्या मुलांस हा उपदेश समजावून देण्याचें काम शिक्षकांकडे व आज आलेल्या मुलांकडे मीं सोंपवितों. त्यांनीं आपल्या आचरणानें, संभाषणानें व दुसऱ्या हरएक उपायांनीं हा उपदेश बाकीच्या मुलांच्या मनावर बिंबवून द्यावा. जर पुढील उपदेशाच्या प्रसंगीं शिक्षकांस अधिक मुलांची शिफारस करणें उचित दिसलें, तर ती आनंद मानण्या-

सारखी गोष्ट होय, व जर पुढें कधींहि सर्वच मुलें या बहुमानास पात्र आहेत असें दिसून आलें तर तो शाळेस मोठा सुदिन आला असें मी समजेन.

मुलांस उपदेश करण्याच्या भरांत शिक्षकांस ज्या एकदोन सूचना करण्याचें माझ्या मनांत होतें त्या तशाच शिलक राहिल्या. त्यांचा येथें थोडक्यांत उल्लेख मात्र करितों. **संगति, व्यवहार, व्यासंग** व **संभाषण** यांसंबंधानें कोणाहि शिक्षकाच्या आचरणांत यत्किंचित् दोष ठेवण्यास जागा असूं नये. सर्व शिक्षकांमध्यें शाळेचा अभिमान वागत आहे हें मी जाणतों, परंतु माझ्या मतें तो जितक्या अंशानें व्यक्त व्हावा तितका होत नाहीं, व अव्यक्त अभिमानापासून शाळेस व्हावा तितका फायदा होत नाहीं. प्रतिदिवशीं या शहरांत कांहीं नवीन कृति निघते, कांहीं नवीन धामधूम सुरू होते, कांहीं नव्या प्रश्नांचा ऊहापोह सुरू होतो. अशा अनेक प्रसंगीं शाळेच्या अभिमानास योग्य असें आचरण कोणतें,— उत्तेजनाचें, औदासीन्याचें किंवा स्पष्ट विरोधाचें,—हें प्रत्येक शिक्षकानें दूरवर विचार करून ठरविलें पाहिजे. केव्हांहि नुसतें हुरळून जाणें उपयोगीं नाहीं. कोणत्याही गोष्टीबद्दल शिक्षकवर्गाचा एकदिलानें कांहीं निश्चय ठरल्यावर तदनुरूप मुलांस उपदेश करणें इष्ट आहे, व त्यांनीं तो उपदेश मानावा अशाकरितां हरएक प्रकारें उद्योग करणें रास्त आहे. केवळ धामधुमीस भुलून जाणाऱ्या व नुसत्या निरर्थक आवेशानेंच वाहवणाऱ्या मुलांच्या चित्तवृत्ति आवरून धरण्याचा वेळींच प्रयत्न केल्यास तो सफल होतो, पुढें होत नाहीं. एवढ्याकरितां

शिक्षकांनीं फार दक्ष राहिलें पाहिजे व मुलांच्या आचरणावर त्यांचें सदोदित लक्ष असलें पाहिजे. मुलांच्या मनास मोह किंवा भ्रांति पडण्याजोगे अनिष्ट प्रसंग पुढें पाहतांच मुलांस तत्काळ सावध करणें हें शिक्षकाच्या कर्तव्यांपैकीं एक प्रमुख कर्तव्य होय, व तें यथाशक्ति साधण्याचा सर्वांचा प्रयत्न असावा अशी माझी सर्वांस विनंति आहे.



# उपदेश दुसरा.

## कुटुंबाचा अभिमान व आपले दुराग्रह.

आजच्या या दुसऱ्या उपदेशाचा विषय कुटुंबाचा अभिमान हा आहे. आपल्या कुटुंबाचा व कुलाचा आपण अभिमान बाळगिला पाहिजे ही गोष्ट सर्वांस मान्य आहेच, तेव्हां या विषयावर विशेष उपदेश करण्याचें काय प्रयोजन होतें अशी कदाचित् तुम्हांस शंका येईल. या शंकेचें उत्तर असें आहे कीं, कुटुंबाच्या आणि कुळाच्या उत्कर्षास अनुरूप अशीं जीं अनेक कर्तव्यें आहेत, त्यांपकीं कांहीं मात्र अशीं आहेत कीं तीं कोणाच्याही सहज ध्यानांत यावीं व तीं बजावण्याविषयीं विचारी मनुष्यास आपोआप प्रेरणा व्हावी. परंतु त्या कर्तव्यांपैकीं कित्येक अशीं आहेत कीं तीं जरी अत्यंत महत्वाचीं आहेत तरी पुष्कळांस त्यांची कल्पना देखील नसते, व चांगल्या सुज्ञ विचारी पुरुषांमध्यें देखील त्यांविषयीं क्वचित् उदासीनता व क्वचित् दुराग्रह दिसून येतो. कुटुंबसंबंधी अशा महत्वाच्या कर्तव्यांचा तुम्हांस बोध करून द्यावा, त्यांविषयीं उदासीनता किंवा दुराग्रह तुम्हांमध्यें राहूं देऊं नये, व तीं बजावण्याविषयींचा निश्चय एव्हांपासून तुमच्या अंतःकरणांत निरंतर वागावा,—या हेतूनें आजचा हा विषय उपदेशास घेतला आहे.

कुटुंबाच्या रचनेचें खरें स्वरूप लक्षांत आणून देण्याकरितां प्रथम एक उदाहरण घेऊं. कोणी घर बांधूं लागला असतां त्याच्या तत्काळ लक्षांत येतें कीं नुसते दगड, किंवा नुसतीं लांकडें, किंवा नुसता चुना, किंवा नुसतें कोणतेंही एकच द्रव्य घेऊन त्यापासून घराची उभारणी होत नाहीं. तसेंच, दगड, लांकूड किंवा चुनखडी जशी रानांत सांपडते तशीच ती घराच्या कामीं लावितां येत नाहीं. टांकीच्या घावांनीं दगड घडला पाहिजे, वाकसाच्या घावांनीं लांकडाचा गाभा बाहेर काढिला पाहिजे, चुनखडी भट्टींत भाजून वाळूशीं मिसळून चांगली मळली गेली पाहिजे; मग हें सामान घराच्या कामीं येणार. सुटे दगड, सुटीं लांकडें व चोपडलेला चुना, यांपासून घर तयार होत नाहीं. घरास जें जें सामान लावायाचें तें तें जागच्याजागीं बसविल्यावर त्याचा भोंवतालच्या दुसऱ्या सामानाशीं पक्का गुताव झाला पाहिजे. घराच्या कोणत्याही भागास जें विशेष सामान लाविलेलें असेल, तें सामान तेथें शोभलें पाहिजे, त्याचा तेथें विशेष उपयोग असला पाहिजे, व त्यावर पडणारा भार त्यानें तोलून धरिला पाहिजे. तसेंच चुना, माती, खिळे वगैरेंच्या योजनेनें घराचे सर्व भाग एकजीव झाले पाहिजेत. घर लहान असो वा मोठें असो त्याची उभारणी होण्यास या सर्व गोष्टींची आवश्यकता असते. आतां घरास लाविलेलें सामान जितकें अधिक टिकाऊ व त्याचा मिलाफ जितक्या अधिक काळजीनें केलेला असेल तितकें तें अधिक दिवस टिकाव धरील. तें सामान तयार करण्यांत जितकें अधिक कौशल्य खर्चिलेलें असेल, त्याची मांडणी जितक्या अधिक चातुर्यानें केलेली असेल, इमारतीच्या भिन्न भा-

गांची योजना करितांना जितकी अधिक कल्पकता व दूर-दृष्टि योजिली असेल, व तिचे पाये जितके अधिक खोल गेलेले असतील तितकी ती इमारत अधिक सुखावह, अधिक सुंदर, अधिक भव्य व अधिक चिरायु होईल.

घराच्या संबंधानें या ज्या अनेक गोष्टी सांगितल्या त्याच पर्यायानें त्या घरांत राहणाऱ्या कुटुंबाच्या संबंधानेंही खऱ्या आहेत. अनेक पुरुष एका घरांत राहिल्यानें त्यांचें कुटुंब होत नाहीं, तसेंच अनेक स्त्रिया एके ठिकाणीं राहिल्यानें त्यांचें कुटुंब बनत नाहीं. स्त्रीपुरुष, मुलेंलेकरें, आप्तइष्टमित्र हीं सर्व प्रेमपाशानें निकट बांधलीं जाऊन जेव्हां एकत्र राहतात, तेव्हां त्यांच्या समुदायासच कुटुंब ही संज्ञा देतां येते. कुटुंबांतील भिन्न व्यक्तींमध्यें जितकीं निरनिराळीं नातीं असतात, तितके प्रेमाचे निरनिराळे प्रकार उत्पन्न होतात. त्या सर्व प्रकारांस भिन्न भिन्न नांवें सांपडणार नाहींत, तथापि त्यांपासून उत्पन्न होणाऱ्या बंधनांत त्यांचें वैचित्र्य दिसून येतें. अशा या नैसर्गिक बंधनांनीं कुटुंबांतील सर्व माणसें आपआपणांस इतरांशीं बांधून घेतात, आपणांवर पडणारा कर्तव्यांचा भार आनंदानें धारण करतात, व ज्यांत सर्वांचें हित त्यांतच आपलें हित असें जाणून सुखसमाधान पावतात—या गोष्टींतच कुटुंबरचनेचें परम सौंदर्य व परम रहस्य दिसून येतें. कुटुंबांत वाढलेल्या व एकांतांत वाढलेल्या मनुष्यांत फार मोठा फेर दिसून येईल. कुटुंबांत वाढल्यानेंच मनुष्यास माणुसकी येते, व त्याच्या स्वभावांत असलेल्या पुष्कळ पशुतुल्य गुणांचा वेळींच अंकुर खुडला जातो. कुटुंबांत राहण्यानें मनुष्यास जें हें **शिक्षण**

मिळतें तें अन्यत्र कोठेंही मिळायाचें नाहीं, व ह्मणूनच कुटुंबांत मिळणारें शिक्षण जितकें उत्कृष्ट करितां येईल, तितकें तें केवळ व्यक्तीच्या व कुटुंबाच्याच नव्हे, तर सर्व राष्ट्राच्याही उन्नतीस साधनीभूत होईल.

कारण असें कीं ज्याप्रमाणें अनेक व्यक्तींचें मिळून एक कुटुंब होतें, त्याप्रमाणेंच अनेक कुटुंबांचें मिळून एक राष्ट्र होतें; व ज्याप्रमाणें शितावरून भाताची परीक्षा होते, त्याप्रमाणेंच राष्ट्रांतील कुटुंबांची सामान्य स्थिति पाहून सर्व राष्ट्राच्या गुणावगुणांची कर्तबगारीची परीक्षा होते. उदाहरणार्थ प्रामाणिकपणानें व अब्रूनें वागावें, आपला आपण मान राखावा, दुसऱ्यास अपकार करूं नये व दुसऱ्याचा अपकार सहन करूं नये, कुटुंबांत प्रेमानें व एकचित्तानें वागावें, सुख व संपत्ति यांचा उपभोग सर्व समवेत घ्यावा, दुःख व विपत्ति यांचा मोठा वांटा स्वीकारूनही इतरांस सुखी राखण्याचा प्रयत्न करावा, कुटुंबाच्या उत्कर्षासाठीं व लौकिकासाठीं केवढेही श्रम पडले व कितीही नुकसान सोसावें लागलें तरी मागें पाहूं नये,— अशी मनाची लहानपणापासून समजूत होत जाईल, अशा प्रकारचें शिक्षण ज्या ज्ञातींतील किंवा देशांतील कुटुंबांत मिळतें व कुटुंबांच्या प्राचीन आख्यायिकाही याच गोष्टी मनावर बिंबवितात ती ज्ञात किंवा तो देश विपत्तींत पडण्याचा संभव फार कमी, व जरी कदाचित् विपत्तींत पडला तथापि त्यास अखेरीस ऊर्जित कळा येणारच, असें साधारणपणें अनुमान करण्यास हरकत नाहीं. जेव्हां कुटुंबांतील माणसें उत्साहवंत, उद्योगी व शूर असतात, तेव्हां केवळ कुटुंबाच्या आवश्यकता पुरविण्यास त्यांच्या

सर्व सामर्थ्याची गरज लागत नाहीं. त्यामुळें त्यांच्या अंतःकरणांत साहजिकपणें महत्वाकांक्षा उत्पन्न होते, व आपल्या कुटुंबाचा व आपला लौकिक वाढवावा ह्मणून आपल्या अवशिष्ट कालाचा व सामर्थ्याचा व्यय तीं माणसें आपल्या गांवाच्या कामांकडे करण्यास तयार होतात. या कारणानें त्यांचें गांव सुधारत जातें; असें होतां होतां कित्येक थोर कुटुंबांत जे पराक्रमी पुरुष निपजतात, ते सर्व देशाचेंही कल्याण करण्यास योग्य होतात व सहजगत्या त्यांस लोकनायकत्व प्राप्त होतें.

याप्रमाणें कुटुंबाच्या सुस्थितिवर देशाची किंवा राष्ट्राची सुस्थिति अवलंबून असते. जर कुटुंबाची अंतःस्थ व्यवस्था दोषी असेल तर ती सर्व राष्ट्रास बाधक होते. याकारितां कुटुंबाची व्यवस्था व त्यांत मिळणारें शिक्षण उत्कृष्ट असावें याविषयीं आपणांस किती काळजी बाळगिली पाहिजे? व आपल्या कुटुंबाचा ज्यास अभिमान असेल, त्यानें ती व्यवस्था व तें शिक्षण उत्तरोत्तर अधिक निर्दोष व अधिक श्रेयस्कर होत आहे अशाविषयीं किती जपलें पाहिजे?

दुसरें असें कीं कोणासहि स्वभावतः दुःख प्रिय नाहीं, मग तें दुःख स्वतःचें असो किंवा दुसऱ्याचें असो. जर आपल्या व दुसऱ्यांच्या दुःखाचें मनुष्यास निवारण करितां येईल तर मनुष्य साहजिकपणें तसें करण्यास प्रवृत्त होईल. इतकेंच नव्हे तर ज्याप्रमाणें मनुष्यास स्वतःचें सुख वाढविण्याची इच्छा असते, त्याप्रमाणेंच इतरांचेंही सुख वाढविण्याची त्याच्या अंतर्यामीं थोडीबहुततरी प्रेरणा होतेच. सामान्यजनांची स्थिति पाहिल्यास प्रथम आपलें कुटुंब

सुखी करावें, मग आपल्या आप्तमित्रांस सुखी होण्यास मदत करावी, नंतर होईल तर आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या थोडेंबहुत उपयोगीं पडावें, अशी त्यांची प्रवृत्ति असते. या स्थितीस अपवाद ह्मटला तर तो लोभ, मोह, मत्सर, द्वेष वगैरे अविचारजन्य दुर्विकारांस वश झालेल्या लोकांचा मात्र होय; परंतु तेही आपल्या कुटुंबांतील माणसांस सुखी करण्याची मनांत ईर्षा बाळगितात. सामान्यजनांची आतां जी ही स्थिती सांगितली तीच देशाच्या खऱ्या कल्याणास कारणीभूत होते. कारण असें कीं कांहीं असामान्य पुरुष सोडून देऊन बाकीच्यांची कर्तबगारी पाहिल्यास, त्यांच्या हातून जें थोडेंबहुत परहित होणें शक्य असतें तें त्यांनीं आपल्या आप्तमित्रांच्या व शेजाऱ्यापाजाऱ्यांच्याच कामीं लाविल्यास त्याचें विशेष चीज होतें; प्रत्येकास प्रसंगीं कोण आपल्या कामीं पडतील, कोणाच्या भरंवशावर रहावें हें माहीत होतें व तेणेंकरून त्याची पुष्कळ विवंचना दूर होते. या प्रकारची सर्वत्र स्थिति असणें हेंच योग्य होय, यांतच सर्वांचें हित आहे. ह्मणून सामान्यतः प्रत्येकानें प्रथम आपलें कुटुंब सुखी करण्याचा व ऊर्जित दशेस आणण्याचा प्रयत्न करावा, मग आपल्या इष्टमित्रांच्या कुटुंबांस साहाय्य करावें, मग शेजाऱ्यापाऱ्यास मदत करावी, इतकें करून ज्यामध्यें सामर्थ्य असेल त्यानें आपल्या गांवाच्या व देशाच्या कामीं पडावें, किंबहुना सर्व जगाच्याही उपयोगीं पडण्याचा साधेल तर प्रयत्न करावा. आपल्या सामर्थ्याबाहेरचें देशसेवेचें प्रचंड कार्य करण्याच्या नादीं लागून निरंतर निराशेनें स्वतःस व कुटुंबास दुःखी करण्यापेक्षां, सुसाध्य कर्तव्यांत आपल्या सामर्थ्याची प-

राकाष्ठा करणें व त्यायोगें मनाची शांतता व समाधान राखणें, हाच विशेष श्रेयस्कर मार्ग होय. या मार्गाचें अवलंबन करणारा मनुष्य सामान्य असो वा महाप्रतापी असो, तो आपल्या सामर्थ्याचें पुरें चीज करितो. दिव्याच्या ज्योतीचा प्रकाश जवळच्या ठिकाणीं फार असतो, व जों जों दूर जावें तों तों तो मंद होत जातो. ज्या ज्योतीचा प्रकाश अधिक तीव्र ती अधिक दूरचे प्रदेश प्रकाशित करिते, व जिचें तेज अप्रतिमपणें प्रखर ती उंचावर धरिल्यास क्षितिजापर्यंतही तिचा प्रकाश जाऊन पोहोंचतो, व जवळच्या प्रदेशांत तर तिनें सर्व डोळे दिपून जातात. मनुष्याच्या सामर्थ्याची सर्वांशीं अशीच स्थिति आहे. ज्या कुलांत महासामर्थ्यवान् प्रतापी पुरुष निपजतात त्यांचें कुटुंब तेव्हांच उर्जित दशेस येतें, व त्यांच्या प्रतापाचीं फळें राष्ट्राच्या सीमेपर्यंत जाऊन पसरतात; ज्यांचें सामर्थ्य कमी त्यांच्या पराक्रमाचीं फळें त्यांच्या सामर्थ्यानुरूप कमी मर्यादेवर जाऊन पोहोंचतात; व निदानपक्षीं आपल्या कुटुंबाचें सुख व संरक्षण करण्यापुरतें तरी सामर्थ्य प्रत्येकानें मिळवूं ह्मटल्यास तें कोणासही बहुधा दुर्घट नाहीं.

यावरून व्यक्तिसुखाच्या दृष्टीनें पाहतां व तसेंच राष्ट्रहिताच्या दृष्टीनें पाहातां कुटुंबव्यवस्था उत्तम असणें हें किती महत्वाचें आहे हें सहज लक्षांत येईल. तेव्हां आपल्या सांप्रतच्या स्थितींत कुटुंबाचा अभिमान बाळगणारानें कोणत्या खऱ्या महत्त्वाच्या कर्तव्यांविषयीं नित्य जागरूक रहावें याविषयीं सहज प्रश्न उत्पन्न होतो.

कुटुंबांतील माणसांनीं परस्परांशीं प्रेमानें वागावें,

त्यांनीं एकमेकांच्या सुखासाठीं नित्य झटावें, प्रत्येकानें आपलीं कुटुंबसंबंधीं कर्तव्यें उत्तमपणें बजावावीं, वृद्धांची सेवा करावी, लहानांचें पालन करावें, वडिलांचा मान राखावा, कुटुंबास व कुलास कलंक लागेल असें कोणाचेंही आचरण नसावें, प्रामाणिकपणा, सदाचार व सद्गुण यांविषयीं कुटुंबाची ख्याति होईल असें वर्तन ठेवावें, इत्यादि अनेक कर्तव्यें निर्विवादच आहेत व तीं तुह्मां सर्वांस मान्य असलींच पाहिजेत. हीं अगदीं सुलभ कर्तव्येंही जर तुह्मांपैकीं कोणाच्या हातून घडत नसलीं तर ती फार लाजिरवाणी गोष्ट समजली पाहिजे व या आरोपास इतःपर तुह्मी कोणीही पात्र होणार नाहीं अशी माझी आशा आहे. हीं कर्तव्यें तर बजावलींच पाहिजेत, परंतु यांहून दुसरीं कांहीं महत्वाचीं कर्तव्यें आहेत त्यांचा तुह्मीं विचार करावा. अशा कर्तव्यांपैकीं दोहोंचा मात्र या प्रसंगीं विशेष उल्लेख केल्यास पुरें आहे.

सर्व हिंदुलोकांमध्यें एक विलक्षण दोष दिसून येतो तो हा कीं, कोणत्याही कामांत फेरबदल झालेला त्यांच्या स्वभावास आवडत नाहीं. जें जसें आहे तें थेट तसेंच चालावें असा त्यांचा निग्रह दिसून येतो. आहे त्यांत समाधान मानायाचें असा आमचा मनोधर्मच होऊन बसला आहे. ही स्थिति दोषरूप आहे व ती घालविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. व ती कुटुंबांतील शिक्षणानें जितक्या लवकर जाईल तितकी बाहेरील शिक्षणानें जाणार नाहीं. कुटुंबांतील आचारविचारांत एवढी एक सुधारणा झाल्यास केवढें हित होणार आहे!

जेव्हां आपण एखाद्या झाडाचें बीं लावितों, तेव्हां त्यापासून कसें झाड उत्पन्न होईल, तें किती उंच वाढेल; त्याचीं पानें कशीं असतील, फुलें व फळें कशीं असतील हें सर्व आधीं सांगतां येतें. त्याप्रमाणेंच अमुक कुळांत उत्पन्न झालेला मनुष्य कसा वाढविला जाईल, तो कोणता उद्योग करील, तो कोठें राहण्याचा प्रयत्न करील, आपलें आयुष्य कसें घालवील, या सर्व गोष्टींविषयीं व आणखीही पुष्कळ दुसऱ्या गोष्टींविषयीं या आमच्या समाजांत मनुष्याच्या भावी वृत्ताचें भविष्यकथन करितां येईल. हें भविष्य कांहीं थोड्या बाबतींत खरें न ठरण्यास एकच कारण असायाचें व तें हेंच कीं कांहीं अनिवार्य कारणांनीं त्या मनुष्यास आपले स्वाभाविक उद्देश सिद्धीस नेतां न येणें व त्यामुळें तो पूर्वीं आखलेल्या मार्गापासून थोडासा ढळणें. युरोपांतील सुधारलेल्या राष्ट्रांत कोणाही व्यक्तीच्या भावी वृत्ताचें असें भविष्यकथन करितां येणार नाहीं. आपल्या येथें तें करितां येण्याचें कारण हेंच कीं कुटुंबांतील शिक्षणानें व कुटुंबसंबंधी बंधनांनीं मनुष्य लहानपणापासून अगदीं जखडून जातो. आपल्या रीतीभातींत, आचारविचारांत, पोषाखांत, व उद्योगधंद्यांत इंग्रजी राज्यामुळें जे अल्पस्वल्प फेरफार झाले आहेत ते केवळ आपल्या निरुपायास्तव झालेले आहेत.

कोणास वाटेल कीं हिंदुलोकांस जातिभेदामुळें ही स्थिति प्राप्त झाली आहे, परंतु जातिभेद कायम राहूनही आचारविचारांत, अभिरुचींत व उद्योगधंद्यांत पुष्कळ वैचित्र्य येण्याजोगें आहे, एवढेंच कीं आपणास योग्य दिसेल तेवढा फेरबदल करण्याचें आपणांस धैर्य व उत्साह असला पाहिजे, व आपण आपल्या स्वभावास जडलेला आळस व स-

माधानवृत्ति एकीकडे ठेविली पाहिजे. या प्रकारच्या वैचिच्याच्या अभावानें देशाचें किती नुकसान होत आहे याची कोणास कल्पना आहे काय ?

इंग्रजी अमलाखालीं ब्राह्मणादि वरिष्ठ जातींनीं केवळ लिहिण्यावाचण्याचे धंदे स्वीकारिले आहेत. वकील, डाक्तर, एंजिनियर, शाळामास्तर, सरकारी व खासगी कारकून, या इतक्या धंद्यांवांचून जणूंकाय ब्राह्मणांस दुसरा महत्वाकांक्षा उत्पन्न करण्याजोगा धंदाच नाहीं. सर्वांची या एवढ्या धंद्यांकडे ओढ दिसते. आतां हे धंदे वाईट असें ह्मणणें नाहीं, परंतु ते भरपूर भरले तरी त्यांतच घुसणारांचा रेटा वाढतच चालला आहे. त्यायोगें कितीक कुटुंबें दारिद्र्यानें गांजलीं गेलीं आहेत, कितीकांस उद्यांचा दिवस कसा निभावणार अशी सतत चिंता जाळीत आहे, कितीकांस उदरभरणाकरितां अपमान, तिरस्कार, किंबहुना याहून नीच प्रकार प्रत्यहीं निमुटपणें सोसून दिवस काढावे लागत आहेत ! आपल्या वडलांस व पुढें आपणां स्वतःस जगांत कसे दिवस काढायाचे आहेत याविषयीं वरिष्ठ जातीच्या बहुतेक तरुण मंडळीस जें हें व्यवहारांत शिक्षण मिळत आहे व त्यामुळें त्यांच्या नैसर्गिक थोर मनोवृत्तींची जी अनिवार्यपणें हानि होत आहे, ती कोणत्याही उदात्त विद्याव्यासंगानें किंवा स्वच्छ कपड्यालत्त्यांनीं भरून येणार आहे काय ? या नियमित धंद्यांच्या मागें लागून केवळ बाह्यात्कारी निर्मळता जोडली जात आहे खरी, परंतु बुद्धि विफल होत आहे व अंतःकरणें निरंतरचीं करपून जात आहेत. ज्या एका ज्ञातीस इंग्रजी विद्येची प्राप्ति झाली आहे

व जिचे विचार कांहीं थोडे प्रगल्भ होऊं लागले आहेत तिचीच याप्रमाणें अवस्था होणें, ही गोष्ट किती शोचनीय होय ! हा परिणाम वर सांगितलेल्या आपल्या मोठ्या दोषाचा होय.

ज्या लोकांस कोणत्याही एका धंद्यास लागण्यापूर्वी विद्यार्जन करण्याची संधी सांपडते, त्यांची बुद्धि व त्यांचे परिश्रम हीं राष्ट्राचें एक प्रकारचें भांडवलच अशीं समजलीं पाहिजेत. हें भांडवल राष्ट्रास अनंत प्रकारांनीं कामीं यावें; परंतु या भांडवलाचा आमच्या देशांत दुरुपयोग होत असल्यामुळें आपल्या राष्ट्राचा त्यापासून तोटाच होण्याची भीति उत्पन्न होत आहे.

उदरभरणाचा कांहीं दुसरा मार्ग न सुचून कित्येक वरिष्ट वर्गातील लोकांस पूर्वी सांगितल्या धंद्यांहून निराळ्या धंद्यांत पडावें लागलें आहे. कोणी फिटर, मिस्त्री, सुतार बनले आहेत, कोणी हस्तिदंताच्या फण्या वगैरे करीत आहेत, कोणी मातीचीं चित्रें बनवीत आहेत, कोणी चितान्याचें काम करीत आहेत, कोणी शिंप्याचें, क्वचित् शिकलगाराचें, कातान्याचें, शेतकऱ्याचें वगैरे कामें पत्करिलीं आहेत. परंतु या धंद्यांत अत्युत्तम काम करण्यामध्यें फारच थोड्यांच्या हातून परिश्रम घडत आहेत. कारण, हें आपलें कर्म नव्हे ही बुद्धि त्यांस सोडीत नाहीं, व त्यांचें खरें प्रेम त्या धंद्यांत नाहीं. त्यांचीं मुलें विद्याभ्यास करून तयार होतांच लिहिण्यावाचण्याच्या नौकरीच्या मागें लागतात; व वडिलांनीं केलेल्या पातकाचें जणूंकाय क्षालन करूं पाहतात. कोणी सतारी करणारानें आपल्या मुलांस आपली कला शिकविली आहे असें बहुधा घडत नाहीं. त्यामुळें,

उत्तरोत्तर उत्तम सतारी करण्याचें, कारखाना वाढवून बाजाच्या पेट्या वगैरे करण्याचें, व देशी वाद्यांत सुधारणा करण्याचें काम एकीकडेच राहतें; व बापाच्या मागें मुलास असें होतें कीं त्यानें मोठ्या परिश्रमानें मिळविलेल्या या इतक्या भोपळ्यांचें आतां काय करावें ! हीच गोष्ट ब्राह्मणांनीं स्वीकारलेल्या सर्व धंद्यांस लागू आहे. जे लोक डाक्तर किंवा एंजिनीयर आहेत ते देखील आपल्या मुलांस वकील किंवा मुनसफ करूं पाहतील; परंतु रसायनक्रियेंत किंवा यंत्रशास्त्रांत त्यानें प्रावीण्य मिळवावें असें त्यांच्या मनांत येणार नाहीं. रसायनादि शास्त्रांत किंवा यंत्रकलेंत नवीन शोध किंवा नवीन क्लृप्ति काढणारा आपणांमध्यें निपजणें लांबच राहिलें, परंतु सुधारलेल्या राष्ट्रांस प्राप्त झालेल्या विद्येचें किंवा कलांचें ज्ञान संपादन करणारा व त्यांचा एतद्देशीय कारागिरांस व कारखानदारांस उपयोग दाखविणारा असा मनुष्य देखील इतक्या कोट्यावधि लोकांत क्वचितच सांपडतो. या शोचनीय स्थितीचें कारण पूर्वीं सांगितलेला आपला दोष होय.

विशेष चमत्कार हा कीं, ज्यांचे विचार फार स्वतंत्र व फारच प्रगल्भ असें पाहून आपण चकित होतों, त्यांच्याही वर्तनांत कांहीं विशेष वैचित्र्य दिसत नाहीं किंवा त्यांच्या कुटुंबांतील शिक्षणही फारसें सुधारलेलें आढळत नाहीं. ज्यानें अनेक भव्य इमारती बांधल्या आहेत अशा एंजिनियरानें स्वतःकरितां बांधलेलें घर जुन्या तऱ्हेचेंच आहे असें दृष्टीस पडतें. डाक्तरांच्या मुलांमध्येंही विद्येच्या किंवा व्यसनाच्या अतिपरिशीलनानें होणारे शारीरिक दोष दिसतात. हिमालयाच्या थंड प्रदेशांतही विजार

बालवयास न धजणारे व अपरिचित उपचारांस भिऊन काकडणारे, परंतु असें असतांही आपणांस मोठे साहसी ह्मणविणारे, कित्येक लोक आहेत. या प्रकारचीं उदाहरणें घरोघर सांपडतील व त्यावरून बाह्यात्कारी दिसणारें विचारस्वातंत्र्य पुष्कळ वेळां केवळ एकदेशीय असतें असें तुमच्या लक्षांत येईल.

याप्रमाणें आपली शुद्ध गतानुगतिकता व समाधानवृत्ति आपल्या मानसिक व सांपत्तिक ऱ्हासास कशी कारणीभूत होत आहे व आपल्या राष्ट्रासही ती कशी अहितकारी आहे हें ब्राह्मणादि वरिष्ठ वर्गाचें उदाहरण घेऊन दाखविलें. आतां कदाचित् तुह्मी असा प्रश्न कराल कीं, या दोषासंबंधानें ब्राह्मणांचेंच उदाहरण कां घेतलें? हा दोष ब्राह्मणांपेक्षां इतर जातींत अधिक प्रबळ नाहीं काय? या प्रश्नाचें उत्तर असें कीं, ब्राह्मण लोकच आज विशेषतः विद्यार्जनाच्या मागें लागलेले आहेत व त्यांसच हा दोष तूर्त विशेष बाधक होत आहे. दुसरें असें कीं, तुह्मी बहुतेक ब्राह्मण आहां व मीही ब्राह्मण आहें. हा दोष आपणां सर्वांमध्यें सारखाच वागत आहे व तो दूर करण्यास आपण सर्वांनीच झटलें पाहिजे. दुसऱ्यांच्या दोषांचा ऊहापोह करण्यापूर्वी आपण आपल्या दोषांबद्दल सावध असावें हें बरें. आपले दोष इतरांनीं काढिले असतां तें आपणांस रुचत नाहीं, दोष काढणारांत मत्सर किंवा द्वेषबुद्धि किंवा दुसरे कांहीं दुर्विकार वागत असावे अशी आपण साहजिक कल्पना करितों. परंतु आपले दोष आपल्यांतीलच एकानें दाखविल्यास, जर ते विचाराअंतीं आपणांस संमत झाले

नाहींत, तर दोष काढणारा अविचारी आहे इतकेंच आपण ह्मणूं याकरितां होतां होईल तों आपले दोष आपणच पहावे व साधेल तर दुसऱ्यांचे गुण तेवढे दाखवावे. प्रस्तुतच्या आपल्या दोषानें होत असलेली हानि जशी माझ्या मनास झोंबत आहे, तशीच ती जर तुमच्या अंतःकरणास झोंबेल व तुमच्या द्वारें तुमच्या पालकांच्याही हृदयांस तिची आंच पोहोंचेल, तर या बाबतींत लवकर कांहीं तरी सुधारणा होईल.

थोर मनाच्या पुरुषास अपमानापेक्षां मृत्यु बरा असें वाटतें. ही ह्मण तुह्मीं पुष्कळांच्या तोंडून ऐकिली असेल. आतां तुह्मीं असें सांगा कीं, मोठ्या प्रयासानें अल्पवेतनाची जागा मिळविणें, ती मिळाल्यावर अधिकाऱ्याची मनधरणी कशी करावी हें शिकणें, त्या मनधरणीकरितां अपमानाचे व धिक्काराचे अपशब्द निमुटपणें गिळून प्रसन्नमुख दाखविणें, व वस्तुतः अल्पप्राप्तीकरितां प्रत्यक्ष दास्य स्वीकारणें हें बरें, कीं तेलानें हात व कपडे मळणें, आचीनें तोंड काळें पडणें, किंवा घणाचे शंभर घाव मारणें हें बरें? या दुसऱ्या प्रकारांत केवळ शारीरिक कष्ट व अमंगलता पतकरावी लागते, परंतु आपला कारखाना मोठा होईल अशी आशा असते, आपली प्राप्ति आपल्या निढळाच्या घामाची आहे याविषयीं मनांत उत्साह वागतो, व आपण कोणाचे बंदे नौकर नाहीं याविषयीं गर्व मानण्यासही जागा असते. परंतु पहिला प्रकार याहून अगदीं विपरीत होय. पहा कीं, आईबापांनीं काळजीनें व ममतेनें वाढविल्यानंतर, शिक्षकांनीं उद्योग, परिश्रम व स्वातंत्र्य यांची महती गाइल्यानंतर, व स्वतः

आपण अमुक गोष्टी करणार, अमुक तऱ्हेनें वागणार वगैरे पाहिजे तसे बेत केल्यानंतर, जेव्हां विद्येचें व विचारांचें चीज करण्याची वेळ येते, तेव्हां कुटुंबपोषणाचा स्वतंत्र मार्ग कोठेंच न दिसणें, जो धंदा पहावा त्यास आपण अपात्र अशी खात्री होऊन धीर सुटूं लागणें, व हळू हळू मनाचा सर्व ताठा मोडून कोठें अर्ज करावा, कोणापुढें तोंड वेंगाडावें अशा विवंचनेंत रात्रंदिवस घालविणें व पुढें वर सांगितल्या प्रकारची नौकरी मिळेपर्यंत धांवपळ व निराशा यांची परंपरा अनुभवीत राहणें—हें आपल्या गतानुगतीकतेचें परम सार्थक होय!

परंतु हा सर्व प्रकार शेंकडा पन्नास किंवा पाउणशें घरीं होत असतां कोणी सावध होत नाहीं हें कसें? आतां सांगितलेला प्रसंग जेव्हां कोणावर येतो तेव्हां प्रत्येकजण उद्विग्न होऊन मनांत ह्मणत असतो कीं "मातापितरांनीं यापेक्षां निव्वळ हमालीचा धंदा शिकविला असता तर बरें होतें." परंतु आपल्या मुलांस शिक्षण देण्याची वेळ येईपर्यंत तें सर्व विसरून जातें, विचार कोते बनतात, व्यवहारज्ञानानें डोळे उघडून दास्याचेही गुणच दिसूं लागतात, बाह्यात्कारी कितीही थोर उद्गार काढिले तथापि मन इतकें अवनत स्थितीस येऊन पोहोंचलें असतें कीं, "पोटाकरितां हें केलें ह्मणून काय झालें? तें केलें ह्मणून काय झालें?" वगैरे विचारांचेंच प्राबल्य होतें. या प्रकारें अंतःकरणाचा व तसाच विचारांचा, बाहेर एक आंत एक, असा द्वैधीभाव कितीही झांकला तथापि तो सार्वजनिक कामांत, सुधारणेच्या कामांत, धैर्याच्या व निग्रहाच्या कामांत वारंवार अनिवार्यपणें प्रकट होतो; व

वरिष्ठ वर्गावर त्यासंबंधानें खडतर टीकाही होते. ही स्थिति कशानें आली बरें?

विद्यासंपादनापासून द्रव्यप्राप्ति दिवसानुदिवस कमी होत आहे, ह्मणून या प्रकारचा तुह्मांस उपदेश करितों असें मात्र समजूं नका. निर्धनतेमुळें पुष्कळ वेळां थोर हेतु मनांतल्या मनांतच राहतात हा निर्धनतेचा दोष आहे खरा, परंतु निर्धनता आली ह्मणून कोणीही दोषास पात्र होत नाहीं; उलट गरीब स्थितींतच कित्येक मानवी गुणांचा पूर्ण विकास होतो. तुह्मांस शाळेंत असतां येथें जी विद्याप्राप्ति होते ती अल्पच गणिली पाहिजे, व तितकी विद्या प्रत्येकास असणें माझ्या मतें हल्लींच्या काळांत अवश्यच आहे. परंतु हा शाळेंतील विद्याभ्यासाचा काळ गेला व कुटुंबभार अंगावर पडण्याचा वेळ समीप आला ह्मणजे "पुढें काय" हा प्रश्न जेव्हां डोळ्यांपुढें उभा राहील, तेव्हांच्या तुमच्या स्थितीस उद्देशून हा उपदेश आहे. स्वपराक्रमानें किंवा पालकांच्या मदतीनें आपली विद्या परिपूर्ण करून मोठ्या हुद्याच्या जागा मिळविणें, वकील, डाक्तर, एंजिनीयर होणें, या गोष्टी तुह्मांपैकीं कांहीं थोड्यांस मात्र शक्य आहेत; परंतु बाकीच्यांस आपली पुढची वाट अन्य रीतीनेंच पाहिली पाहिजे. गरीब स्थितींत असतां, केवळ भिक्षा मागून जे तरुण ब्राह्मण विद्यार्थी विद्यार्जन करीत आहेत, त्यांविषयीं सर्व समंजस लोकांस अनुकंपा वाटते हें ठीकच आहे. जर ब्रह्मचारी राहून पूर्वींच्या ऋषीप्रमाणें विद्यानंदांतच निश्चितपणें काळ घालवायाचा त्यांचा निश्चय असता, तर त्यांचें वर्तन अत्यंत प्रशंसनीय

गणिलें जातें. परंतु वस्तुस्थिति अशी असते कीं विद्यासंपादनाच्या घाईनें शरीरास अकालीं क्षीणता आली आहे व चिंताज्वरानें मानसिक शक्तींच्या ऱ्हासास आरंभ होत आहे, अशा स्थितींत सर्व कुटुंबभार डोक्यावर घेऊन "नौकरी, नौकरी!" करीत त्यांस हिंडावें लागतें. या प्रयत्नांत त्यांच्या मनाच्या थोरवीचा व तसाच त्यांच्या आयुष्याचा नाश होतो, याविषयीं मनास साहजिकपणें अत्यंत खेद वाटतो, मग त्यांचे विद्यार्जनाचे कष्ट अयुक्त व अनर्थावह दिसूं लागतात. सोन्याची सुरी झाली ह्मणून ती उरीं खुपसतां कामां नये! पुष्कळ गरीब ब्राह्मण आईबाप व पालक दांतीं तृण धरून काळ लोटीत आहेत, व आपल्या मुलांस विद्याप्राप्ति व्हावी ह्मणून हरएक उपाय योजीत आहेत! आपल्या मुलांच्या कोंवळ्या मनास धक्का बसूं नये ह्मणून ते आपल्या यातना कदाचित् त्यांस सांगतही नसतील. परंतु ही स्थिति एकपक्षीं योग्य नाहीं. मुलें पाणीदार असतील तर आईबापांचे हाल पाहून तीं कधींही स्वस्थ बसणार नाहींत. त्यांनीं साहजिकच प्रश्न करावा कीं "बाबा! ही अलपस्वल्प विद्या मिळवून पुढें तुमच्याप्रमाणें अशीच ही विपत्ति भोगायचीना? बेहेतर आहे यापेक्षां एव्हांच हमाली करावी लागली तर, तुमचा तरी कांहीं भार कमी होईल." याप्रकारें स्वतंत्र उद्योगाच्या ईर्षेनें बाहेर पडून, हालअपेष्टा सोसून, आपल्या हिमतीनें ज्यांनीं आपलें नशीब काढलें अशीं कांहीं उदाहरणें माझ्या पाहण्यांत आहेत.

ह्या सर्व गोष्टी तुह्मांला सांगायाचें कारण काय? हेंच कीं शारीरिक परिश्रमाचे व बाह्यात्कारी अमंगळ दिसणारे

धंदे तुह्मीं तुच्छ गणूं नयेत. जोंवर अंतःकरण निर्मळ आहे व मनास उत्साह आहे, तोंवर बाह्यात्कारी कोणत्याहि मलीनतेस भिण्याचें कारण नाहीं. बुद्धि हें हरकामीं शस्त्र आहे, त्याचा हजार प्रकारांनीं कां तुह्मी उपयोग करीत नाहीं. कोणीं कोणताहि धंदा स्वीकारिला तर त्यांत हें शस्त्र त्यास उपयोगीं पडेल इतकेंच नव्हे, तर त्यायोगें त्याची इतरांवर सरशी होईल. जो या अशा धंद्यांच्या मागें लागला तो विद्यामृतास मुकला असें घडण्याचें कारण नाहीं; तेंही त्यास प्राप्त करून घेतां येईल. जॉर्ज स्टिफेन्सन, वॅाट, फाराडे, यांचीं चरित्रें तुह्मी वाचा; स्माइलचीं "इंडस्ट्रियल बायाग्रफी" व "सेल्फ्-हेल्प" हीं पुस्तकें वाचा; ह्मणजे या गोष्टीविषयीं तुह्मांस प्रत्यय येईल. मनांत हिंमत धरणारास काय अशक्य आहे? या शाळेस एक वर्कशॉप जोडावें अशी फार दिवस माझी इच्छा आहे; शिल्प व रसायन यांचें विद्यार्थ्यांस व्यवहारोपयोगी ज्ञान देण्यास दुसरें साधन नाहीं. परंतु असें वर्कशॉप स्थापण्याचीं अद्यापि साधनें मिळालीं नाहींत, तीं मिळतील तेव्हां मिळोत. जर कोणी गरीबाचा कनवाळू उदार पुरुष हीं साधनें पुरवील, तर तुह्मांस उदाहरण घालून देण्याण्याकरितां कारागिरीचा मलीन पोषाख करून पहिले पन्नास हतोड्याचे घाव मारण्यास मी स्वतः तयार आहे. धंद्यांच्या संबंधानें तुमच्या मनांतील परंपरागत दुराग्रह अगदीं नाहींसा झाला पाहिजे.

जेव्हां तुह्मी आतां घरीं जाल तेव्हां हा एक नवा विचार, हें एक नवें तत्त्व घरीं न्यावें, कीं उद्योगधंद्याच्या व बाह्य व्यवहाराच्या कामीं गतानुगतिकता हा गुण नव्हे, हा एक

मोठा दोष होय. कुटुंबांतील माणसांमध्यें जितकें वैचित्र्य असेल तितकें तें कुटुंबाच्या उत्कर्षास कारण होतें, व ही गोष्ट विशेषतः गरीब कुटुंबास लागू आहे. जोंवर प्रेमपाशास धक्का बसला नाहीं, जोंवर सदाचारापासून कोणी ढळला नाहीं, जोंवर कोणी आपलें कर्तव्य करण्यास चुकला नाहीं, तोंवर त्याच्या पोषाखासंबंधानें, धंद्याच्यासंबंधानें किंवा अशाच दुसऱ्या बाबींच्या संबंधानें त्यास पूर्ण स्वातंत्र्य देण्याचा प्रत्येक कुटुंबांतील माणसांचा निश्चय असला पाहिजे. प्रत्येकाची अक्कल कांहींएका कामांत विशेष चालते, याकरितां कोणामध्यें कांहीं विशेष गुण दिसल्यास त्याची तिकडेच प्रवृत्ति करून देण्यामध्यें कुटुंबांतील प्रत्येक माणसानें त्यास कां न मदत करावी? मुलाचे आवडते खेळ कोणते, रस्त्यानें जातांना त्यास विशेष गंमत कशांत वाटते, त्याचे प्रश्न कोणत्या गोष्टीविषयीं असतात, कोणतें काम तो मनापासून करतो, हें पाहून लहानपणींच त्याच्या बुद्धीचा कल ओळखतां येतो. त्या कलास उत्तेजन व पोषण मिळाल्यास तो एक त्याच्या अंगीं महत्वाचा गुणच होतो व उद्योगधंद्याच्या संबंधानें तो त्यास पुढें उपयोगीं पडतो. कुटुंबांतील माणसांनीं या लहानपणच्या मुलांच्या कृत्यांकडे लक्ष देऊन तदनुरूप त्यांस शिक्षण देणें किती हितावह आहे? असें केल्यानें कितीक निरर्थक खर्च वांचतील व अनेक गुणी पुरुष कुटुंबांत उत्पन्न होतील. जीं आज शाळेंत केवळ उनाड व मंद मुलें दिसत आहेत, त्यांच्या बुद्धीच्या विशेष कलास जर पहिल्यापासून उत्तेजन मिळून तदनुरूप त्यांचें शिक्षण झालें असतें, तर त्यांपैकीं कोणीं उत्तम सुतारकाम केलें

असतें, कोणी सुंदर नक्षीचें काम केलें असतें, कोणीं रमणीय मूर्ति घडल्या असत्या, कोणीं हुबेहुब चित्रें काढिलीं असतीं व कोणी सहजगत्या यांत्रिक कामाचे माहितगार झाले असते. मुलांत रुचिवैचित्र्य उत्पन्न करणें हें कुटुंबाच्या कर्तव्यांपैकीं एक अत्यंत महत्वाचें कर्तव्य आहे.

तुह्मांपैकीं पुष्कळांचें शाळेंतील शिक्षण थोड्या वर्षांनीं संपेल व कुटुंबभार अंगावर पडण्यापूर्वीं मध्यंतरीं तुह्मांस कांहीं वर्षें सांपडतील. या वर्षांचा तुह्मांस पाहिजे तसा उपयोग करितां येण्याजोगा आहे. शारीरिक श्रमाचा धंदा पतकरणाराचें शरीर सुदृढ व उन्हातान्हास निरढावलेलें असावें लागतें. या दृष्टीनें पहातां तुमची अभ्यास संपविण्याची घाई व शारीरिक व्यायामाविषयीं अनास्था फारच दूषणीय आहे. जणूंकाय मोठेपणीं निवाऱ्यांत बसून केवळ कलमबहादरीचें सौम्य काम करितां आलें कीं बस्स, असा पुढील आयुष्यभागाचा तुमचा अंदाज दिसतो. परंतु हा केवळ भ्रम आहे. गरीबांस जगाची वस्ती याहून फार खडतर आहे, व कोणाच्या नशीबीं कोणते कष्ट करण्याचें येईल हें सांगवत नाहीं. शाळेच्या सुखाच्या दिवसांत थोडे कमीजास्ती मानसिक श्रम झाले, किंवा परीक्षा जवळ आली, किंवा थोडें हवामान बदललें, किंवा पाऊसवारा लागला तर आजारी पडावें अशी जर तुह्मी आपल्या शरीराची एव्हांच दुर्दशा करून घेतली तर तुमचें पुढें कसें होईल ? तुमच्या पालकांस हल्लीं जे कष्ट पडत आहेत, त्यांहून थोडे अधिकच कष्ट तुह्मांस सोसायाचा प्रसंग बहुधा येईल. व पालकांच्या वृद्धपणींही त्यांमध्यें हल्लीं जो जोम दिसतो तो जर तुह्मीं बालपणींच गमाविला

तर तुमचा पुढें कसा निभाव लागेल? तुमचें बालपण संपलें नाहीं तोंच आपल्या गरीबीचा विचार न करितां, पालकांनीं तुमची लग्नें करून दिलीं आहेत, व कुटुंबभरणाचें तुमचें ओझें जड करून ठेविलें आहे. जर या वयांत जोडलेल्या अशक्तपणामुळें तुह्मी पुढें आपल्या कामास नालायक झालां, किंवा तुह्मांस अकालीं मृत्यूनें गांठलें, तर आपणांवर सर्वस्वी अवलंबून असणाऱ्या कुटुंबांतील माणसांवर केवढा दुर्धर प्रसंग येईल याचा तुह्मी विचार केला आहे काय? कोणतेंही काम करितांना दूरवर दृष्टि देऊन व त्या कामापासून जो फार वाईट परिणाम घडणार तोही डोळ्यापुढें धरून मग त्या कामास आरंभ केला पाहिजे. अभ्यासांत निरंतर दंग राहून जेव्हां शारीरिक कर्तव्यें तुह्मीं विसरतां तेव्हां त्या तुमच्या अविचारास काय ह्मणावें? ज्याप्रमाणें विद्यासंपादन हा पुढील आयुष्यक्रमाच्या तयारीचा एक भाग आहे, त्याप्रमाणेंच श्रमास न डगणारें, उन्हातान्हास न जुमानणारें, चांगलें धडधाकट शरीर असणें हा त्या तयारीचाच दुसरा व अधिक महत्वाचा भाग आहे. अभ्यासाची घाई करून शरीराची हानि करून घेणें हें कुटुंबाच्या दुःखपरंपरेचें केवळ बीज होय. जर शरीर संभाळून तुह्मीं विद्यार्जन केलें तर कोणत्याही कामांत व कोणत्याही धंद्यांत पडायाचा तुह्मीं निश्चय केल्यास तुह्मांस यश येईल. व ज्यानें त्यानें आपल्या बुद्धीच्या कलाप्रमाणे आपल्या जीविकेचा निरानिराळा मार्ग काढिल्यास कुटुंबाचा मोठा फायदा होईल.

येथपर्यंत कुटुंबस्थितीच्या एका दोषाचें विवेचन केलें. हा गतानुगतिकतेचा दोष कुटुंबांतील पुरुषांस विशेषंकरून

लागू आहे. आतां दुसरा जो दोष सांगणार व ज्यासंबंधी तुमच्या कर्तव्यांचें विवेचन करणार तो दोष स्त्रियांच्या कुटुंबांतील स्थितीविषयीं आहे. कुटुंबांतील माणसांत जितकीं नातीं तितके प्रेमाचे प्रकार उत्पन्न होतात असें पूर्वीं सांगितलेंच. सर्व प्रकारचे प्रेमपाश कुटुंबांत स्त्रियांच्या द्वारें उत्पन्न होतात, व सर्व प्रेमबंधनांचा उगम मातेपासून होतो. माता ही कुटुंबाची अधिदेवता होय. ज्याप्रमाणें चक्राचे अरे भिन्न दिशांनीं येऊन एका मध्याशीं मिळतात, त्याप्रमाणेंच कुटुंबांतील माणसांचा निरनिराळ्या नात्यांनीं या अधिदेवतेशीं संबंध जडलेला असतो. स्वतंत्र कुटुंबाचा मध्य बनल्यावर स्त्रियांस जीं कर्तव्यें करावीं लागतात, त्यांचें महत्व तुमच्या क्वचितच ध्यानांत आलेलें असेल. कुटुंब सुखी राहण्यास स्त्रियांच्या अधिकाराखालीं तें सुरळीतपणें चाललें पाहिजे. ज्या घरांत स्त्रिया असंतुष्ट त्यांत कोणासच सुख व्हावयाचें नाहीं. कुटुंबांत स्त्रिया जो अधिकार चालवितात तो त्यांच्या विशेष कर्तव्यांमुळें व त्यांच्या गुणांमुळेंच त्यांस प्राप्त होतो. बाहेरच्या उद्योगधंद्याच्या परिश्रमानें थकून जाणारी पुरुषमंडळी घरची व्यवस्था साहजिकपणें स्त्रियांकडे सोंपविते, व घरच्या व्यवस्थेंत आपल्या हिंदुलोकांच्या समाजांत स्त्रियांचें केवळ साम्राज्य असतें. हीच स्थिति योग्य आहे. कारण पुरुषांमध्यें जे गुण आहेत त्यापेक्षां स्त्रियांमध्यें साहजिक असणारे गुणच कुटुंबव्यवस्थेच्या विशेष उपयोगीं पडतात.

कोणासही स्वतंत्र अधिकार प्राप्त झाल्यास तो त्याचा आपल्या योग्यतेप्रमाणें उपयोग करितो. कुटंबसंबंधी आपला अधिकार चालवीत असतां स्त्रियाही आपणांस जें योग्य

दिसेल तें करितात; त्यांच्या पुढें बहुधा कोणाचें कांहीं चालत नाहीं. कोणीं पुरुषानें अविचारानें बायकांच्या कारभारांत हात घातल्यास तो कुटुंबांतील सुखसमाधानाची हानि मात्र करून घेतो. आपल्या स्त्रियांचीं कुटुंबसंबंधीं महत्वाचीं कर्तव्यें पाहिल्यास तीं अनेक आहेत. एका अविभक्त हिंदु कुटुंबांत अनेक लहान कुटुंबांचा संग्रह झालेला असतो, व तीं एकत्र राहणें किंवा विभक्त होणें हें त्यांतील स्त्रियांच्या शहाणपणावर अवलंबून असते. प्रत्येक माणसास प्रेमानें व सौजन्यानें बांधून टाकणें हें कुटुंबांतील प्रमुख स्त्रीचें काम असतें. हें काम किती अवघड आहे याची थोड्यांसच कल्पना असेल. लहानांस लालनपालनानें, थोरांस ममतेच्या बळानें व वृद्धांस युक्तिवादानें आपल्या स्त्रिया एकजीव करितात. जीं माणसें कदापि एकत्र नांदायाचीं नाहींत तीं अशा सामोपचारांनीं वर्षेंचीं वर्षें एकत्र काढतात व अखेरीस आपले तंटे विसरतात. जेथें जेथें मोठीं कुटुंबें नांदत आहेत तेथें तेथें त्या कुटुंबांचा अधिकार विशेष शहाण्या व विचारी स्त्रियांच्या हातीं आहे असें अनुमान करण्यास हरकत नाहीं. प्रत्येक माणसास आपलें कर्तव्य करावयास लावणें व तें त्यांकडून करून घेणें हें काम कुटुंबांत वस्तुतः स्त्रियाच करितात. घरांत असणारी व्यवस्था, काटकसर व स्वच्छपणा हींही कुटुंबांतील स्त्रियांवरच बहुतांशीं अवलंबून आहेत.

कुटुंबांतील कुलाचारांचें संरक्षण करणें हें काम स्त्रियांनीं पत्करिलें आहे. या कुलाचारासंबंधीं स्त्रियांस किती माहिती असते, त्यांस ते वेळेवर कसे सुचतात, त्यांची त्या

कशी व्यवस्था ठेवितात, हें पाहून पुरुषांस आश्चर्यच वाटतें कारण या सर्व गोष्टी त्यांनीं कोठें टिपून ठेविलेल्या नसतात, केवळ स्मरणानें त्यांस त्यांची स्फूर्ति होते. प्रत्येक महिन्याचीं व महिन्याच्या प्रत्येक दिवसाचीं जर कांहीं विशेष कृत्यें असतीं तर तीं सर्व आपल्या स्त्रियांनीं ध्यानांत ठेविलीं असतीं. कोणत्या दिवशीं किती ब्राह्मण सांगायाचे, किती दक्षिणा द्यावयाची, कोणतें पक्वान्न करावयाचें, किती नैवेद्य तयार करायाचे, कोणास वाढणीं द्यावयाचीं, कोणते आप्त बोलवायाचे, वगैरे गोष्टी पूर्वापार चालत आल्याप्रमाणें प्रत्येक कुटुंबांत बिनचूक घडून येतात. आपल्या लहान सुनांस हे कुलाचार शिकविणें, व त्या स्वतंत्रपणें संसार पाहूं लागल्यावर त्यांचें पालन करितात कीं नाहीं हें पाहणें या कामांतही सर्व स्त्रिया दक्ष असतात. या कुलाचारांखालींच बहुतेक सर्व धर्मकृत्यें येतात; व स्त्रियांच्या अमलाखालीं कुटुंबें आहेत ह्मणूनच तीं अद्यापिही पूर्ववत् चालत आहेत असें ह्मणण्यास हरकत नाहीं. मुलांच्या व मुलींच्या लग्नाच्या वयांची इयत्ता ठरविणें हें कामही वस्तुतः बायकांनींच आपणांकडे घेतलें आहे, व ही इयत्ता वाढविण्याचा पुरुषांकडून जो केव्हां केव्हां प्रयत्न होतो तो करितांना बायकांस बहुधा निरनिराळ्या सबबी सांगून फसवावे लागतें. धर्मादायासंबंधानें व धर्मपालनासंबंधानें कुलाचा व कुटुंबाचा जो लौकिक असतो तो कुटुंबांतील स्त्रियांच्या धर्मश्रद्धेमुळेंच होय. व्रतनियमउपोषणादिकांनीं देह झिजवून व नानाप्रकारचीं दानें व ब्राह्मणभोजनें करून, जेव्हां स्त्रिया आपली निःसीम, निर्मळ धर्मभक्ति प्रकट करितात, तेव्हां

त्यांच्या तुलनेनें आपण किती पतित आहों असेंच पुरुषांस वाटावें. स्त्रियांच्या ज्ञानाच्या व समजुतीच्या मानानें पहातां दान, धर्म व कुलाचार यांविषयींची त्यांची व्यवस्था वर्णनीय आहे असें ह्मटल्यावांचून राहवत नाहीं.

परंतु स्त्रियांच्या कर्तव्याचा अत्यंत महत्वाचा एक भाग अद्याप सांगावयाचाच आहे. तो भाग मुलांचें संगोपन करणें हा होय. स्त्रियांच्या स्वभावांतील अतिशयित वर्णनीय गुण या कर्तव्याच्या बजावणींत प्रकट होतात; व स्त्रियांविषयीं जगांत जो सर्वत्र बहुमान आहे तो याच गुणांमुळें. गर्भधारणापासून तों मूल मोठें होऊन शाळेंत जाऊं लागेपर्यंत त्याच्या संबंधानें स्त्रियांस जे क्लेश सोसावे लागतात त्यांचें वर्णन करणें अशक्य आहे, व एवढे क्लेश सोसून जिनें आपणांस जीवदान दिलें तिजविषयीं आपण जन्मभर कृतज्ञ राहिलों तर त्यांत कांहीं विशेष नाहीं. प्रसूतिसमयींच्या भयंकर वेदनांची तर आपणांस कल्पनाच यावयाची नाहीं, परंतु त्या अपरिहार्य ह्मणून कोणी सोशील. परंतु पुढें त्या तान्ह्या बाळास वाढवीत असतां आईस किती कष्ट सोसावे लागतात या गोष्टीचा प्रत्यक्ष अनुभव पाहिल्यास, 'धन्य धन्य' असे साहजिक उद्गार निघतात. तान्हें मूल फुलाप्रमाणें सुकुमार असतें, त्यास किती जपून वागवावें लागतें! त्याच्या झोंपेची व सावधपणाची पाळी दरघटका दोन घटकांनीं बदलते, व महिनेच्या महिने स्त्रियांस स्वस्थ अशी झोंप मिळत नाहीं. त्यास आंगच्या दुधावरच पोशिलें पाहिजे, व या कामीं मुलें आईस जो रडूनआरडून त्रास देतात तो तिजवांचून कोणी क्वचितच सोशील. जरी मूल सुखरूप असलें तरी

त्यास खेळविण्यास केवढे प्रयास पडतात! त्याशीं त्यासारखें व्हावें लागतें, त्याच्या स्वराप्रमाणें स्वर काढावा लागतो, त्याच्या मंदगतीस तितक्याच मंदगतीनें अनुसरावें लागतें, व त्याची अनेक तऱ्हेनें मनधरणी करावी लागते. त्यास क्षणभरही विसंबतां कामा नये, कारण मूल कोठून केव्हां कोलमडून पडेल हें सांगतां येत नाहीं. मुलाच्या संगोपनाचे कष्ट जरी एवढेच असते तरी देखील आईच्या अंगीं असलेल्या ममतारूप ईश्वरी देणगीवांचून ते सहन करण्याचें फारच थोड्यांच्या हातून झालें असतें. परंतु तान्हेपणाचा काळ ह्मटला ह्मणजे केवळ अजाराच्या भरतीचाच काळ होय, व याच काळांत पुष्कळ मुलें गचावतात. मूल अजारी असतां आई जी त्याची शुश्रूषा करिते ती तिच्या अपार प्रेमाची साक्ष देते. मूल अशक्त व निर्जीव होऊन पडलें असतां रात्रंदिवस आठी प्रहर त्याच्या तैनातीस बसणें, त्याच्या कोमेजलेल्या तोंडाकडे व हातापायांच्या काड्यांकडे पहात असतांही अंतःकरणाचें धैर्य न सोडणें, अनेक औषधोपचार करीत असतां "देवा याला लवकर बरा कर" ह्मणून मनःपूर्वक नित्य नित्य ईश्वराचा धावा करणें, व इतकें करूनही मूल गमावलें तर दीनवाण्या स्वरानें हंबरडा फोडणें व मोठ्या कष्टानें आवरून धरिलेल्या शोकवेगास एकाएकीं पूर येऊं देणें—या सर्व गोष्टी आईच्या अपार प्रेमाच्या निदर्शक आहेत. आणि कित्येक स्त्रियांवर असे दुःखप्रसंग अनेकवार येतात, परंतु प्रत्येक प्रसंगीं मुलाच्या शुश्रूषेंत तिळमात्र अंतर पडत नाहीं, असें जेव्हां आपण पहातों तेव्हां त्यांच्या अंतःकरणाची अवर्णनीय थोरवी आपल्या लक्षांत येते.

मुलानें आपली आज्ञा पाळावी व आपला मान राखावा एवढें बाप मुलाचें कर्तव्य समजतो, परंतु आई एवढेंच मागत नाहीं, तर आपल्या ममतेची मुलानें ममतेनेंच फेड करावी अशी ती आशा करिते. आणि ही गोष्ट साहजिकच नव्हे काय ? एका ईश्वराच्या खालोखाल जीविषयीं प्रेम व कृतज्ञता बुद्धि आपणांस वाटावी ती माता होय !

मातेची आतां एक देणगी सांगावयाची राहिली. अनेक मुलें एकत्र खेळत असतां त्यांच्या वर्तनांत पुष्कळ भेद दिसून येईल. कोणी हट्टी, कोणी उर्मट, कोणी आपलपोटी, कोणी मायाळू, कोणी उदार, कोणी सहनशील, कोणी फार कोमल अंतःकरणाचीं, अशीं तीं दिसतील. हे गुणदोष बहुधा आईकडून मुलांस जें नकळत शिक्षण मिळालेलें असतें त्याचे परिणाम होत. जेव्हां लहानपणींच मुलांत थोरवीचा अंकूर दिसूं लागतो, तेव्हां अमुक प्रकारचें वर्तन कां बरें किंवा तें कोणीं करायास सांगितलें हें त्या मुलास सांगतां येणार नाहीं. याचें कारण असें आहे कीं, ज्या वयांतील आत्मवृत्ताचें मुलास स्मरण नसतें त्या वयांत आईनें दिलेल्या आज्ञा, त्या वयांत तिनें केलेलें नियमन मुलाच्या पुढील संवयीचें कारण होतें. या रीतीनें ज्या चांगल्या गोष्टी आपण बाळपणीं शिकलों त्या आपल्या स्वभावांत खिळून जातात, व आपणांस ते गुण जणूंकाय उपजतच प्राप्त झाले असें आपण मानितों. वास्तविक पाहतां आईच्या उपकारांचें हें फळ होय. कित्येक मोठ्या पराक्रमी पुरुषांचें मोठेपणचें उत्तम वर्तन त्यांस बाळपणीं नकळत मिळालेल्या मातृशिक्षणाचाच परिणाम होय असें इतिहासांत दृष्टीस पडतें. आईच्या प्रेमाचा अं-

मरू मनुष्य मोठा होईपर्यंत त्यावर असतोच, व त्या अमलाचा परिणाम तरुणांच्याही स्वभावावर घडतोच. पुष्कळ पुरुषांच्या मोठेपणास त्यांच्या माता कारण झाल्या आहेत; व सामान्यतः देशांतील मातृशिक्षणाचें जें स्वरूप असेल, तदनुरूप सगळ्या देशाचाही स्वभाव बनतो. तसेंच जन्मतः जे गुणदोष मनुष्यास प्राप्त होतात, त्यांपैकीं कांहीं त्यास आईकडून येतात. विशेषतः स्वभावप्रकृति, शरीरप्रकृति व नैसर्गिक मनोवृत्ति, यांसंबंधानें आईचे गुण वारंवार मुलांत उतरतात, व त्यांचीही आईच्या बऱ्यावाईट देणग्यांमध्येंच गणना केली पाहिजे.

असो. याप्रमाणें एथवर आपल्या कुटुंबांत स्त्रिया कोणकोणतीं प्रमुख कार्यें करितात, त्यांचा कुटुंबांत किती अधिकार चालतो, त्यांच्याकडून मुलांस कोणत्या देणग्या मिळतात या गोष्टींविषयीं विवेचन केलें. त्यावरून कुटुंबव्यवस्थेंत स्त्रियांचें केवढें महत्व आहे हें लक्षांत येईल. आतां वस्तुतः असें दिसतें कीं, गतानुगतिकता हा दोष आपल्या कुटुंबांस खिळून जाण्याचें एक कारण स्त्रियांचें अत्यंत नियमित प्रकारचें ज्ञान होय. कुटुंबसंबंधीं जीं कार्यें मोठ्या हुशारीनें स्त्रिया तूर्त बजावीत आहेत, त्यांचा फार झालें तर एवढाच परिणाम घडतो कीं, आहे त्या स्थितींत कुटुंब सुखानें राहतें, परंतु त्या सुखाची वृद्धि करण्याच्या कामीं किंवा कुटुंबाच्या उन्नतीच्या कामीं स्त्रियांकडून मुळींच मदत होत नाहीं, उलट झाल्यास विरोधच होतो.

याशिवाय असें पहा कीं, आपल्या आईचे उपकार आपणांस कधींच विसरतां येणार नाहींत, तिजविषयींचें प्रेम कदापि कमी होऊं देतां कामा नये, परंतु तिजविषयींच्या

कृतज्ञतेस व प्रेमास जर खऱ्या बहुमानाची जोड करितां आली तर किती बरें होईल? सुधारलेल्या देशांतील स्त्रिया मागें सांगितलेलीं सर्व कर्तव्यें करून त्यांशिवाय दुसरींही अनेक कर्तव्यें बजावितात. तिकडील कांहीं प्रसिद्ध स्त्रियांनीं जीं कित्येक औदार्याचीं, बुद्धिपरिश्रमाचीं व लोकहिताचीं कामें केलीं आहेत, तीं करण्याचें मोठ्या पराक्रमी पुरुषांसही या देशांत अवघड वाटेल. याच कारणानें सुधारलेल्या देशांत स्त्रियांविषयीं आदर व बहुमान वाढत आहे, व त्यांची सत्ता कुटुंबांतच नव्हे, तर अपरोक्षपणें राजकारणांतही वाढत आहे. स्त्रियांच्या सौंदर्यामुळें, किंवा त्या अबला ह्मणून, किंवा कुटुंबिनी ह्मणून सुधारलेल्या देशांत त्यांचा सत्कार फार प्राचीन काळापासून होत आहे. परंतु ज्या समंजस स्त्रियांस हा सत्कार केवळ बाह्यात्कारी वाटूं लागला, तो गुणमूलक नव्हे तर दयामूलक आहे असें भासूं लागलें, त्यांनीं तो आपल्या वर्णनीय सत्कृत्यांनीं सर्व जगापासून हक्कानें संपादन केला आहे. जर तुह्मांस असें दाखविलें कीं, ज्या गुणांनीं युरोपांतील स्त्रिया याप्रमाणें प्रसिद्धीस आल्या आहेत तेच गुण एतद्देशीय स्त्रियांत असूनही केवळ पुरलेल्या द्रव्याप्रमाणें निरर्थक झाले आहेत. जर तुह्मांस विशेष करून असें दाखवितां आलें कीं, या गुणांचा योग्य उपयोग केल्यास कुटुंबें अधिक सुखी होतील, मुलें अधिक शूर व महत्वाकांक्षी होतील, व कुटुंबांची व राष्ट्राची संपत्ति आणि लौकिक हीं वाढतील-तर स्त्रियांच्या गुणांचा पूर्ण विकास करून देण्याकरितां तुह्मी आपोआप तयार व्हाल. कुटुंबाच्या अभिमानानें व मायबहिणींच्या प्रेमानें तुह्मी कांहीं

नवीं कर्तव्यें बजावण्यास तयार व्हावें ह्मणूनच माझा हा उपदेशाचा प्रयत्न आहे.

ऋषिकालीं गार्गी, वाचक्नवी वगैरे ज्या स्त्रिया झाल्या त्यांच्या ज्ञानावरून व गुणांवरून हल्लींच्या स्त्रियांस काय सुसाध्य आहे याविषयीं अनुमान करणें कोणास आयोग्य दिसेल. याकरितां हल्लींच्याच स्त्रियांत कांहीं मोठ्या थोर गुणांचीं बीजें स्पष्टपणें दिसून येतात असें दाखविलें पाहिजे. संस्कृत काव्यें, नाटकें व सुभाषितें ज्यांनीं लिहिलीं त्यांस तर आपल्या स्त्रीजनाच्या थोर गुणांची कल्पनाही नसावी. व त्यांचीं तीं सुभाषितें सर्वतोमुखीं होत चाललीं आहेत हें मोठें दुर्भाग्यच होय. मला स्वतः हल्लीं जी एतद्देशीय स्त्रियांची स्थिति दिसते ती कांहीं अंशीं पुराणांतील सुप्रसिद्ध स्त्रियांप्रमाणें आहे, एवढाच भेद कीं पुराणांतील स्त्रिया बहुतेक राजकन्यका आहेत, व आपण सामान्य जन आहों. या कारणानें उभयतांवर येणारे प्रसंग भिन्न असायाचे व आचरणांतही भेद पडायाचाच, तथापि उभयतांच्याही मानसिक स्थितींत निःसंदेहपणें साम्य दिसून येतें.

ज्याप्रमाणें मुलांच्या बुद्धीमध्यें पुष्कळ अंतर दिसतें, त्याप्रमाणें स्त्रियांच्याही बुद्धीमध्यें अंतर असलेंच पाहिजे. जशीं कित्येक मुलें अत्यंत बुद्धिमान् असतात, त्याप्रमाणें कित्येक मुलीही अत्यंत बुद्धिमान् असतात. कित्येकांच्या मतें तर मुलींची बुद्धि अधिकच तीव्र असते. परंतु सामान्यतः स्त्रीपुरुषांमध्यें बुद्धीचा फारसा भेद नाहीं असें ह्मणण्यास हरकत नाहीं. हल्लींच्या कुटुंबव्यवस्थेमुळें त्या बुद्धीच्या उपयोगांत मात्र मोठा भेद उत्पन्न होतो. पुरुषास ज्ञानप्राप्तीचे मार्ग

खुले असल्यानें तो प्रसिद्धीस येतो, स्त्रियांस अप्रौढ वयांतच संसारभार अंगावर घ्यावा लागल्यानें त्यांच्या बुद्धीचा विकास मुळींच होत नाहीं. तरी देखील स्त्रियांच्या स्मरणांत किती भिन्न गोष्टींचा संग्रह असतो, कोणत्याही प्रकारच्या टिप्पणावांचून तिथी, नांवें व घडलेल्या गोष्टी त्या किती बिनचूक ध्यानांत धरितात, त्यांच्या कुटुंबरूप अल्पजगांत त्यांस किती प्रसंगावधान असतें, हें पाहिलें ह्मणजे त्यांच्या बुद्धीची तीव्रता ध्यानांत येते. स्त्रियांच्या बुद्धिविकासास अनुकूल असें ज्या ज्या कुटुंबांत वर्तन झालेलें आहे, तेथें मातापितरांची किंवा आप्तांची निराशा झाल्याचें आढळण्यांत नाहीं. आपल्या इतिहासांत प्रसिद्ध स्त्रियांचीं उदाहरणें थोडीं आहेत खरीं, परंतु जीं थोडीं आहेत तीं त्यांच्या तीव्र बुद्धीचीं व प्रगल्भ विचारांचीं द्योतक आहेत.

दया हा गुण स्त्रियांमध्यें विशेष दृष्टीस पडतो. मुलांलेकरासंबंधानें तो ममतारूपानें प्रगट होतो, आप्तांच्या संबंधानें प्रेमरूपानें प्रकट होतो व गरीबगुरीबांच्या संबंधानें दानधर्माच्या द्वारें प्रकट होतो. दाराशीं आलेला भिकारी हिंदुंच्या घरांतून बहुधा विन्मुख बाहेर पडत नाहीं—मूठभर तांदूळ, आटा, दाणे किंवा भाकरीचा तुकडा त्यास मिळायाचाच. स्त्रियांच्या स्वाधीन जर घरचा सर्व कारभार असता, तर त्यांच्या दयेचा ओघ हल्लींपेक्षां अधिक वेगानें वाहिला असता यांत संशय नाहीं. पहा कीं घरांत किती तरी काटकसर करून, आपले कितीएक प्रकारांनीं हाल करून घेऊन, गरीबगुरीबांच्याही स्त्रिया पैसा पैसा सांठवितात, व पुढें व्रतनियम उद्यापनें व यात्रा करून त्याचा सत्कारणीं व्यय करितात.

आदरातिथ्य हा गुणही स्त्रियांमध्यें विशेषप्रकारें वागतो. दुसऱ्यांनीं आपल्या येथें यावें, आपणाकडून सत्कार घ्यावा, एकमेकास वारंवार भेटावें व हितगुजाच्या गोष्टी बोलाव्या, या गोष्टींची स्त्रियांस जेवढी हौस असते तेवढी आपणां पुरुषांस कोठें आहे ? कुटुंबांचें परस्परांशीं दळणवळ राहण्यास व त्यांमधील स्नेह कायम राहण्यास मुख्यत्वें करून स्त्रिया कारण आहेत. कोठें सभेस जातां येत नाहीं, कोठें बहुसमाजांत मिसळतां येत नाहीं, घराच्या बाहेर पडणें तें नियमित वेळीं मोठ्या विनयानेंच पडलें पाहिजे, असें असतां, स्त्रियांच्या ओळखी केव्हां केव्हां पुरुषांपेक्षां अधिक असतात, त्यांमध्यें परस्परांचें अधिक आगत्य राहतें व समारंभांच्या प्रसंगीं मंडप साजरा करण्यास स्त्रियांची जेवढी दाटी होते, तेवढी पुरुषांची होत नाहीं. अशा प्रसंगीं उच्चनीच भेद स्त्रिया जसा विसरतात तसा तो पुरुष विसरत नाहींत. विपत्तीच्या प्रसंगींही एकमेकांस मदत करण्यास स्त्रिया जितक्या कळवळ्यानें धांवतात, तितका कळवळा पुरुषाच्या अंतःकरणांत उत्पन्न होत नाहीं.

कुटुंबकृत्यें व धर्मकृत्यें यांपलीकडे हल्लींच्या स्थितींत स्त्रियांची मदारच जाऊन पोहोंचत नाहीं. त्यांच्या जगाचा एकदर विस्तारच इतका आकुंचित झालेला आहे. परंतु तेवढ्यांतच आपल्या स्वभावांतील कांहीं उदात्त गुण प्रकट करण्याची त्यांस संधी सांपडते. कुटुंबहिताच्या दृष्टीनें किंवा धर्माच्या दृष्टीनें अमुक एक गोष्ट करणें आपलें कर्तव्य आहे अशी स्त्रियांची खात्री झाल्यावर त्या कर्तव्याच्या बजावणीकरितां कितीही प्रयास पडले, कितीही हाल सोसावे लागले, कितीही स्वहितत्याग करावा

लागला, कितीही धैर्य व सहनशीलता धरावी लागली, तथापि त्या सर्वांस त्या तयार असतात; कर्तव्याची उपेक्षा करणें हें जणूंकाय स्त्रीस्वभावांत नाहींच. आई-बापांनीं ज्याशीं एकदा विवाह लाविला तोच आपला जन्माचा मालक ही धर्मबुद्धि एकदा मनांत भरल्यावर, नवरा कितीही मूर्ख असो, पंगू असो वा दरिद्री असो, त्यास आपलें सर्व प्रेम अर्पण करायाचें हा गुण किती अप्रतिम आहे! या गुणामुळें पतीच्या जीवंतपणीं व मरणानंतर स्त्रियांस वारंवार किती तरी हाल सोसावे लागतात. परंतु त्यांबद्दल त्यांची स्वतःची तक्रार आहे काय? मुलांविषयीं जें अपार प्रेम मातेमध्यें असतें, त्याच्या आवेशानेंही धर्मोल्लंघनाचें साहस त्यांच्या हातून होत नाहीं. भ्रष्ट व व्यसनी नवऱ्याच्या स्वाधीन झाल्यानें दमयंतीच्या चरित्राची कित्येक हिंदु कुटुंबांत नित्यशः पुनरावृत्ति होत आहे. अशा पतीच्या मरणानंतर पाहिजे ते कष्ट करून, थोडी पुंजी जुळवून, त्याच्याच उद्धारार्थ गयेच्या विष्णुपदीं पिंड अर्पण करणारी एकही स्त्री या देशाच्या बाहेर सांपडेल काय? परंतु या देशांत अशा हजारों स्त्रिया प्रतिवर्षी काशीयात्रेस जात आहेत, व जन्मभर कष्ट करून सांचविलेलें द्रव्य धर्मकर्मांत खर्च करीत आहेत! पुण्याच्या व परलोकप्राप्तीच्या आशेनें पूर्वीच्या काळीं अशा स्त्रियांनीं प्रापंचिक सर्व बंधनें झुगारून देऊन शाश्वतचा पतिसमागम जोडण्याच्या आशेनें सती जाऊन ऐहिक जीवयात्रेची परिसमाप्ति केली यांत आश्चर्य तें काय?

पतीची सहचारिणी होऊन खेड्यापाड्यांत, रानावनांत, विदेशांत जाऊन स्त्रीनें रहावें हें साहजिकच आहे, परंतु

केवळ पुण्यप्राप्तीकरितां वैधव्यदशेंत स्त्रिया जे प्रवास अंगीकारतात ते किती वर्णनीय होत! पुरुष प्रवासास निघतांना त्यास असें होतें कीं काय काय तरी तयारी करावी. वाटेंत खाण्यापिण्याचे हाल होतील कीं काय, परदेशांत आपलें बोलणें कोणास समजेल कीं नाहीं, आगगाडीचा मार्ग कोठवर आहे, पुढें गाड्याघोडीं मिळतील कीं नाहीं, इत्यादि शंकांचें समाधान करून घेण्यांतच त्याची अर्धी उमेद खचते, व चिंतिलेला प्रवास मनांतल्या मनांतच वारंवार विलयास जातो. सुखांतला जीव दुःखांत कोणीं घालावा! हा आपला पुरुषांचा भेकडपणा, व यामुळेंच आपलें देशांतर कमी. परंतु धर्मकर्माच्या उत्साहानें प्रवासयात्रा अंगीकारणाऱ्या अबला विधवेच्या मनांत या शंका किंवा असला भेकडपणा कधीं क्षणमात्र तरी वागतो काय? जन्मभर केलेल्या कष्टांनीं त्यांच्या शरीरास सहिष्णुता आलेली असते, एकवेळच्या अन्नसेवनानें भुकेची तीव्रता मंद झालेली असते, व नित्यसहवासानें उपासतापासांचें भय उरलेलें नसतें. अशा स्त्रियांस प्रवासाचें कां भय वाटावें? काशीपासून परमेश्वरापर्यंत एकदोन वेळां प्रवास करून आलेल्या हजारों स्त्रिया सांपडतील; मथुरा, वृंदावन वगैरे पाहून आलेल्या स्त्रियाही पुष्कळ आहेत. रामेश्वराहून गोकर्णमहाबळेश्वराण जाण्याकरितां होड्यांतून कित्येक दिवसांचें समुद्रप्रयाण केलेल्या स्त्रियाही अनेक आहेत. बर्फांतून ७वड्या पायानें चालून, दोन दोन दिवसांचे उपास काढून, अनेक पहाड हळू हळू चढून, अखेरीस हरिद्वारच्या कुंडांतील बर्फासारख्या थंड पाण्यांत स्नान करून परत आलेल्या स्त्रि-

याही पाहण्यांत आहेत. कित्येकांनीं तर गंगोत्री केदारबद्रीनाथापर्यंतही आपली मजल पोहोंचविली आहे ! या धैर्यवान् स्त्रियांस पैशाचें सहाय्य नसतें व ओळखीची सोबतसंगतही लागत नाहीं. पुण्यसाधनाच्या ईर्षेपलीकडे त्यांच्या जिवास उत्साह देणारें दुसरें कांहींएक नसतें. या प्रकारचें हें स्त्रियांचें धैर्य पाहून पुरुषांस लाज वाटली पाहिजे. ज्यांच्या दुर्भाग्याबद्दल आपण इतका कळवळा दाखवितों, त्यांचीं हृदयें आपणांपेक्षां किती धिम्मी आहेत, त्यांची धर्मश्रद्धा आपणांपेक्षां किती बळकट आहे याचा आपण कधीं तरी विचार करितों काय ?

याप्रमाणें एथपर्यंत स्त्रियांच्या कांहीं प्रमुख गुणांचें वर्णन केलें. हें वर्णन करितांना अतिशयोक्ति बिलकुल केली नाहीं. माझ्या मतें हे सर्व गुण कमीअधिक प्रमाणानें हिंदुस्त्रियांत, विशेषतः ब्राह्मणस्त्रियांत, वागत आहेत. परंतु हल्लीं ते प्रसंगविशेषीं मात्र दिसून येतात. या गुणांचा विचार केला असतां कोणत्याही दुसऱ्या देशांतील स्त्रियांपेक्षां आपल्या स्त्रिया कमी योग्यतेच्या आहेत असें मानण्यास जागा रहात नाहीं. सत्कृत्यांनीं थोर पदवीस चढून सर्व देशास भूषणरूप होण्यासारख्या स्त्रिया या देशांतही आहेत असें ह्मणावें लागतें. परंतु उपयोग काय? हे सर्व गुण बहुतेक अंशीं पुरलेल्या धनाप्रमाणें आहेत. त्यांचें बीज होत नाहीं. आपला पूर्णपणें प्रकाश पडण्यास त्या गुणांस संधी मिळत नाहीं. कुटुंबाच्या किंवा कुलाच्या उन्नतीस त्यांचा उपयोग तर होत नाहींच, उलट कांहीं अंशीं याच्या विपरीतच परिणाम घडलेला दिसतो.

कारण असें पहा कीं स्त्रियांस आपण इतक्या अज्ञान

दर्शेत ठेविलें आहे कीं त्यांबद्दल आपणांस पुष्कळ प्रेम वाटेल, परंतु नित्य व्यवहारांत त्यांविषयीं बहुमान वाटण्याजोगे त्यांमध्यें फारच थोडे गुण आढळतात. इंग्रजी विद्येनें स्त्रीपुरुषांच्या ज्ञानांत व विचारांत नित्य अधिक अंतर पडत आहे. तें भरून आणण्याचा प्रयत्न असावा तसा जोराचा नाहीं. सामाजिक व राजकीय बाबतींत पूर्वींची विचारसरणी मोडून नवीनच सरणी चालू झाली आहे, व नवी भाषा, नवे शब्द प्रचारांत आले आहेत. या शब्दांचें वारेंही अद्याप स्त्रियांस जाऊन पोहोंचलें नाहीं. सभा, संभाषणें, अध्यक्ष, उपाध्यक्ष वगैरे अनेक गोष्टी ऐकून स्त्रिया केवळ चकित होतात, त्यांस त्यांपासून अर्थबोध फार थोडा होतो. प्रपंचाची कहाणी ऐकून घेण्यापलीकडे स्त्रियांशीं दुसरें काय बोलावें हें मोठ्या हौशी पुरुषांसही कळत नाहीं. ज्या गोष्टींनीं पुरुषाचें डोकें भणभणलेलें असतें, त्यांविषयीं स्त्रियांच्या मनांत पूर्ण अंधार किंवा उदासीनता असते. अशा स्थितींत स्त्रियांविषयीं बहुमान कसा रहावा ? शाळेंत पढून येऊन आपल्या सोबत्यांशीं मोठ्या आवेशानें लहान मुलें जो वादविवाद करितात, त्यांत देखील स्त्रियांस गम्य असत नाहीं. आईनें मुलास काय वाद चालला आहे ह्मणून विचारल्यास तोही उत्तर देतो कीं, " आई तुला यांत काय समजायाचें आहे, तूं आपलें काम कर जा ! " आईच्या ज्ञानाबद्दल मुलांमध्येंही इतका तिरस्कार उत्पन्न होतो !

स्त्रीपुरुषांच्या ज्ञानांतील मोठ्या अंतरामुळें उभयतांच्या जगाविषयींच्या कल्पना किती भिन्न झाल्या

आहेत? पुरुषास पृथ्वी विशाल गोलाप्रमाणें भासूं लागली आहे. तिच्या विस्तीर्ण पृष्ठावर हिंदुस्थानासारखे अनेक देश दिसूं लागले आहेत; प्रत्येक देशाचा धर्म निराळा, राज्यपद्धति निराळी, रीतिभाती निराळ्या, या सर्व गोष्टी त्यांस कळूं लागल्या आहेत; व आपल्या देशाहून शेकडोंपट श्रीमंत, सुधारलेले व बलाढ्य असे देश अनेक आहेत, हें तत्त्व समजून आलें आहे. त्या सुसंपन्न देशांतील लोकांची आपण कशी बराबरी करावी, त्यांच्याप्रमाणें आपल्या देशास कशी भरभराटी आणावी, इत्यादि विवंचना सुज्ञ पुरुषांच्या मनास नित्य उद्विग्न करीत आहेत. परंतु स्त्रियांच्या मनाची स्थिति याहून फार निराळी. आपला देश व विलायत हे दोन जगाचे भाग आहेत व ते एकमेकांपासून किती दूर आहेत कोण जाणे! हिंदु, मुसलमान व ख्रिस्ती असे तीन प्रकारचे लोक जगांत असावे, परंतु पोषाखाच्या भेदाखेरीज त्यांमध्यें कोणते दुसरे भेद आहेत कोणास माहीत! या देशावर इंग्रज राजा राज्य करितो, त्याची राज्यपद्धति व कारस्थानें काय असतील तीं असोत! सर्व विवंचना संसाराची. पुरुषांनीं पैसे मिळवावे, डागिने करावे, कुटुंबपोषण करावें, धर्मादाय करावा, यापलीकडे दुसरी कोणतीही विवंचना स्त्रियांस माहीत नाहीं. या प्रकारें जगाच्या विस्ताराविषयीं व त्यांतील घडामोडींविषयीं ज्यांची कल्पना त्यांविषयीं बहुमान कोणास वाटणार?

स्त्रियांच्या या अशा अज्ञान स्थितीमुळें पुरुषाच्या सुखाची किती हानि होते व कुटुंबाचें केवढें नुकसान होतें याचा विचार करा. घरीं आल्यावर कोणी स्नेही संभाषण

करण्यास असल्यास बरें, नाहींतर मुलांस खेळवावें किंवा एखादें पुस्तक किंवा वर्तमानपत्र घेऊन वाचीत बसावें. पुष्कळांस आफिसचेंच काम जिवापाड असल्यामुळें या स्थितीचें दुःख बहुधा समजूनच येत नसावें, नाहींतर त्यांमध्यें स्त्रीशिक्षणाविषयीं इतकें औदासीन्य बहुधा न राहतें. ज्या गोष्टीमध्यें पुरुषास आपलें औदार्य दाखवावेंसें वाटतें, त्या कामांत स्त्रिया बहुधा आपली क्षुद्रबुद्धि प्रकट करितील; उलट ज्या गोष्टींत स्त्रियांस आपली बडीजाव करून घ्यावीसें वाटतें त्या गोष्टीविषयीं पुरुष आपली तिरस्कारबुद्धि प्रकट करितील. उभयतांही आपआपल्या तऱ्हेनें आपलें समाधान करून घेतातच, खर्च दुप्पट व्हावयाचा तो होतोच, परंतु परस्परांस दुसऱ्याचें कृत्य न आवडल्यामुळें कलहाचें व असमाधानाचें बीज मात्र कुटुंबांत उत्पन्न होतें. आणि जे एकास सल्लामसलत देणारे ते दुसऱ्यास शत्रूप्रमाणें भासूं लागतात.

पुरुषांस दुर्व्यसनाची जणूंकाय मुभा आहे, असा आमच्या स्त्रीजनाचा समज असावा असें कोणास भासेल. त्यांचा या बाबतींत पुरुषांवर मुळींच अधिकार चालत नाहीं. स्त्रीपुरुषांच्या मनाच्या विषम स्थितीमुळें व पुरुषांस एकत्र होऊन आपआपली करमणूक करून घ्यावी लागल्यामुळें हीं दुर्व्यसनें त्यांस जडतात.

कुटुंबास उदयास आणण्याचें काम एकट्या पुरुषावर पडतें. तो पराक्रमी असेल तर त्याच्या प्रयत्नांनीं कुटुंबाचा नांवलौकिक होतो. परंतु जर त्यास पगार अधिक मिळूं लागला तर मात्र त्याच्या महत्वाचें स्त्रीस अनुमान होतें. जर त्यानें केवळ सभेंत मोठी शाबासकी मिळ-

विली असेल, कांहीं नवी क्लृप्ति काढिली असेल किंवा मोठें लोककल्याणाचें काम केलें असेल तर त्याविषयीं बायकोस पत्ताही नसायाचा ! या कारणानें अशा पुरुषास घरीं समाधान नसतें. त्याच्या कुटुंबाचा मोठेपणा फार दिवस टिकत नाहीं. त्याच्या मागें त्याच्या इच्छेप्रमाणें व्यवस्था रहात नाहीं, त्याच्या मनाप्रमाणें त्याच्या मुलांचें शिक्षण होत नाहीं, स्त्रीबुद्धीप्रमाणें द्रव्याचा व्यय होऊं लागतो, व कुटुंब पुनः पूर्वस्थितीस परत येतें. अशीं उदाहरणें जागोजाग अनेक सांपडतील.

आपला संसार आपण स्वतंत्रपणें चालवावा यापरती दुसरी कोणती महत्वाकांक्षा स्त्रियांच्या अंतःकरणांत उभी राहणार ? स्त्रियांस या एका बाबतींत सुखसमाधान न दिल्यास पुरुष त्यांची दुसरी कोणती मनकामना पुरविणार ? या कारणानें वारंवार अकालीं कुटुंबांत वैमनस्यें उत्पन्न होतात व अखेरीस त्यांस विभक्त व्हावें लागतें. मुलांचें घरचें शिक्षणही स्त्रियांच्या अज्ञानामुळें व त्यांविषयीं बहुमान नसल्यामुळें व्हावें तसें होत नाहीं. पुरुषांस न फावल्यामुळें व बायकांस ती न आवरल्यामुळें मुलें अल्पवयांत स्वतंत्र व स्वच्छंदी होतात. केव्हां केव्हां त्यांचे छंद कुटुंबास घातक होतात. कित्येक उनाड व दुर्व्यसनी निघतात, व त्यांची वृत्ति चंचल झाल्यावर, त्यांचें दुर्व्यसन त्यांच्या अंगीं पुरतें मुरल्यावर वडील सावध होतात व मोठ्या पस्ताव्यांत पडतात. परंतु काय उपयोग ? मुलें अनावर झालींसें पाहून, त्यांवर वडलांचा क्रोध झालेला पाहून, मोहानें आईसच त्यांचा कैवार घेण्याची आणि

त्यांस गुप्तपणें मदत करण्याची बुद्धि होते, व त्यामुळें एकदा बिघडलेलीं मुलें पुढें पुनः ताळ्यावर येण्याचा मार्गच खुंटतो. स्त्रियांच्या कर्तव्यांविषयीं बोलत असतां त्यांचे गुण संततींत उतरतात हें सांगितलेंच; परंतु संततीस जसे स्त्रियांचे गुण प्राप्त होतात तसे त्यांचे दोषही प्राप्त झाले पाहिजेत, व ही गोष्ट कोण इष्ट ह्मणेल? याकरितां अज्ञानामुळें व अशिक्षणामुळें जे दोष स्त्रियांमध्यें उत्पन्न होतात, ते तरी दूर करणें अवश्य आहे.

याप्रमाणें स्त्रियांच्या अज्ञानानें व अशिक्षणानें जे कित्येक दुष्परिणाम होतात ते एथवर सांगितले. कोणीही प्रापंचिक मनुष्यानें आपल्या कुटुंबोन्नतीच्या प्रयत्नांस स्त्रियांच्या अज्ञानामुळें कितीं विघ्नें येतात, आपल्यामागें किती निरर्थक खर्च लागतात, व स्त्रियांच्या कोत्या समजुतीमुळें आपले थोर उद्देश किती वेळां सोडून द्यावे लागतात, याविषयीं विचार केल्यास आणखी अनेक दुष्परिणाम त्याच्या ध्यानांत येतील. परंतु या सर्व दुष्परिणामांचा विचार जरी कांहीं वेळ एकीकडे ठेविला तरी देखील असें दिसतें कीं स्त्रियांचें अज्ञान कायम ठेवण्यांत आपण आपलें कर्तव्य करीत नाहीं.

ईश्वरानें मनुष्यास जी बुद्धि दिली आहे ती कशाकरितां? एवढ्याचकरितां कीं मनुष्यानें ज्ञान संपादन करून आपल्या ऐहिक व पारमार्थिक सुखाचा मार्ग साधावा. ईश्वरानें मनुष्यास ज्या थोर मनोवृत्ति दिल्या आहेत त्या कशाकरितां? एवढ्याच करितां कीं त्यानें त्या मनोवृत्तींस अनुसरून थोरपणाचीं कार्यें करण्यास प्रवृत्त व्हावें व आपल्या इहलोकवासाचें सार्थक्य करावें. जर मनुष्यानें आपल्या बुद्धीच्या व थोर मनोवृत्तींच्या साहाय्यानें

आपला स्वभाव पूर्णत्वास न आणिला तर या ईश्वरी देणग्यांचा काय उपयोग? आतां सांगितलेल्या प्रकारांनीं या देणग्यांचा उपयोग करावा हें तत्त्व पुरुषांस तरी मान्य झालें आहे व त्यांचा स्वतःचा या कामीं साधेल तितका यत्न आहे. लोकसेवेचीं, देशसेवेचीं, धर्मरक्षणाचीं व बुद्धिसामर्थ्याचीं कृत्यें कोणी पुरुष करूं लागल्यास त्यास जें आपण उत्तेजन देतों, त्याची जी वाहवा करितों व त्यास मदत करण्यास जेव्हां आपण तयार होतों, तेव्हां आपणांस हें तत्व मान्य आहे असें आपण दाखवितों. स्त्रियांसही अशा प्रकारचीं कृत्यें करण्यास कां आपण सहायभूत होऊं नये? वर सांगितलेल्या ईश्वरी देणग्यांचा त्यांस कमी वांटा मिळाला आहे असें नाहीं. मागें दाखविलेंच कीं त्यांचा वांटा पुरुषांच्या बरोबरीचा, किंबहुना अधिकच मोठा आहे. आपले गुण विशेष शोभावे ह्मणून पुरुषांनीं स्त्रियांच्या गुणांस विकास होण्यास संधीच देऊं नये हें केवळ पातक होय. मला वाटतें स्त्रीशिक्षणाचे विरोधक हें सर्व ह्मणणें मान्य करितील. परंतु त्यांस जी मनांत भीति वाटत असते ती ही कीं स्त्रीशिक्षणानें कुटुंबास व राष्ट्रास जो फायदा होणार त्यापेक्षां तोटाच अधिक होईल; त्यांस मत्सरही वाटत असतो, तो अशाकरितां कीं न जाणों पुरुषाचें कुटुंबांतील वर्चस्व जाऊन त्यास स्त्रियांच्या आधीन रहावें लागेल. ही भीति व हा मत्सर जर निष्कारण आहे असें सर्वांच्या ध्यानांत आलें, तर स्त्रीशिक्षणाविषयीं कोणी उदासीन राहील असें मला वाटत नाहीं. तेव्हां या गोष्टीचा विचार करणें जरूर आहे.

स्त्रिया पुरुषांवर इतक्या अनेक प्रकारांनीं अवलंबून आहेत कीं पुरुषांवर त्यांनीं आपलें वर्चस्व स्थापावें ही गोष्ट असंभाव्य आहे. आतां कांहीं स्त्रिया कांहीं पुरुषांपेक्षां अधिक शहाण्या होतील हें खरें. परंतु अशा स्त्रीपुरुषांचे विवाह कचितच होतील. व ते हल्लींही होत आहेत, परंतु त्यांचा परिणाम वाईट होतो असें हल्लीं दिसून येत नाहीं. नवरा मूर्ख व दुर्व्यसनी असतो, तेव्हां केवळ कुटुंबाची अब्रू राखण्याकरितां जिवापाड श्रम करून, आपले हवे ते हाल करून घेणाऱ्या शहाण्या सद्गुणी स्त्रिया हल्लीं शेंकडों दाखवितां येतील, व त्या तशा पुढेंही निपजतील. वास्तविक पहातां स्त्री विशेष शहाणी असल्यानें जे दुष्परिणाम व्हावयाचे त्यांपेक्षां ती कमी शहाणी असल्यानेंच अधिक व अपरिहार्य दुष्परिणाम घडतात.

दुसरें असें कीं हल्लींचा काळ श्रमाचा आहे, केवळ मानसिक श्रमाचा नव्हे, तर शारीरिक श्रमाचा आहे. पुरुष जीं हजार प्रकारचीं कामें करीत आहेत त्यांत शारीरिक कष्टाचा भाग किती आहे याचा विचार करा. अशा श्रमास पुरुषच योग्य आहेत, व त्यांची जागा स्त्रिया घेतील असें मानण्यास बिलकुल जागा नाहीं. तसें होण्यास स्त्रियांपेक्षां पुरुष अधिक आळशी, अधिक अशक्त व अधिक भेकड झाले पाहिजेत. परंतु ते असे होण्याचा यत्किंचितही संभव आहे काय? मुळींच नाहीं. तेव्हां स्त्रियांस शिक्षण दिलें तथापि पुरुषाच्या अनुरोधानें राहून व हल्लीं ज्या प्रकारचें वर्चस्व त्या पुरुषांवर चालवीत आहेत त्या प्रकारचेंच वर्चस्व कायम ठेवून कुटुंबाची वरच्या वरी काळजी घेणें, हेंच स्त्रियांचें केव्हांही झालें

तरी मुख्य कर्तव्य राहणार. जेव्हां स्त्रियांस विद्यादान देण्याचा विचार निघतो, तेव्हां अविचारी पुरुषांच्या मनांत एक मूर्खपणाची कल्पना येते. ती अशी कीं स्त्रियांनीं पुढें जाणें ह्मणजे पुरुषांनीं मागें राहणें होय. वास्तविक पहातां स्त्रिया मागें आहेत त्या पुढें येतील, फार झालें तर त्या बरोबरीला येतील; परंतु ज्या अर्थी त्या पुरुषाच्या पुढें जाण्याच्या आड येत नाहींत, त्या अर्थी आधींच पुढें असलेल्या पुरुषास त्या कशा मागें टाकतील? शिवाय पुरुषाचें शिक्षण कुटुंबभरणाच्या कामीं नेहमीं अधिक महत्वाचें राहणार, त्यामुळें स्त्रियांच्या शिक्षणापेक्षां पुरुषांच्या शिक्षणाकडे सर्व कुटुंबाचें अधिक लक्ष राहिलेंच पाहिजे. आणखी असें पहा कीं स्त्रियांच्या ज्ञानांत व विचारांत जेवढी सुधारणा होईल, तेवढीच त्यांच्या संततींतही होणार. कोणी आई आपल्या मुलांस आपले दोष देईल व मुलींस गुण देईल असें होईल काय? उभयतांसही तिच्या गुणांचा सारखाच वांटा मिळेल; व पुरुषास जें नेहमीं अधिक स्वातंत्र्य राहील त्यामुळें तो आपल्या बहिणीच्या सदोदित पुढें जाईल. या सर्व गोष्टींवरून असें दिसून येईल कीं स्त्रियांचें पुरुषांवर अनिष्ट वर्चस्व होण्याची भीति व्यर्थ आहे. स्त्रियांच्या उत्कर्षानें स्त्रीपुरुषांचा उभयतांचाही सारखाच उत्कर्ष झाला पाहिजे.

आतां कोणास वाटतें कीं स्त्रिया अधिक ज्ञानी झाल्या ह्मणजे त्या कुमार्गास लागतील, जणूंकाय अज्ञान व अविचार हीं सन्मार्गाचीं साधनें होत! छेः छेः! स्त्रिया व पुरुष यांच्या ज्ञानांत जेवढें कमी अंतर असेल, तेवढें तें कुटुंबांत सदाचार वाढविण्यास कारण होईल. हल्लीं अनेक

पुरुष दुर्व्यसनी व धर्महीन होण्याचें मुख्य कारण स्त्रियांचें अज्ञान आहे. स्त्रियांविषयीं पुरुषास बहुमान वाटावा, त्यांचें आपणांविषयीं चांगलें मत असावें अशाविषयीं त्यानें जपावें, व आपले कांहींही दोष असोत स्त्रिया आपणावरच निरंतर अवलंबून राहतील अशी त्याची समजूत राहू नये, इतकी योगता स्त्रियांत आल्यावर पुरुषाच्या दुर्व्यसनांस मोटा प्रबळ प्रतिबंध उत्पन्न झाला असें समजावें; व जो पुरुष अशा प्रतिबंधानें राहील त्याचा स्त्रीच्या सदाचारावर केवढा कटाक्ष राहील ? पुरुषापेक्षां स्त्रियांत दुर्व्यसनें पुष्कळ कमी, असें हल्लीं सर्वत्र दिसतें; व जर पुरुषास आपली दुर्व्यसनांपासून सुटका करून घेणें असेल तर स्त्रियांची योग्यता वाढविणें हा त्यानें पहिला उपाय योजिला पाहिजे. आपले हात चोरी करितील ह्मणून कोणी मनुष्य ते रात्रीचे बांधून निजत नाहीं. आपला घोडा पळून जाईल ह्मणून कोणी शूर शिपाई त्याचे पाय बांधून रणांगणांत उभा रहात नाहीं. तसेंच आपल्या स्त्रिया कुमार्गगामी होतील या भीतीनें, ज्या ज्ञानानें आपण थोर झालों तें ज्ञान स्त्रियांस देण्यास कोणी सुज्ञ पुरुष भिणार नाहीं. चोरी करण्याची दुर्बुद्धि हातांत नसते, ती करणाराच्या डोक्यांत असते; घोडा पळून जाण्यापूर्वीं बसणाराचें अवसान नाहींसें व्हावें लागतें; व स्त्रिया पतित होण्यापूर्वीं पुरुष पतित झाला असला पाहिजे. आपण मराठे लोक गेल्या शतकांतच इतकें शूर होतों कीं कोणाही घरच्या किंवा बाहेरच्या शत्रूची आपणांस भीति नव्हती; इंग्रजी राज्याच्या एवढ्याशा अल्पकाळांतच आपण इतके हतवीर्य झालों काय कीं स्त्रियांस संभाळून धरण्यास त्यांस अज्ञानां-

तच ठेविलें पाहिजे! व या गोष्टीचा दुराग्रह विशेषतः त्या लोकांत दिसावा कीं जे पिढीनें पेशवाईच्या काळास अधिक जवळ! ज्यांच्या हृदयांत पेशवाईंतील आख्यायिका आह्मां-पेक्षां अधिक आवेशानें उसळून येत आहेत.

ज्या देशांत स्त्रीशिक्षणाचा पुष्कळ प्रसार झाला आहे तेथील स्त्रियांनीं कुटुंबस्थिति विस्खळित करण्याच्या कामीं किंवा स्वैर व कुमार्गी होण्याच्या कामीं आपल्या ज्ञानाचा व शिक्षणाचा उपयोग केलेला दिसत नाहीं. त्यांनीं आपलें ज्ञान पुरुषांस सुखी करण्याच्या कामीं, आपलीं मुलें सन्मार्गास लावण्याच्या कामीं व आपलीं कुटुंबें उत्तम आणि आनंदी करण्याच्या कामीं केला आहे. घरांत सुंदर व्यवस्था ठेवणें, कलाकौशल्याच्या वस्तूंनीं तें सुशोभित करणें, आपण काढलेल्या चित्रांनीं तें अलंकृत करणें, या कामीं त्यांनीं आपल्या शिक्षणाचा उपयोग केला आहे. मुलांस लहानपणापासून सुशिक्षित करण्याचें काम त्यांनीं पतकरलें आहे. पुरुषास उद्योगाच्या कामीं मदत करणें, निदान त्यास उत्तेजन देणें, त्याच्या महत्वाकांक्षेमध्यें सर्वस्वीं त्याशीं एकजीव होणें, वाद्यगानादि कलाचातुर्यानें त्याची उल्हासवृत्ति कायम ठेवणें, त्याच्या कोणत्याही धाडसाच्या कामांत आड न येणें, त्याच्यामागें कुटुंबाची उन्नति राखणें, त्याच्या आशा परिपूर्ण करणें, व जरूर पडल्यास स्वकष्टानें मुलांलेकरांचें पालनपोषण करणें—या सर्व गोष्टींची जबाबदारी त्यांनीं आपल्याकडे घेतली आहे. या सर्व गुणांमुळेंच पुरुष त्यांचें वर्चस्व आनंदानें अंगीकारतात; केवळ रुढीच्या प्राबल्यानें या गोष्टी घडत असतील असें मानणें असमंजसपणाचें होय.

त्या देशांतील सामान्य स्त्रियांची ही गोष्ट झाली. ज्या असामान्य पराक्रमी स्त्रिया तिकडे निपजल्या त्यांनीं तर अजरामर कीर्ति संपादिली आहे; व त्या कीर्तिचें बीज पाहिलें तर त्यांची शुद्ध सदाचारप्रीति हें दिसतें. कारण स्त्रिया कोणत्याही स्थितींत असोत, अंतःकरणाची कोमलता व धार्मिकता हे गुण विशेषतः त्यांचे होत. धर्माच्या अतिमनोहर तत्वांचा विकास स्त्रियांच्या अंतःकरणांत जसा होतो तसा पुरुषांच्या बहुधा होणें नाहीं. मानवी जातीचें दुःख पाहून स्त्रियांस जें अनुपम दुःख होईल तें तितकें पुरुषास व्हावयाचें नाहीं. युरोपांतील व अमेरिकेंतील पराक्रमी स्त्रीरत्नांची गणना करूं ह्मटल्यास तें कठीण, परंतु येथें एक दोहोंचा मात्र उल्लेख करितों.

मिसेस हारिएट बीचर स्टो नांवाची स्त्री सन १८१२ या वर्षी अमेरिकेंत जन्मली व ती मरण पावून कायतीं आठ वर्षें झालीं. ती एका गरीब उपदेशकाची मुलगी होती व पुढें एका गरीब भाषागुरूची पत्नी झाली. कुटुंबपोषणाकरितां कांहीं पैसा मिळवावा ह्मणून ती प्रथम वर्तमानपत्रांत गोष्टी लिहीत असे. सन १८५० च्या सुमारास एके दिवशीं देवालयांत ईश्वरोपासनेस गेली असतां एक कादंबरी लिहिण्याचा तिचा बेत ठरला. या वेळीं काळ्या सिद्दी गुलामांस स्वातंत्र्य देण्याची सर्व अमेरिका खंडभर मोठ्या आवेशानें वाटाघाट सुरू होती. दास्यस्थितींतील दुःखांचें वर्णन—हा मिसेस स्टो बाईच्या कादंबरीचा विषय होता. सन १८५२ त ही कादंबरी, "**अंकल् टाम्स् काबिन्**" या नांवानें प्रसिद्ध झाली. या कादंबरीच्या तोडीचें इंग्रजी भाषेंत दुसरें पुस्तक नाहीं असें

ह्मटल्यास चालेल, व या पुस्तकानें सर्व युरोपांत व अमेरिकेंत जी चळवळ उत्पन्न केली त्या चळवळीचे जे इष्ट परिणाम झाले ते दुसऱ्या कोणत्याही पुस्तकानें झाले असतील कीं नाहीं याची शंकाच आहे. ही कादंबरी लिहित असतां संसाराचीं सर्व कामें स्टोवाईस स्वतः करावीं लागत; मुलें संभाळणें, त्यांस शिकविणें, घरचीं सैंपाकाची व्यवस्था पाहणें, या सर्व चिंता मागें होत्याच; परंतु दास्यस्थितींतील अगणित दुःखें तिच्या अंतःकरणास झोंबत होतीं व दासांची सुटका व्हावी ह्मणून तिची प्रबळ इच्छा होती; त्यामुळें सर्व संकटें विसरून तिनें ही कादंबरी लिहिली. ती ज्या दिवशीं प्रसिद्ध झाली त्या दिवशीं अमेरिकेंत नवा दिवस उगवला असें ह्मटल्यास चालेल. पहिल्या दहा दिवसांत पुस्तकाच्या दहा हजार प्रती खपल्या. आठ छापखाने रात्रंदिवस पुस्तकें छापण्याच्या कामीं सारखे गुंतले होते. एका लंडन शहरांत पुस्तकाच्या छत्तीस निरनिराळ्या आवृत्ति छापून प्रसिद्ध झाल्या, व सहा महिन्यांच्या आंत तीन लक्ष प्रतींहून अधिकच प्रती खपल्या. एका वर्षाच्या आंत प्रतींचा खप १० लक्षांच्या वर गेला. फ्रेंच, जर्मन, इटालियन, रशियन वगैरे युरोपांतील सर्व भाषांत त्याचीं भाषांतरें झालीं. या कादंबरीस नाटकाचें स्वरूप देऊन युरोपांतील सर्व मुख्य मुख्य शहरीं त्याचे प्रयोग झाले, व अनेक प्रसिद्ध कादंबरीकारांनीं स्वतः होऊन या कादंबरीच्या अप्रतिमपणाबद्दल आपले अभिप्राय प्रसिद्ध केले. या कादंबरीच्या प्रसिद्धीमुळें स्टोबाईस जो मान मिळाला तोही असाच असाधारण होता. इंग्लंडांतील सहा लक्ष स्त्रियांनीं तिची प्रशंसा

करून अमेरिकेंतील स्त्रियांस एक मोठं पत्र पाठविलें व त्यांत दास्यविमोचनाच्या कामीं त्यांशीं आपलें पूर्णपणें एकमत आहे असें दाखविलें. ही बाई दुसरे वर्षी पति- समवेत इंग्लंडास गेली, तेव्हां प्रत्येक शहरीं स्वतः राणीस मान मिळावा तसा तिला मान मिळाला. तिजविषयीं आपली पूज्यबुद्धि उत्तम प्रकारें कशी प्रगट करावी असें गरिबांस व श्रीमंतास झालें. केवळ गरीबगुरीबांनीं कृतज्ञ- बुद्धीनें एक एक पेनी वर्गणी देऊन तीस नजराणा करण्या- करितां जो फंड उभा केला त्यापासून हजार पौंडांहून अधिक उत्पन्न झालें. याप्रमाणें या बाईस हा इतका मान मिळाला, सर्व जगांत तिची इतकी कीर्ति झाली व पैशाचीही दधात उरली नाहीं, तथापि तिनें आपलें कुटुंब सोडलें नाहीं किंवा आपला विनय कमी होऊं दिला नाहीं. तिनें जे एकंदर ग्रंथ लिहिले आहेत त्यांनीं एक सबंध कपाट भरेल, यावरून तिच्या उद्योगांतही कधीं खळ पडला नाहीं.

एका निवळ कादंबरीच्या लिहिण्यानें सबंध दोन खं- डांत इतकी चळवळ उडून जावी असें या कादंबरींत काय होतें असा सहजच प्रश्न सुचेल. या प्रश्नाचें उत्तर असें कीं, जरी पुस्तक कादंबरीच्या रूपानें लिहून अत्यंत मनो- रंजक केलेलें आहे, तरी त्यांत दासांची जी खरी स्थिति होती ती हुबेहुब वर्णन केली आहे. दासांचीं भयंकर दुःखें इतक्या हृदयद्रावकतेनें वर्णन केलेलीं आहेत कीं तीं वाचणारांच्या डोळ्यांतून टिपें पाडल्यावांचून राहत नाहींत. इंग्लंडांतील व अमेरिकेतील आडदांड शेतकऱ्यांच्याही डोळ्यांतून याप्रमाणें अश्रुधारा चालल्या, त्यांचीही अं-

तःकरणें द्रवलीं, असा या कादंबरीचा गुण झाला. दासांचा जेथें असा पशुतुल्य छळ होतो तेथें धर्माचें मातेरें होतें, व ज्या धर्माचे लोक असा छळ करितात त्यांच्या त्या धर्मास " धर्म " हें नांवही शोभत नाहीं, अशी वाचकांची खात्री करून देऊन ख्रिस्तीधर्माच्या लोकांस बाईनें फार लाजविलें आहे. धर्म आणि सौजन्य यांची ताटातूट होत नाहीं, व मनुष्यांस सौजन्य आणि प्रीति हीं शिकविण्याकरितांच केवळ ख्रिस्तीधर्म निर्माण झाला आहे असें तिनें सर्वत्र दाखविलें आहे. स्त्रियांच्या कोंवळ्या मायाळू अंतःकरणांमुळें त्यांस ह्या धर्मतत्वाची साहजिकच प्रेरणा होते, त्यांच्याकडून त्याचें विशेषतः पालन होतें, व त्या तत्वाच्या प्रसारार्थ त्यांनीं कसें वर्तन करावें, पुरुषांच्या अंतःकरणांवर तें कसें बिंबवावें, या गोष्टी तिनें स्थलीं स्थलीं दाखविल्या आहेत. ख्रिस्तीधर्माचें अत्यंत मोहक स्वरूप ज्यास पहावयाचें असेल त्यानें ही कादंबरी वाचावी. अनेक वेळां बायबल वाचून व उपदेशकांचीं अनेक व्याख्यानें ऐकून ज्या नीतितत्वांचीं खरीं मर्में आपल्या लक्षांत येत नाहींत, त्या तत्वांची मातबरी व त्यांचे गुण ही कादंबरी वाचल्यानें तेव्हांच ध्यानांत येतात. दोन अफाट खंडांवर शेकडों वर्षें आपला अंमल अस्खलित चालवावा असा कोणता गुण ख्रिस्तीधर्मांत आहे, हें माझ्या तरी ही कादंबरी वाचल्यावर प्रथम लक्षांत आलें. मनुष्याच्या अंतःकरणावर कोणत्याही धर्माचें चिरकाल प्राबल्य राहण्यास या प्रकारचीं नीतितत्वेंच कारण होतात. अशा या कादंबरीमुळें युरोपांत व अमेरिकेंत जिकडे तिकडे दासांस विद्या व स्वातंत्र्य देण्याविषयीं खट-

पट सुरू झाली यांत आश्चर्य तें काय? सन १८६१ पासून १८६३ पर्यंत दासांच्या विमुक्ततेसाठीं अमेरिकेंतील लोकांमध्यें अपसांत जें तुंबळ युद्ध सुरू झालें, त्यांत दासांच्या तर्फे लढणारांस प्रोत्साहन करण्यांस या कादंबरींतील नीतितत्वेंच कारण झालीं असावीं; व त्याच नीतितत्वांच्या दृढ परिशीलनानें अमेरिकेंतील स्त्रियांनीं आपले हजारों पुत्र या सत्कार्यांत बळी पडले असतां, मनांत दुःख न मानितां आपलें समाधान करून घेतलें असावें. त्यांचीं थोर अंतःकरणें परदुःखानें कशीं तेव्हांच द्रवतात व अनाथांस साहाय्य करण्याकरितां त्यांचे उदार हस्त कसे तयार असतात, याविषयीं उदाहरणें पाहण्यास लांब जावयास नको.

याप्रमाणें मिसेस स्टोबाईचें चरित्र व तिचे जगावर उपकार आहेत. फ्लारेन्स नाइटिंगेल, वगैरे कित्येक स्त्रिया एका दृष्टीनें तिजहूनही अधिक पराक्रमी गणिल्या असतां चालेल. त्यांनीं मानवी जातीच्या दुःखनिवारणार्थच अवतार घेतला आहे कीं काय असें वाटतें तसेंच सृष्टिदर्शनाच्या लालसेनें साहसमय प्रवास अंगीकारून ज्यांनीं लौकिक जोडिला अशा स्त्रियाही पुष्कळ आहेत. व गणित, ज्योतिष, सृष्टिशास्त्र, इत्यादि गहन विषयांत पारंगत होऊन व अमोलिक पुस्तकें लिहून महान् पंडितांत ज्यांनीं आपली गणना करून घेतली अशा मिसेस सामर्व्हिल, वगैरे कित्येक स्त्रिया आहेत. मिसेस सामर्व्हिलबाईचें चरित्रही वाचण्यासारखें आहे. प्रपंचस्थिति आणि ज्ञानमार्ग यांत विरोध नाहीं असें तिच्याही चरित्रावरून दिसून येतें.

सामान्य स्त्रियांवर व विशेष पराक्रमी स्त्रियांवर विद्यादानाचे जे परिणाम सुधारलेल्या राष्ट्रांत झाले आहेत ते कोणत्याही प्रकारें दूषण ठेवण्यासारखे नाहींत, उलट अत्यंत अभिलाषणीय आहेत, असें या गोष्टींवरून दिसून येईल. बुद्धीनें पराक्रमानें व गुणांनीं आपल्या स्त्रिया युरोपांतील व अमेरिकेंतील स्त्रियांहून कमी योग्यतेच्या आहेत असें मानण्यास फारशी जागा नाहीं असें पूर्वीं दाखविलेंच. स्त्रियांच्या पराक्रमाचीं जीं थोडीं उदाहरणें या देशांत आतांपर्यंत घडलीं आहेत तीं सर्वस्वी उमेद वाळगण्याजोगीं आहेत. कांहीं थोड्या वर्षांपूर्वीं **आनंदीबाई जोशी** यांस अकालीं मृत्यूनें गाठिलें. या स्त्रीनें अमेरिकेंत राहून वैद्यकीची वरिष्ठ प्रतीची परिक्षा दिली. अमेरिकेंतील ज्या ज्या स्त्रियांशीं तिचा संबंध आला, त्या सर्वांस तिनें स्नेहपाशांनीं वश करून घेतलें. इतकें करूनच ती राहिली नाहीं, तर आपणांविषयीं व आपल्या धार्मिकतेविषयीं तिनें त्यांचा बहुमानही संपादिला. जर ही पराक्रमी स्त्री हिंदुस्थानांत आल्यावर कांहीं थोडीं वर्षे तरी जगली असती, तर तिनें आपल्या उपदेशानें व उदाहरणानें एतद्देशीय स्त्रियांस किती नव्या गोष्टींची समजूत पाडून दिली असती ! परंतु या स्त्रीरत्नाचा प्रकाश या देशावर पुरता झळकला नाहीं तोंच त्याचा दुर्दैवानें अपहार केला, ही दुःखाची गोष्ट होय ! आनंदीबाईनें वैद्यक विषयाचा अभ्यास करीत असतां व अमेरिकेंत प्रवास करीत असतां, ज्या उपयुक्त व मनोरंजक वस्तूंचा संग्रह केला व ज्या मित्रमंडळीचे फोटोग्राफ जमविले, ते पाहिले असतां शोधकपणा, सुंदर व्यवस्था, श्रेष्ठ जिज्ञासा व सत्संगति, या अ-

मौलिक गुणांनीं तिचें मन सुसंस्कृत झालें होतें असें ह्मणावें लागतें. तिच्या सत्कार्यांनीं अनेक स्त्रिया विपत्तींतून मुक्त झाल्या असत्या ही गोष्ट सांगायास नकोच.

सांप्रतकाळीं या राष्ट्रांतील स्त्रियांच्या व पुरुषांच्या, उभयतांच्याही स्थितींत अनेक न्यूनता व अनेक दुःखें आहेत हें सामान्यतः कोणीही कबूल करील. परंतु विशेष चमत्कार हा कीं, पुरुषांस स्त्रियांच्या न्यूनता व दुःखें दिसत नाहींत; स्त्रियांस पुरुषांच्या न्यूनता व दुःखें दिसत नाहींत; उभयतांमध्यें बाह्यात्कारी समाधानवृत्ति दिसते, परंतु कुटुंबें ऊर्जित दशेस येत नाहींत, दर पिढीस आपण थोडे खालीं गेलोंसेंच वाटतें, व राष्ट्रासही संपन्न दशा आल्याचें कांहीं चिन्ह दिसत नाहीं. ही स्थिति कशी दूर होणार ? आपलीं कित्येक दुःखें इतकीं असह्य आहेत कीं त्यांची दास्याच्या परम दुःखांशीं तुलना करितां येईल, व तीं पुष्कळ अंशीं आत्मदोषांचींच फलें समजलीं पाहिजेत. या आपल्या दोषांचें पूरें माप आपल्या पदरीं घालण्यास मिसेस स्टो सारख्या स्त्रिया आपणांमध्यें निपजल्या पाहिजेत. त्यांच्या हृदयंगम वक्तृत्वानें व यथार्थ दोषाविष्करणानेंच आपल्या अंतःकरणांत प्रकाश पडल्यास पडेल. आहे त्यांतच समाधान मानावें, संसाराचा होईल तितक्या त्वरेनें त्याग करावा, वगैरे असाध्य धर्मतत्वांचा थाटमाटानें कथाकीर्तनपुराणरूपानें उपदेश करणारे पुष्कळ पोटभरू आहेत. परंतु त्यांचे उपदेश केवळ करमणुकीप्रमाणें आपण गणितों; त्यांच्या परिश्रमानें धर्मास येत असलेली ग्लानि अल्पांशानेंही कमी होत नाहीं किंवा धर्माच्या खऱ्या प्रमेयांचा कोणास यत्किंचितही बोध होत नाहीं, हें आपण

अनुभवानें पक्कें जाणून आहों. धर्मतत्वांचें जें अत्यंत मनोहर स्वरूप व अत्यंत गुणकारी रहस्य त्याची स्फूर्ति स्त्रियांच्याच कोमल अंतःकरणांत व्हावयाची, इतरांच्या होणें कठिण. ह्मणूनच मला असें वाटतें कीं, आपल्या गाढ श्रद्धेनें व उदात्त मनोवृत्तींनीं, आपल्या स्वनिरपेक्ष परिश्रमांनीं व प्रेमळ प्रणयवचनांनीं धर्मतत्वांचें खरें रहस्य उदाहृत करणाऱ्या स्त्रिया जेव्हां आपणांमध्यें अवतार घेतील, तेव्हां मात्र तें रहस्य आपल्या पुरुषांच्या कठीण हृदयावर पक्कें प्रतिबिंबित होईल. या प्रकारच्या पराक्रमी स्त्रियांची कुटुंबाच्या व राष्ट्राच्या उन्नतीस केवढी आवश्यकता आहे हें जर कोणी समजून घेईना तर त्यास काय ह्मणावें ?

असो. याप्रमाणें स्त्रीशिक्षणाच्या आवश्यकतेविषयीं येथवर विचार झाला. आतां त्यासंबंधीं तुमचीं कर्तव्यें सांगतों. जेथें आज गवतदेखील चांगलें वाढत नाहीं तेथें अत्युच्च प्रचंड वृक्ष उत्पन्न होण्यास कालावधि पाहिजे हें उघड आहे. त्याप्रमाणेंच स्त्रीशिक्षणाचे आतां सांगितल्या प्रकारचे अत्युत्कृष्ट परिणाम होण्यास बराच काळ लागेल, व ते घडून येण्यापूर्वीं सामान्य स्त्रियांचें ज्ञान वाढलें पाहिजे. या अल्प व सुसाध्य कार्यास प्रथम सर्वांनीं हात लाविला पाहिजे. सांप्रतकाळीं कुटुंबांची अशी स्थिति आहे कीं जे घरचे कर्ते पुरुष असतात त्यांच्या हातून हें शिक्षणाचें काम होत नाहीं, कारण त्यांस तें आवश्यक दिसत नाहीं, किंवा त्यांस फुरसत नाहीं किंवा फुरसत असल्यास सांप्रतच्या रीतरिवाजामुळें त्यांस योग्य संधी मिळत नाहीं. स्त्रियांच्या शाळेंतील शिक्षणाचा काळ इतका

अल्प असतो कीं शिक्षणाचा चांगला पाया घालण्यासही तो पुरत नाहीं. अशा या स्थितींत स्त्रियांच्या उन्नतीचें कार्य कोणीं अंगिकारावें? भावांवांचून तें अंगिकारण्यास कोणीही योग्य दिसत नाहीं. या आपल्या समाजांत बहीण-भावंडांस आपलें प्रेम उघडपणें प्रकट करण्यास व परस्परांशीं उघडपणें मोठ्या सलगीनें वागण्यास जशी पूर्णपणें मोकळीक आहे, तशी दुसऱ्या कोणासही नाहीं. संकटाच्या व दुःखाच्या प्रसंगीं स्त्रियांस मदत करण्यास बंधूवांचून दुसरे पुष्कळ आप्त तयार होतील, परंतु सामान्य स्थितींत त्यांस मदत करण्याची मोकळीक बंधूवांचून दुसऱ्या कोणासही नाहीं. जेव्हां स्त्रियांचीं मनें दुराग्रहानें दूषित झालेलीं असतात तेव्हां नवऱ्याचा उपदेश त्यांस जुलुमाप्रमाणें वाटतो, इतर आप्तांचा उपदेश कपटबुद्धीनें दिल्याची शंका येते; अशा प्रसंगीं भावाचा उपदेश मात्र प्रेमाचा व हिताचा वाटण्याचा संभव असतो. विवाहापूर्वी व तसेंच विवाहानंतर बहीणभावंडांचें प्रेम व दळणवळण जसें कायम राहतें, तसें मातापितरांखेरीज इतरांचें राहत नाहीं. आजचा हा उपदेश तुमचें बंधुत्वाचें नातें मनांत आणून तुह्मांस केला आहे; तसें नसतें तर हा उपदेश तुह्मांपेक्षां तुमच्या वडिलांस केलेला विशेष शोभला असता. तुह्मां सर्वांस बहिणी असतीलच व त्यांवर प्रेम ठेवून त्यांच्या हिताकरितां झटणें हें आपलें कर्तव्य आहे असें तुह्मांस वाटत आहेच. तेव्हां त्यांच्या हिताच्या अनेक मार्गांपैकीं शिक्षणाचा मार्ग विशेषेंकरून तुह्मी आपलासा करून घ्यावा, असें माझें तुह्मांस सांगणें आहे. बहीणभावंडांच्या एकत्रवासाचे प्रसंग थोडे नाहींत व ह्मणून

तुह्मांस हें आपलें कर्तव्य बजावण्यास पुष्कळ संधी मिळेल. स्त्रिया माहेरीं असतां त्यांस विशेष स्वातंत्र्य असतें. व आपली हवीतशी करमणूक करून घेण्यास त्यांस मोकळीक असते. तेव्हां त्यांचीं मनें विकसित करण्यास हे प्रसंग अत्यंत उचित होत. स्त्रियांच्या संबंधानें आपणां पुरुषांचा मला जो एक मोठा दोष दिसतो तो हा कीं, या शिक्षणाच्या कामीं आपण फारच बेफिकीर रहातों. संभाषण हें शिक्षणाचें किती सुलभ साधन आहे? परंतु कुटुंबांतल्या कुटुंबांत देखील स्त्रीपुरुषांच्या संभाषणाचे जितके कमी प्रसंग येतील तितके बरे, असें आपणांस वाटतें. तुह्मांस माझें असें सांगणें आहे कीं आपल्या बहिणींशीं संभाषणाचे प्रसंग जितके अधिक येतील तितके तुह्मीं आणावे. आपण जें जें महत्वाचें शिकलों असें तुह्मांस वाटेल तें तें तुह्मी आपल्या बहिणींस समजावून द्यावें. परस्पर प्रेमामुळें व भरंवशामुळें हें कर्तव्य उभयतांसही आनंददायक होईल. पृथ्वी तुह्मांस जशी वाटोळी व विस्तीर्ण वाटूं लागली आहे तशी त्यांसही वाटावयास लावा. पृथ्वीवरील अनेक देशांविषयीं तुह्मांस जें महत्वाचें ज्ञान मिळालें असेल तें त्यांसही तुह्मी करून द्या. स्पार्टा, रोम, इंग्लंड, फ्रान्स, इटली वगैरे देशांच्या प्राचीन व अर्वाचीन इतिहासांत सद्गुणी किंवा पराक्रमी स्त्रियांचीं जीं अनेक उदाहरणें सांपडतात त्यांच्या गोष्टी तुह्मी त्यांस सांगा; व या देशाच्या इतिहासांतील प्रसिद्ध स्त्रियांशीं त्यांची तुलना करा. ज्या थोर स्त्रीपुरुषांचीं चरित्रें तुह्मांस अनुकरणीय वाटत असतील त्यांच्या गुणांचें व कृत्यांचें स्त्रियांसही ज्ञान होऊं द्या. स्वदेशासंबंधानें ज्या लोककल्या-

णाच्या गोष्टींविषयीं तुह्मी मनांत महत्वाकांक्षा बाळगाल त्यांविषयीं त्यांमध्यें आदर उत्पन्न करा. सारांश, स्त्रियांस चांगलें लिहितां वाचतां येऊन ज्ञान संपादनाचा स्वतंत्र मार्ग त्यांच्या हस्तगत व्हावा, व त्यांच्या मनाची सांप्रतची अत्यंत अकुंचित स्थिति जाऊन त्यांच्या बुद्धीचा विकास व्हावा, अशाकरितां जो जो तुह्मांस उपाय सुचेल तो तो तुह्मीं केल्यावांचून राहूं नका. अशा रीतीनें आपल्या प्रेमाचा ओघ तुह्मीं अखंडपणें जन्मभर चालवावा. **चारल्स ल्यांब** नामक ग्रंथकर्त्यानें भगिनीप्रेमाच्या पराकाष्ठेचें जें सुंदर उदाहरण घालून दिलें आहे व ज्याबद्दल सर्व जगांत त्याची वाहवा झाली आहे, तें उदाहरण तुह्मी निरंतर डोळ्यापुढें धरावें. या तुमच्या उपकारांचे फळ कांहीं दिवसांनीं सर्व देशभर दिसूं लागेल.

आपल्या बहिणींच्या संबंधाचें हें कर्तव्य केवळ प्रेमपाशामुळेंच नव्हे, तर कुटुंबाच्या अभिमानानें व उन्नतीकरितां तें तुह्मीं करावें असें माझें ह्मणणें आहे. माता ही कुटुंबाची अधिदेवता होय असें पूर्वीं सांगितलेंच. जर आतां सांगितलेल्या उपायांनीं स्त्रियांचीं मनें सुसंस्कृत झालीं तर पुढील पिढीच्या मातांवर व त्यांच्याद्वारें कुटुंबांवर तुमचे केवढे उपकार होतील ! आतां दिपवाळीचा सण जवळच आला आहे. तेव्हां भाऊबिजेच्या दिवशीं आपल्या बहिणीस कांहीं देणगी देण्याचा प्रसंग यावयाचा आहे. त्याप्रसंगीं तुह्मांस आपल्या या कर्तव्याची आठवण झाली पाहिजे, व तुह्मीं त्यांस जी अत्युत्कृष्ट देणगी देऊं कराल ती ही असावी कीं संभाषणाच्या द्वारें, उपदेशाच्या द्वारें व द्रव्याच्या द्वारें आपल्या भगिनींच्या ज्ञानोन्नतीस आ-

जन्म साहाय्य करावयाचें, असा मनाचा पूर्ण निर्धार आपण केल्याचें त्यांस अभिवचन द्या.

आज दसऱ्याचा सण आहे. या दिवसाचें मुख्य कर्तव्य सीमोल्लंघन हें आहे. पूर्वी ज्यावेळीं मराठे लोकांत वीरश्रीचा केवळ अवतार झाला होता व स्वपराक्रमानें दिग्विजय संपादण्याची उत्कट आशा त्यांच्या हृदयांत वागत होती, त्यावेळीं नवे नवे मुलूख काबीज करण्याकरितां ते जेव्हां बाहेर पडत, तेव्हां वर्षाकालाच्या अखेरीस येणारा हा सण स्वराज्याची सीमा ओलांडून पलीकडे जाण्यास सुमुहूर्त गणिला जात असे. केवळ बाहुबलाच्या उत्कर्षाचे ते दिवस आतां गेले, परंतु त्यांबरोबर वीरश्रीचा किंवा पराक्रमाचा काळ गेला असें नाहीं. ती वीरश्री व तो पराक्रम मानसिक विजयाच्या श्रेष्ठतर कर्तव्यांकडे आतां योजिला पाहिजे. स्त्रीपुरुषांच्या पूर्वी सांगितलेल्या मोठ्या दोषांमुळें आपल्या उद्योगास, आपल्या संपत्तीस, आपल्या सर्व प्रकारच्या उन्नतीस, किंबहुना आपल्या मनोराज्यास देखील, अतिदुस्तर सीमांचें सर्व दिशांनीं आवरण पडलें आहे. या आवरणामुळें, आपणांस आपली बुद्धि, सुविचार व कर्तबगारी प्रकट करून दाखविण्यास इतका आकुंचित प्रदेश उरला आहे कीं, त्यांची पूर्ण वाढ होऊं शकत नाहीं व त्यांच्या ऱ्हासास अकालींच आरंभ होतो. तेव्हां या तारुण्याच्या भरतीच्या काळांत तुह्मांमध्यें जी वीरश्री व जी महत्वाकांक्षा वागत असेल तिचा खरा सदुपयोग ह्मटला ह्मणजे स्वतःचे व कुटुंबस्थितीचे सर्व दोष व न्यूनता दूर करणें, व तेणेंकरून उद्योगादि इष्ट हेतूंस आकुंचित करणाऱ्या दुस्तर सीमांचें उल्लंघन

करणें हा होय. या प्रकारच्या सीमोल्लंघनास तुम्हीं प्रवृत्त व्हावें व आजच्या या सुमुहूर्तानें आपला निश्चय तडीस नेण्याच्या उपायचिंतनास लागावें.

या प्रकारच्या सीमोल्लघनापासून जो एक अत्यंत इष्ट परिणाम घडून येईल तो हा कीं या राष्ट्रांतील लोकांविषयीं जगांत बहुमान उत्पन्न होईल, व आपल्या राज्यकर्त्यांपैकीं अनेक उदार पुरुष व स्त्रिया आपणांस राष्ट्रोन्नतीच्या कामीं मदत करण्यास तयार होतील. पूर्वीं एका काळीं हा हिंदुस्थानदेश कोठें आहे, कसा आहे, इत्यादि गोष्टींविषयीं युरोपांत कोणासही चांगली माहिती नव्हती. त्या वेळीं या देशास सुवर्णभूमि हें नांव प्राप्त झालें होतें; व या देशाच्या अपार संपत्तीविषयीं व विलक्षण रितीभातींविषयीं युरोपांतील लोक हव्या त्या असंभाव्य कल्पना करीत असत. त्या पूर्वींच्या काळीं परद्वीपस्थ लोक आपणांविषयीं कोणते कुतर्क करितात, याविषयीं आपण बेफिकीर राहिलों असतों, तर त्यामुळें आपलें मुळींच नुकसान होण्याचा संभव नव्हता. परंतु हल्लीं तशी स्थिति नाहीं. या देशाविषयीं व एथील राहणारांविषयीं सर्व सुधारलेल्या राष्ट्रांस चांगली माहिती झाली आहे, व त्यांतील एका अतिबलाढ्य राष्ट्राचा या देशावर अम्मल सुरू झाला आहे. ज्यांस आपणांविषयीं माहिती आहे व ज्यांशीं आपला नित्य संबंध येतो त्यांचें आपणांविषयीं चांगलें मत असावें याबद्दल आपणांस काळजी घेतली पाहिजे. तसेंच ज्यांच्या हातीं आपलें हित किंवा अहित करण्याचें आहे त्यांस आपली योग्यता व आपले गुण कळावे, त्यांमध्यें कोणत्याही आत्मदोषानें आपणांविषयींचा

गैरसमज किंवा तिरस्कार उत्पन्न होऊं नये, अशाविषयीं आपला नित्य प्रयत्न असला पाहिजे. आपण अशक्त, आळशी, निरुद्योगी, अपराक्रमी, व केवळ गतानुगतिक आहों, असा आपला दुर्लौकिक सर्व सुधारलेल्या राष्ट्रांमध्यें होत आहे; व जर आपण या दुर्गुणांपासून मुक्त होण्याचा मनापासून प्रयत्न केला नाहीं, तर आपणांस कोण मान देईल? कोण आपल्या उपयोगीं पडेल?

आपल्या पूर्वजांच्या संबंधानें युरोपियन् लोक जेव्हां स्तुतीचे उद्गार काढितात तेव्हां ते स्वतःच्या प्राचीन पूर्वजांशीं त्यांची तुलना करितात. परंतु जेव्हां हल्लींच्या एतद्देशीयांविषयीं ते कांहीं उद्गार काढितात, तेव्हां ते स्वतःशीं त्यांची तुलना करितात. या तुलनेंत आपण कमी पडलों, तर तो दोष कोणाचा? पूर्वजांच्या स्तुतीबद्दल जसें आपणांस समाधान वाटतें, तसें स्वतःच्या न्यूनतांबद्दल आपणांस अत्यंत दुःख वाटलें पाहिजे.

आपल्या न्यूनता दूर करण्याकरितां आपण मनापासून झटत आहों, नवीन विद्या, नवीन कौशल्य, नवीन उद्योग व नवीन विचारसरणी ग्रहण करण्यास आपण तयार आहों, व त्यामुळें आपणांस पुनः ऊर्जित काळ येण्याची शक्यता आहे, असें आपल्या राज्यकर्त्यांपैकीं जे विचारी व थोर मनाचे पुरुष आहेत त्यांस दिसून आल्यास, ते आपले साहाय्यकर्ते होतील व त्यांच्या साहाय्यानें कित्येक दुःसाध्य गोष्टीही सुसाध्य होतील, यांत शंका नाहीं.

आपल्या कुटुंबांत स्त्रियांस अत्यंत मोठीं दुःखें सोसावीं लागतात, त्यांस जन्मभर अत्यंत निर्दयतेनें वागविलें जातें त्यांची स्थिति दास्यस्थितीहून फारशी निराळी नाहीं, इ-

त्यादि अनेक गैरसमज आपल्या राज्यकर्त्यांमध्यें रूढ झाले आहेत. हे गैरसमज जोंवर कायम आहेत तोंवर त्यांस आपणांविषयीं कदापि बहुमान वाटायाचा नाहीं. ते दूर होण्यास एकच मार्ग आहे व तो स्त्रियांस विद्याप्राप्ति करून देणें हा होय. या बाबतींतही पूर्वसीमांचें उल्लंघनच आपल्या अकल्पितपणें कामीं येणार आहे. आज आपणांमध्यें आनंदीबाईसारख्या पन्नास कुलस्त्रिया असत्या, तर एतद्देशीय स्त्रियांच्या कुटुंबस्थितीबद्दल कोणत्याही प्रकारचे दुष्ग्रह राज्यकर्त्यांच्या मनांत अवशेष राहिले नसते. इतकेंच नव्हे, तर इंग्लिश कुलस्त्रियांचा स्नेह व अनुकंपा दृढतरपणें जोडली गेली असती. जेव्हां पुढें स्त्रीशिक्षणामुळें या प्रकारचा स्नेह व अनुकंपा जोडली जाईल, तेव्हां हल्लींच्या अनेक अनिष्ट दुष्ट प्रकारांचें आपोआप निर्मूलन होईल यांत शंका नाहीं. आपल्या राज्यकर्त्यांमध्यें कुलस्त्रियांचें केवढें वजन, केवढें प्राबल्य आहे याची आपणांस कल्पना नाहीं, व त्या आज आपणांविषयीं उदासीन आहेत त्यामुळें त्यांच्या सौजन्याचा आपणांस बिलकुल फायदा होत नाहीं. जर त्यांस आपल्या स्त्रियांकडून एतद्देशीयांच्या दुःखांचीं गाऱ्हाणीं कळलीं, जर त्यांच्या हृदयांस त्यामुळें द्रव आला व त्यांची धर्मबुद्धि जागृत होऊन त्यांनीं आपला पक्ष घेतला, तर त्यांस दुष्कर असें कांहीं नाहीं. याकरितां स्त्रीशिक्षणाच्या द्वारें त्यांचा स्नेह व त्यांची अनुकंपा जोडणें हें आपलें महत्वाचें कर्तव्य गणिलें पाहिजे.